# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192473
UNIVERSAL LIBRARY

# चित्ररेखा

( कथासंग्रह )

लेखिका
कु. सुशिला शिंदे

महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगांव, मुंबई
जानेवारी १९४२

प्रकाशक—
शं. वा. कुळकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगांव मुंबई.

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकांचे
स्वाधीन आहेत.

किं. १। रुपया

मुद्रक—
अ. वा. देसाई एम्. ए.
प्रभाकर आर्ट प्रिन्टरी,
३७ काऊलेन मुंबई.

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १ | दुहेरी भूक ... ... ... | १ |
| २ | कुमारिकेचा प्रश्न ... ... ... | १४ |
| ३ | वादळांतील होडी ... ... ... | २८ |
| ४ | रिकामी खुर्ची ... ... ... | ३८ |
| ५ | उफाळलेल्या भावना ... ... ... | ५१ |
| ६ | चमत्कारिक पेचप्रसंग ... ... ... | ६५ |
| ७ | तुटलेला पतंग ... ... ... | ७६ |
| ८ | सौभाग्य ... ... ... | ८४ |
| ९ | रत्न पारखी ... ... ... | ९४ |

# निवेदन

साहित्य शारदा मंदिरांत आनंदभरीत पण धडधडत्या हृदयानें मी प्रवेश करीत आहे. पूजेसाठीं मी आणलेलं हें साहित्य कदाचित् सौंदर्यहीन, गंधहीन असेल, परंतु अत्यंत भक्तिपूर्वक अंतःकरणानें मी तें साहित्य शारदेच्या चरणीं अर्पण करीत आहे. निरनिराळ्या अनेक प्रतिभासंपन्न कलावंतांच्या कलाकृतींनीं मंदिराची पूजा आणि शोभा प्रकर्षानें वाढत आहे. उत्तमोत्तम कलाकृतींनीं सुशोभित होत जाणाऱ्या या मंदिरांत माझ्या 'चित्ररेखा'नें कांहीं मोठीशी भर पडणार आहे असं मुळींच नाहीं; परंतु दिवाळींत विद्युत्दिपांच्या लखलखीत माळा सभोंवार लाविलेल्या असल्या तरी सुद्धां आपल्या द्वारासमोर एकादा आकाश दिवा आणि पणत्या मोठ्या भक्तिभावानें लाजवितातच कीं नाहीं ?

लघुकथांचा संग्रह प्रकाशित करतांना मला अतिशय आनंद होत आहे. केवळ हौसेमुळें मी लघुकथा लिहिण्यास प्रारंभ केला. निरनिराळ्या मासिकांतून त्यांना स्थान मिळत गेल्यामुळेंच मला प्रोत्साहन मिळालें, मी ज्या लघुकथा लिहिल्या आहेत, त्या लेखन कलागुणांच्या आणि कथातंत्राच्या कसोटीला कितपत उतरतील याबद्दल मी स्वतः साशंक आहे; परंतु वास्तव जीवनाच्या रेखा किंवा छटा त्यांत प्रत्यक्षपणें दिसाव्या हा माझा अंतरीचा हेतू सिद्धीस नेण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे. मानवी जीवन चित्राच्या ह्या ओझरत्या रेखा माझ्या अल्पमती-प्रमाणें रेखाटून रसिकांपुढें ठेवित आहे.

साहित्य सेवा करण्यास ज्यांनीं मला उद्युक्त केलें त्यांची आठवण या प्रसंगीं झाल्यावांचून राहात नाहीं. श्री. येसूबाई भाटवडेकर आणि डॉ. खं. अ. धैर्यवान या त्या व्यक्ति होत. यांच्याच प्रोत्साहनामुळें मी प्रथम लेखणी हातांत घेतली. संग्रह प्रकाशित करण्याच्या कामीं श्री. शामराव मु. कोवारकर यांचे मला जें साहाय्य मिळालें, त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच होतील. प्रकाशक श्री. शं. वा. कुलकर्णी यांनीं अगदीं झटपट व आपुलकीनें माझा हा लघुकथासंग्रह प्रकाशित करून साहित्य शारदामंदिरांत मला प्रवेश करून दिला. याबद्दल त्यांचीही मी फार आभारी आहे.

# दुहेरी भूक : : : १

पावसाची जोराची सर आली. मोठमोठाल्या थेंबांचा टपटप आवाज झाला. स्वर्गातील देवतांच्या गळ्यांतले मोत्यांचे सरच जणू तुटले, कीं त्याचे ते सर तयार करणाऱ्या कलावानाने मोतीं चाळलीं-कोण जाणे! हो, निवडक दाणे घेऊन बाकीचे दिले त्यानें पृथ्वीवर फेंकून! टपटप आवाज करीत खडककपारीवर आपटून ते फुटले. समोर पसरलेल्या विशाल सागराने त्यांना आपल्या पोटांत घेतलें. वाळूंत पडलेले वाळूशीं विलीन होऊन गेले. झाडांच्या पानानी मात्र त्यांना झेलून धरले. फिरायला आलेल्या माणसांची थोडीशी धांवपळ उडाली. श्रीपत मात्र जागचा हाललाच नाहीं. आपल्या फाटक्या कोटाच्या खिशांत हात घालून तो विमनस्कतेनें सभोवार पहात होता.

मोत्यांचा वर्षाव लगेच थांबला. क्षणभरानें वाऱ्याचा झोत आला. पानांनीं धरून ठेवलेली स्वर्गाची संपत्ति त्याने लगेच उधळून लावली. टप् टप्. श्रीपतचें मळकट धोतर आणि चिंताग्रस्त कपाळ किंचित ओलसरलें. त्यानें वर पाहिलें. वाऱ्याची अन् झाडाच्या पानांची लढाई चालूच होती. झाडाची इवलीशी नाजूक पानें आणि शक्तिमान सत्ताधीश वारा यांत विजयी कोण होणार हे ओळखूनच तो तेथून उठला. समोर सूर्यानेही जातां जातां सृष्टीवर सोन्याची फुले उधळलीं होतीं; पण मदांध सागर आपल्या उफाळलेल्या लाटांच्या शक्तीनें तीं सारीं आपल्याच पोटांत सांठवून ठेवूं पहात होता. सृष्टी क्रोधानें लाल झाली होती; पण प्रचंड शक्तिमान् सागरापुढें तिचें बिचारीचें काय चालणार?

श्रीपतचें या निसर्गलीलाकडे लक्ष नव्हतें. आणि निसर्गकाव्यातील माधुरी चाखण्याइतकी त्याच्या मनाची कुवतही नव्हती. त्याला फक्त एकच गोष्ट डांचत होती. आपण पूर्ण शिक्षित नसलों तरी वाटेल ते काम करायची आपली तयारी असून या अफाट मुंबई शहरात आपल्याला पोट भरायची मुष्कील पडावी? उद्यां काम मिळालं नाही, तर आपण खाणार काय? हा अत्यंत कठीण प्रश्न सोडवीत तो समुद्रतीरावरील बगले मागे टाकून माहीमच्या मोठ्या रस्त्यावर आला. रस्ता ओलांडण्याकरिता त्याला दोन मिनिटें थांबावे लागले मोटारींची घांवती रीघ दुतर्फा लागली होती. भकास मुद्रेने तो त्या दिमाखानें चमकत जाणाऱ्या मोटारीकडे पहात होता. पलीकडे जाताच कोपऱ्यावरच्या हॉटेलांतून भज्याचा तेलकट खमंग वास त्याच्या नाकात शिरला. त्यानें खिशात हात घातला. नेमके दोनच पैसे त्याच्या हाताला स्पर्श करीत होते. जावें काय? पोटांतील भूक त्याला सांगत होती, 'चल तूं आत.' पण मन इशारा देत होतें, 'अवघे दोन पैसे आहेत, उद्याची दुपार टळेल यावर!' पण उद्यांचा विचार सध्याच्या भुकेनें केला नाहीं. त्याचे पाय आपोआप वळले. भज्यांचा वास त्याच्या नाकांत शिरला. आंतला गजबजाट कानावर आदळला. आणि नजर रिकामें टेबल न्याहाळूं लागली, तोंच—"कोन शिरपत, अर इकड ये ना!" असे शब्द त्याच्या कानावर आले. एका टेबलाजवळ महादू बसला होता. त्यानेंच श्रीपतला हांक मारली. श्रीपत त्याच्या शेजारीं जाऊन बसला.

"महादू, अवचित गांठ पडली रे तुझी!" महादूनें दोन भजीं व चहाची ऑर्डर दिली. "लइसा फिकीरींत दिसतोस, लगीन व्हायचीच काळजी ना? कां डरतोस असा! मस पोरी या ममईत हायती आपल्या जातकुळीच्या, देईन तुला एकादी हेरून!" महादूनें आपल्या दंतपंक्ति पाजळल्या. श्रीपतच्या कपाळावर उमटलेल्या आठ्यात आणखी एकीची भर पडली.

"महादू, तुझ्या डोळ्यांना दुसरं कांहीं दिसतच नाही. तुझ्यावाणी मी मोठ्या गुजराथी शेटकडे नोकरीला नाहीं. पण जी होती, त्या ख्रिश्चन सायबा-

कडली सैपाक्याची नोकरी, ती पण आतां सुटली. हे पाहिलंस?" श्रीपतनें दोन पैसे खिशांतून काढून त्याच्यासमोर धरले.

"बस इतकेंच आतां! आणि पुढील स्थिति त्यानें आपल्या करुण नजरेनेंच महादूच्या ध्यानात आणली.

"अस हाय व्हय?" महादू गभीर झाला. "मग राहतोस कुणाकड तर?"

"अरे राहायचं कुठं? दिवसभर असाच वणवणतों कुठं तरी, न् रात्रीं त्या आपल्या गणबाच्या भिशींत झोपतों."

"चार बुकं विंग्रजी शिकलास शिरपत, पन अखेरीला काय रे? शिकन्याचा बी काई उपयोग नाई आतां राह्यला. एक नोकरी हाय. करतोस का? महादूनें जणूं आपणच नोकर ठेवणार अशा रुबाबांत विचारलें.

"करतोस का काय विचारतोस? कसली पण नोकरी करायला तयार आहे मी!"

"आमच्या शेटच्या बंगल्यानजीक एक बंगला हाय! मोठी शिरिमंत बाई एकलीच राहती. दोन मुला हायती बस! तिला एक मानूस पाहिजे बग बगल्याची व बागेची साफसुर्फी बगायला! बाई मानूस, तवां पगार काई फार मिलन्याची आस करू नकोस."

"अरे पोटाची भूक तर भागेल ना! चल मला घेऊन तिकडेच!" मरगळून गेलेल्या स्थितीतला श्रीपत उल्हसित झाला. काळजीने ग्रासलेल्या त्याच्या डोळ्यांत आनंदाची चमक दिसूं लागली. हॉटेलांतला सभोंवारचा गजबजाट आणि गर्दी जणूं तो विसरला. वरच्या बाजूला भिंतीला ओळीनें लावलेल्या देवदेवतांच्या तसबिरींकडे त्यानें भक्तिभावानें पाहिले; आणि तो मनात म्हणाला, "देवा, उद्यांची सोय तूं अगोदरच लावून ठेवतोस. आम्ही उगीच चिंता करावी. आमची खरी चिंता तुलाच!"

* * *

श्रीपत आज माहीमच्या चौपाटीवर आला होता; पण चालत नव्हे—मोटारीतून! मालकिणबाईच्या दोन्ही मुलांना घेऊन तो फिरायला आला होता. श्रीपतचा रुबाब आतां बराच वाढला होता. पांढरे स्वच्छ धोतर, निळया चौकटीचा शर्ट आणि त्यावर किरमिजी रंगाचा नवा कोट! त्याची भरदार मान, उन्नत खांदे आणि रुंदट मनगटें, या पोशाखांत किती तरी खुलून दिसत होती. त्याच्या तारुण्याची खुलावट दिवसागणिक उमलत्या फुलाप्रमाणें बहरत होती. पण त्याच्या चेहऱ्यावर कसलीशी हुरहुर उमटली होती. गुन्हेगारासारखा चोरट्या नजरेनें तो सभोंवार पहात होता. त्याच्या निष्पाप डोळ्यांत भेदरटपणा प्रतीत होत होता. आणि सुखाची नोकरी मिळाली असूनही त्याच्या चेहऱ्यावर समाधान नव्हतें.

ओहोट असल्यामुळे सागराची चर्या सुकून गेल्यागत दिसत होती. सूर्य सुवर्णकिनारीनें मढविलेल्या रुपेरी ढगाआड लपून संध्यादेवीशी लपंडाव खेळत होता. नारळीची झाडे स्तब्धतेनें माना उंचावून हा खेळ पहाण्यात गढून गेली होती. मुलांचा वाळूशीं खेळ चालूच होता. विविध रंगी पोषाखांतील ललना संध्यादेवीशी स्पर्धा करीत इतस्ततः हिंडत होत्या. श्रीपत मात्र विचारांच्या गुंगीत आपल्या गुडघ्यांना हाताचा विळखा घालून बसला होता. मालकिणबाईचा दहा वर्षांचा मुलगा व सात वर्षांची मुलगी जवळच वाळूचा किल्ला बांधण्यांत गर्क झालीं होतीं. त्यांच्यावर त्याची नजर होती. पण त्याचे अंतःचक्षु मात्र निराळेच देखावे पहात होते. "फुलवाडीतलें तें आपलें कुडामेढीचें छोटें घर, आपल्यावर जीवप्राण करणारा आपला बाप, आणि स्वच्छंदानें—बेफिकीर आनंदानें, फुलवाडीत घालविलेलं आपलं बालपण! या मुलासारखेच तेव्हां आपण सुखांत होतों. गरीबीची झळ बाप मरेपर्यंत आपल्याला लागली नव्हती. दिवसभर तो कष्ट करी, आणि आपलें कोडकौतुक पुरवी. बाप मेला तेव्हां अजाण पोरका पोर मी; जगांत उघडा पडणार होतों. पण सगुणा—आपली बहीण सोलापुराहून धांवत आली. आईच्या प्रेमानं तिनें आपल्याला त्या वेळीं

जवळ केलं. नवऱ्याच मन वळवून आपल्या घरी नेलं. सहामात वर्षे सोलापूर शहरात मी शिक्षण घेतलं. शहरच्या राहणीनं धीट हुशार बनलों. आणि आतां मार्गाला लागणार तोंच काय माझं दुर्दैव! माझ्यापेक्षा सगुणेचच अधिक! तिच्या नवऱ्याला क्षयाचं दुखणं जडलं. गिरणीतल काम. हातावर मिळवायचं आणि पोटाला खायचं नी असल दुखणं. पहिल्यापासून कशाचे औषधोपचार न् कशाच पथ्यपाणी? शेवटीं विकोपाला गेल्यावर फुलवाडीला हवा पालटायला आणलं. आमचं जुनं घर साफसुफ झालं. जमिनीला उजाळा आला. दारची चारदोन झाडं टवटवलीं. परसांत गुलबाशीचीं न् सदाफुलीचीं फुलं फुलू लागली. घरांत रोज पुन्हां दिवा लागूं लागला. पण एक दिवस सगुणेच्या आयुष्यमार्गातला दिवा तिथं शेवटीं विझला. तिचा सदोदितचा फुललेला चेहरा कायमचा कोमेजला. सगुणा–माझी सगुणा, निराधार विधवा झाली. बाप मेल्यापासून तिनं मला जोपासलं होतं. आतां तिचं संरक्षण करण्याचं काम माझ्याकडं आलं होतं. 'सगुणा, दुःखाच्या खाईत तूं पडली असलीस तरी तुझा भाऊ अक्षय तुझ्या पाठीशी आहे. तूं निराधार झालीस असं समजूं नकोस. मी काय आता लहान आहे! कुठं तरी कामधदा पहातों मी आतां.' असं आपण तिला म्हणालों. पण त्या लहानशा खेडेगांवात काम तरी कसलं मिळणार? ज्या शेताच्या तुकड्यात बाप कष्ट करीत होता, तो शेततुकडा त्याच्याबरोबरच त्याच्या दिवसवारांना खर्ची पडला होता. आपली उमेद आणि उत्साह ओसरूं लागला. जवळची सगुणेची पुंजी संपतांच तिनें एकदोन असलेले दागिने बाहेर काढले. आपलें मन आपल्याला आंतल्या आंत खाऊं लागलें. टोचूं लागल. पुरुषासारखा पुरुष मी! माझं न बहिणीच पोट भरायची कुवत माझ्यांत नसावी? तडाक्यासरसा सगुणेचा निरोप घेऊन मी मुंबईत आलों. मनगटाच्या बळावर माणूस मुंबईत नाहीं पोट भरूं शकणार, तर काय रानांत जाऊन भरील? पण या मायावी शहराबद्दलच्या माझ्या कल्पना साफ फसल्या. दीड वर्षांत कधीं एक वेळ, तर कधीं अर्धपोटींच दिवस काढले मी! सगुणेला

कडे आणून बिऱ्हाड करण्याची शक्यता तर दूरच राहिली; पण तिला दोन
से पाठवायलाही झाले नाहीं आपल्याला ! बिचारी लोकांची कामं करूनच
ोट भरीत आहे. कसंही करून चार दिवसांची रजा घेऊन दिवाळीत फुल-
ाडीला जायचं आणि सगुणेला भेटायचं! या महिन्यांतच चार पैसे गांठीं
ाहिलेत आपल्या! सगुणेसाठी भाऊबीजेला एक छानदार लुगडं घेऊन जाऊं
ापण !—'

विकल झालेला श्रीपतचा चेहरा एकदम निश्चयी दिसूं लागला. जवळ
ालेल्या छोट्या मालकिणीच्या केसांतील वाळू त्याने झटकली, आणि
याबरोबरच मनांतले असमाधानाचे दुःखाचे विचार त्यानें झटकून टाकले·
ाचा हात धरून तो तोंडानें शीळ घालीत चालूं लागला.

क्षणाक्षणाला अंधाराचें पटल सृष्टीवर पसरत होतें. काळ्या कातळाप्रमाणे
ागराच्या लाटांचीं आंदोलनें चमकत होतीं. सूर्यतापानें धगधगलेल्या आणि
ंधारानें काजळलेल्या सृष्टीला वायु आपल्या संगीतानें रिझविण्याचा प्रयत्न
करीत होता. नारळीच्या झांवळ्या त्याला आनंदानें साथ देत होत्या. खडक-
कपारींच्या आंवतीभोंवतीं लाटांचे नृत्य चालूच होतें. वाऱ्याची शीतल झुळूक
ाणिमात्रांना सुखवीत होती. मऊमऊ वाळू पायांना पुष्पपाकळ्याप्रमाणे भासत
ोती. मोठ्या रुबाबांत श्रीपतनें मोटारीचें हॉर्न वाजविले. शोफर येतांच दोन्ही
ुलांसहित तो आंत बसला. आणि भर्कन् मोटार माहिमच्या मोठ्या रस्त्या·
ारून पलीकडे गेली. कोपऱ्यावरच्या त्या हॉटेलाकडे श्रीपतने सहज नजर
ाकली. आजही पुढेंच धगधगलेल्या शेगडीवर उकळत असलेल्या कढईतून
भज्यांचा खमंग तेलकट वास येत होता. पण तो श्रीपतच्या नाकांत फारसा
शिरला नाहीं. आणि आज त्याची जीभ त्याकरितां लालचावली पण नाहीं.

* * *

दिवाळीं दोन दिवसांवर आली. बंगल्याच्या मागल्या ओसरीवर श्रीपत आपली वळकटी बांधीत होता. पिछाडीच्या बाजूला श्रीपतने लावलेले शेवतीचे ताटवे फुलांनी बहरले होते. उन्हात ती फुले सोन्याप्रमाणे चमकत होती. वाऱ्याबरोबर येणाऱ्या सुवासात स्वयपाकघरातून येणारा पक्वान्नाचा गोड खमंग वास मिसळून गेला होता. मालकीणबाईची आतून बाहेर, बाहेरून आंत सारखी लगबग चालली होती. "श्रीपत, चार दिवसानीं लागलीच परत आलं पाहिजे. जास्त राहू नकोस हो! इथ तुझं काम पहायला दुसरं माणूस नाहीं. नाहीतर राहशील आपला बहिणीनं आग्रह केला म्हणून! भाऊबीजेला काय घेतलंस रे?" प्रेमळतेने मालकीणबाईनें विचारलें, "कांहीं नाही घेतलं अजून. आतां घेईन जाताजाता एकाद लुगडं!" श्रीपतनें किंचित लाजून खालच्या मानेनें उत्तर दिले.

"हें बघ, तुझं तूं घे; पण माझं म्हणून हें एक घेऊन जा." मालकीणबाईनें शयनमंदिरांतून लुगड्याची एक घडी आणून श्रीपतपुढें धरली. श्रीपतनें कृतज्ञतेनें एकवार तिच्याकडे पाहिलें. पण लुगड्याची घडी घेतांना त्याचा हात थरथरत होता. चेहरा काळवंडून गेला होता.

थोड्या वेळानें, "जातो मी" असं सांगून वळकटी उचलून त्यानें स्टेशनचा रस्ता धरला.

फुलवाडीच्या स्टेशनवर गाडी उभी राहिली तेंव्हा पहाटेचे तीन वाजले होते. श्रीपत स्टेशनवर उतरला आणि क्षणभर थबकला. अशा अंधारांत दोन मैल पायाखालीं घालून रस्ता काटावा का स्टेशनवरच झुजूमुंजू होईपर्यंत थांबावं? असा विचार त्याला पडला. पण सगुणेला भेटायची त्याच्या मनाची ओढ विलक्षण होती. विचार कायम होण्यापूर्वीच त्याची पावलें पुढेंपुढें पडत होती. तो आपल्या घरापाशीं थबकला; तेंव्हां जुनाट दाराच्या फटीतून एवढ्या पहाटे उजेड दिसत असलेला पाहून तो चकित झाला. आज कांहीं दिवाळी नाहीं; मग सगुणा इतक्या लवकर कशाला उठली असेल? दळण

दळायला? हो लोकांची दळणं केल्याशिवाय तिच कसं चालणार नाहीं तरी!

उत्सुकतेने दाराच्या फटीतून त्यानें आंत पाहिलें. मिणमिणत्या उजेडात त्याला एक पाढरी पुरुषाकृति दिसली. त्यानें आपले डोळे चोळले आणि पुन्हां पाहिले. छे, त्याचा आपल्या डोळयांवर विश्वास बसेना. सगुणा-आपली विधवा बहीण,-पाट तर लावला नसेल तिनं? पण तसं आपल्याला कळले नसतें का कांही! ती पुरुषाकृति दाराजवळ आली. पाठोपाठ सगुणेची ओझरती छायाही त्याला दिसली. झटकन् तो दारापासून दूर झाला आणि अंगणांतल्या झाडाच्या आडोशाला उभा राहिला. दार उघडले गेले आणि टाकटीक पोशाखाची ती व्यक्ति झपझप पावले टाकीत अंधारांतून दिसेनाशी झाली.

सगुणा दार लावणार तोंच श्रीपत पुढे आला. सगुणा चपापली. हातांतली दिवटी तिने वर धरली. " कोण श्रीपत? " तिच्या तोंडून आश्चर्यमिश्रित भयाकुल उद्गार बाहेर पडले.

"ह, मीच सगुणा!" त्याचे नरिकाग्र संतापोन स्फुरत होतें. श्वासोच्छ्वास जोरानें चालला होता. सगुणेकडे तीव्रतेनें पहात श्रीपत आंत आला. आणि वळकटी खालीं टाकून तीवर बसला.

"दोन वरसांत आज याद आली तुला वहिणीची ना रे?" कांहीशा धिटाईने त्याच्याकडे रोखून पहात सगुणा म्हणाली.

"आन् वहिणीला आपला भाऊ जिता की मेला याची कुठं चिंता होती. ती आपल्या रगढंगांत... सगुणा, नव्हते राहवत तर पाटाचा राजमार्ग मोकळा होता आपल्या जातींत तुला! कशापायी या पापांत हात धुतलेस तूं?"

"पोटात काटे भरायची वेळ आली, म्हंजे हात पापांत आपसूक धुतले जातात. श्रीपत, कोणाला काय बोलतोस तूं? मुंबईला राहून तुला मातर चांगलं रंगढंग समजूं लागले असतील! दोन वर्षांत-चार पैशांची मदत राहिली बाजूला, पण चार शब्दांचा कागद तरी धाडायचा होतास!"

दिवटीच्या अंधुक प्रकाशांतही सगुणेच्या फिकट चर्येवर रक्त उसळून येत असल्याचें दिसत होतें. जरी तिची पूर्वींची सुडौल देहयष्टि सुकून गेली होती, तरी बोलतांना वक्राकार रेखीव भुंवयांचा होणारा नाच आणि डोळ्यातली विलक्षण चमक श्रीपतला पूर्वीप्रमाणेच जाणवत होती. बाहेर पहाटेचा कोंबडा आरवत होता. पक्ष्यांची अस्पष्ट जागही जाणवूं लागली होती. पहांट वाऱ्याची थंडगार झुळूक दाराच्या फटींतून आंत येत होती. त्या झुळुकीच्या स्पर्शानें शांत होऊन, कीं सगुणेच्या बोलण्यानें वरमून कोण जाणे?-पण श्रीपतनें खालच्या आवाजांत सकंपतेनें विचारलें, "सगुणा, बरीच आजारी होतीस तूं असं दिसतं!"

श्रीपतच्या सकंप आवाजानें सगुणेचा नाजुक देह क्षणकाल थरथरला. तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा सर खळकन् ओघळला. पदराच्या टोकानें तिनें डोळे टिपले. आणि किंचित् काल थांबून उदासीनतेने ती म्हणाली:

"श्रीपत, तूं मुंबईला गेलास तेव्हां इकडे मी पण लाज-दु:ख गुंडाळून ठेवून कामधंदा शोधूं लागलें. चार कष्टाचीं कामं करून मी पोटाची भूक भागवूं लागले. सात-आठ महिने चांगले निवांत गेले; आणि एक दिवस मला सडकून ताप भरला. चौदा-पंधरा दिवस उलटले; पण अंगांतला ताप हालेना. शेजारची कोणी आई-बाई येऊन मला पेज घाली. जवळच्या चार दिडक्या केव्हाच सरल्या ताप भडकून आपला प्राण जावा म्हणून देवाची मी परोपरीने विनवणी केली; पण देवाच्या मागें लागणाऱ्यांना तो कधीं नेत नाहीं बघ! औषधपाण्यावांचून तशा दुखण्यांतूनसुद्धां मी बरी झालें; पण हाडांचा सांपळा उरला नुसता. दोन पावलं चालण्याचीसुद्धां मला ताकद नव्हती; मग कामधंदा माझ्या हातून कसा होणार? मुंबईत तुला पण नोकरी नाहीं, असं गणबा इकडे आला होता त्याच्या-कडून मला कळलं. मग माझी स्थिति तुला कळवून तुझी विवंचना आणखी कशाला वाढवूं? उठत...बसत कशीबशी मी सदू देशमुखाकडे गेलें. ज्या तोंडानं मी देवाजवळ मरणाची मागणी करीत होतें त्याच तोंडान मी पोटाच्या

आगीसाठी देशमुखाजवळ उसन्या पैशाची याचना केली. त्याने माझी गरज भागवली; पण अशक्तपणामुळे पूर्वीसारखं काम माझ्याने होईना; आणि देशमुखचे पैसे मला परत करता येईनात. मी लाचार झालें. त्याने पैसे मागितले नाहींत; पण जें काय माझ्याजवळ मागितलं तें त्याच्या उपकाराच्या जाणिवेमुळे मला नाकारता येईना. मी त्याच्या वासनेला बळी पडलें. पाटाचा मार्ग मला मोकळा आहे; पण देशमुखाला नाहीं. म्हणून हे असं आहे. हे रंगढंग नाहींत. ही माझी पोटाची भूक आहे श्रीपत. मी आतांच बोलत काय बसलें? उगवतीला तांबडं फुटलं नी बाहेर फटफटलंसुद्धां. आल्यापासून तूंही असाच बसून आहेस. चल ऊठ, तोंड धू, मी चहापाणी करते तोवर!" सगुणा चटकन् उठली, आणि चेहऱ्यावर उसनें हास्य आणून पदर बांधून आंतल्या खोलींत गेली.

* * *

भाऊबीजेच्या दिवशी संध्याकाळीं सगुणा रांगोळी काढीत होती. पितळीत आरतीची तयारी केलेली होती. श्रीपत पडल्यापडल्या काम करीत असलेली सगुणेची उत्साही मूर्ति न्याहाळीत होता. तिची तयारी होतांच तो उठला. त्यानें कागदांत बांधलेल्या लुगड्यांचा दोन घडया काढल्या व तो पाटावर बसला. ओंवाळतांना निरंजनाचा सौम्य प्रकाश दोघाच्याही मुखमंडलावर परावर्तित होत होता. श्रीपतला वाटलें, 'निरंजनाच्या ज्योतीचें पावित्र्य आपल्या सगुणेंत सांठविलेलें आहे. तिचे आपल्यावरील प्रेम, तिच्या आंगांतील गुण, हे पवित्र नाहींत का?' सगुणेला वाटलें, 'श्रीपत म्हणजे आपले निरंजन आहे. निरंजनांतून सौम्य प्रकाश पसरतो. श्रीपतमुळेंच आपल्या आयुष्यांत अजून प्रकाश राहिला आहे. हे माझं निरंजन अखंड तेवत राहिल अशी मला काळजी घेतली पाहिजे. माझ्या मायेची पाखर घालून त्याचे जगातील वाऱ्यापाण्यापासून मला रक्षण केलं पाहिजे.'

आरती खालीं ठेवतांना तिच्या मनांत मग असाही विचार चमकून गेला,–'वयांत आलेला पोरगा,–मुंबईत एकटा राहतो. लवकरच बरोबर जोडी-

दाराण दिली पाहिजे. श्रीपतने तिच्या हातीं दिलेल्या लुगड्याच्या दोन घड्या पाहून ती चकित झाली. "श्रीपत, कशाला दोन आणलीस वेळी पोटाला चिमटा घेऊन? तुला कुणी सांगितलं हे? स्नेहार्द्रतेने सगुणा म्हणाली.

"नाही सगुणा, मी एकच आणलं; दुसर मी ज्यांच्या घरी नोकरीला आहे तिथल्या मालकीणबाईंनी दिलं,–तुला देण्यासाठी म्हणून." पण हे बोलतांना श्रीपतचा चेहरा काळवंडला. नजर खालीं गेली. आणि कानाच्या पाळया आरक्त झाल्या. सगुणा लुगडी पाहण्यांत गुग झाली होती; म्हणून त्याची ही अवस्था तिच्या लक्षांत आली नाही. पण पाटावरून उठतांच दोन अश्रुबिंदू त्याच्या गालावर टपकन् पडले; आणि शिताफीने ते पुसण्याच्या आत सगुणेच्या चमकदार डोळ्यानी हेरले.

"कां रे श्रीपत?"

"छे, कांही नाही." असे तो म्हणाला; पण त्याला आपला आवेग आवरतां आला नाहीं. सगुणेच्या जवळ बसून त्यानें तिच्या गुढघ्यावर मान टाकली.

"वेडा, लहान का रे आता तूं?" तिनें वत्सलतेनें प्रेमानें त्याच्या मस्तकावरून आपला हात फिरविला. त्याला आठवलं–दहा वर्षाचा असतांना त्याचा बाप वारला; तेव्हा तिनें असेच त्याला जवळ घेतलें होते. तीच वत्सलता आणि तीच प्रेमळता! माणूस परिस्थितीने आणि प्रसगाने गाजून कणखर बनतो; भलींबुरी कृत्ये करायला प्रवृत्त होतो. पण त्याचे अंतःकरण पूर्ववत् असते. माणुसकीचे गुणधर्म कांही त्याच्यांतून नामशेष होत नाहीत.

श्रीपतच्या तोंडून चटकन उद्गार निघाले, "कांहीतरीच बोललो मी त्या दिवशीं तुला सगुणा! परिस्थितीची समज मला आली नाही. लहान तोंडीं मोठा घांस घेतला मी!"

"नाही श्रीपत, माझं मन मेलं असलं तरी तुझं जिवंत आहे. तुझं तरुण

पवित्र रक्त सळसळत आहे हेंच दिसलं मला त्यांत! आतां नको त्याचा विचार! उद्यां तूं जाणार. तुझ्याबरोबर देण्यासाठीं दोन जिन्नस करायचे आहेत मला." असं म्हणून सगुणा उठून गेली.

श्रीपत आढ्याकडे पहात वळकटीला टेंकून पडला. पण त्याचें मन निराळेच विचार करीत होतें. 'पवित्र रक्त! कोणाचं? माझं? सगुणा, तुला खरी गोष्ट कळली तर? देशमुखाला अपरात्रीं तुझ्या घरी पाहून मी तुझ्यावर चिडलों-रागावलों. पण...मी? मी काय केलं?

'कसं सांगणार तुला तें? महिन्यापूर्वींचा तो रात्रीचा प्रसंग. बंगल्यांत सगळीकडे सामसूम झाल्यावर मी सोप्यावर वळकटी अंथरीत होतों. मालकीणबाईनं मला हांक मारली म्हणून मी तिच्या खोलींत गेलों. आणि झटकन् तिनं दरवाजा लावला. प्रकार काय आहे हें ध्यानांत येण्याच्या आंत माझ्या दोन्ही खांद्यावर हात ठेवून तिनं ज्या नजरेनें माझ्याकडे पाहिले ती नजर! ती नजर मी जन्मांत कधी विसरणार नाही. मी भांबाऊन गेलों. खोलींत पडलेला मंद निळा प्रकाश, वाऱ्याच्या झुळुकीनें हळूहळूं हालणारी पलंगाची झालर, मऊमऊ सफेद उशा, आसपासचं सजावटीचं बहुमोल चकचकित सामान, सारें कांहीं क्षणांत अस्पष्ट दिसूं लागलं. तिच्या केसांतून आणि झिरझिरीत पातळांतून येणाऱ्या सुगंधानें आपलं नुसतं नाकच नाहीं भरून गेलं. डोळे तारवटले, शरीर फुलून आलं, हृदय धडधडूं लागल आणि आपली सगळी विचारशक्तीच जणूं नष्ट झाली. तिचे हात काढून टाकण्यासाठीं मी हात खांद्याजवळ नेले. पण-माझेही हात तिथंच राहिले. स्त्रीचा स्पर्श! अगदीं जवळून! माझ्या सगुणेशिवाय इतक्या जवळून कोणतीही स्त्री मी पाहिली नव्हती. ही तर माझी मालकीण,-संपत्तिसुखात लोळणारी,-सुकुमार-नाजूक! भीतीनें थरथरणारा देह आणि घामानें डबडबलेला माझा चेहरा पाहून ती मला अधिकच बिलगली आणि म्हणाली, 'श्रीपत, थोडाबहुत-शिकलेला आहेस तूं! तुला कळेल माझं दुःख! तुझ्यावर माझा विश्वास आहे. तूं माझा नोकर नाहींस यावेळीं! तुला कल्पना

नाही, किती दिवस मी दारुण मनोव्यथा भोगली. मुलांचा बाप मरून सात वर्षं झालीं–तुला माहीत आहेत आमच्या जातीचीं बधन ? पैशानं मिळणारीं सारीं सुखं मला मिळत असूनही मी भुकेलेली आहें; अन् तुझ्यापाशीं याचना करीत आहें श्रीपत !' पुढे काय झालं तें समजण्याची आपल्या मनाची शक्ति असमर्थ ठरली. काय घडलं माझ्या हातून हें ? पोटाच्या भुकेसाठीं सगुणेनें जें केलं, तेंच शरिराच्या भुकेसाठी आपल्या मालकिणीने केले. आणि मी?–सगुणेच्या वयाची आपल्याला वडील बहिणीसारखी शोभणारी आपली मालकीण ! काय केलं मी ? कोणत्या भुकेसाठीं ? शरीराच्या ? पोटाच्या ?–कीं दोन्हीही ? विचारांच्या अतिरेकानें श्रीपतला झोंपेची गुंगी आली. सगुणा बाहेर आली, तेव्हां श्रीपत झोंपेंतच अस्वस्थपणें चळवळ करीत होता.

# कुमारिकेचा प्रश्नः : : २

" तुमचं म्हणणं काय यशवंतराव, प्रेमविवाह आपल्या समाजांत सर्रास रूढ झाला, तरुणतरुणींना त्या बाबतीत पूर्ण मोकळेपणा आणि स्वातंत्र्य मिळालें म्हणजे सारे विवाह अगदीं सौख्यपूर्ण होणार ! मग दुःखाला आणि असमाधानाला जागच राहणार नाहीं ? "

" पण मी म्हणतों प्रेमविवाह झालेले तरी आनंदांत आणि समाधानांत कुठें नांदतात ? शिवाय भोळ्या मुलींना फसवायला तरुणांना प्रेमविवाहाचा हा एक राजमार्ग मोकळा होतो. "

चाललेल्या या वादविवादाकडे माझें मुळींच लक्ष नव्हतें. बाहेर पावसाची भुणभुण चालू होती. टेनिस कोर्ट ओलं चिंब होऊन गेलं होतं. आसपास उगवलेल्या गवताच्या पानांवरून थेंब ओघळत होते. मध्येच उन्हाचा कवडसा पडला म्हणजे हे थेंब जे चकाकत, त्यांची शोभा मोठी मजेदार वाटे. सर्वात मौज म्हणजे पीठ चाळावें त्याप्रमाणे बिलकूल आवाज न करतां. आभाळाच्या चाळणीतून पावसाचे कण कण पडत होते. ते कण पाण्याचे आहेत हे जमिनीवर पाहिले तरच समजण्यासारखें होतें. मी हा विलोभनीय देखावा पाहण्यांत दंग झालों होतों.

"मी तर म्हणतों, वाढत्या वयाबरोबर प्रेमस्वातंत्र्यामुळें तरुणतरुणींची दुःखें वाढतात. अनेक भानगडी अन् प्रश्न मध्ये उत्पन्न होतात. एकूण जुन्या किंवा नव्या दोन्ही पद्धतींत सुखदुःखे सारखींच ! "

डॉक्टर असं म्हणाले आणि चिरूटाचा एक मोठा झुरका घेऊन त्यांनीं तो रक्षापात्रावर ठेवून दिला. तेव्हां मात्र मी समोरची नजर काढून खुर्चीचे तोंड त्यांच्या बाजूला वळविले. कारण डॉक्टर आता काहीतरी मजेदार अनुभव किंवा रहस्यमय गोष्ट सांगणार अशी माझी खात्री होती. ते आपल्या चिरूटाचा वियोग फक्त टेनिसची रॅकेट हातांत असेल तेव्हां किंवा कांहीं विशेष महत्त्वाचें बोलायचें असेल तेव्हांच सहन करीत.

डॉक्टर हे आमच्या क्लबमध्ये सर्वांचेच आवडते होते. किंचित् वयस्क असले तरी तरुणाला लाजवील इतका त्यांच्या अंगीं खेळकरपणा होता. टेनिसची रॅकेट ते जसे सफाईने फिरवीत आणि आपल्या खेळण्यानें प्रेक्षकांचें चित्त आपल्याकडे ओढून घेत, तसेच आपल्या रसाळ वाणीने ते साऱ्यांचीं मनें रिझवीत. विशेषत: त्याचा डॉक्टरी व्यवसायांतील विविध अनुभव त्यांच्या बोलण्यांत नेहमींच येत. खुर्चीतून उठून त्यांनीं व्हरांड्यात झपाट्यानें चारपांच फेऱ्या घातल्या. सांगायच्या गोष्टीची मनात जुळणी करण्यासाठींच ते फेऱ्या घालीत.

आपल्या जागेवर पुन्हां बसत ते म्हणाले "मी तुम्हाला एका मुलीची करुणकथा सांगणार आहे. अर्थात् या कथेचा शेवट गोड नाहीं हे सांगायला नकोच."

मला हंसू आलें. आणि तें पाहून डॉक्टर म्हणाले, "बाबू, मी कांहीं लेखक नाहीं. तेव्हां कथेचा शेवट अगोदर सांगायचा नसतो. हें तंत्रबिंत्र मला कांहीं समजत नाहीं. गोष्ट लिहावयाची झाली तर तें तुझं तूं पाहून घे. मला सांगायच ते हें की, या गोष्टीशीं माझा जरा जिव्हाळ्याचा संबंध आहे. मध्येंच हसून त्यांतलं गांभीर्य घालवूं नकोस."

असें म्हणून त्यांनीं आपल्या चिरूटाकडे एक दृष्टीक्षेप टाकला. जणूं ते त्याला म्हणत होते, आतां किती वेळ तुझा वियोग सहन करावा लागतोय

कोण जाणे! 'मी आतां सांगणार ती करुण कथा आहे' असं डॉक्टरांनीं अगदीं गभीर चेहऱ्यानें सांगितलें तरी आता एक सुंदर गोष्ट ऐकायला मिळणार म्हणून मी आनंदून गेलों.

खुर्चीत व्यवस्थितपणें पाठीमागे रेलून बसत डॉक्टर सांगूं लागले:—

दवाखान्यांत पाऊल टाकतांच अपेक्षेपेक्षां आज रोग्यांची बरीच गर्दी आहे हें माझ्या ध्यानांत आलें. आणि नेहमीचेंच आहे ते? कांहीं कामानिमित्त यायला उशीर झाला कीं रोग्यांची गर्दी उसळलेली असायची आणि जरा लवकर येऊन बसल कीं, तासा दीड तासांत एकही रोगी तोंड दाखवायचा नाहीं हें सगळं नेहमींचेच असलं तरी त्या दिवशी दारांतून आंत प्रवेश करतांच एका नोकरानें जी चिठ्ठी माझ्या हातांत दिली ती वाचून मी अगदी अस्वस्थ होऊन गेलों. त्या चिठ्ठींत विशेष असें कांहींच नव्हतें. "तीनचार दिवस झाले. मला कांहीं ताप येतो आहे. त्याचं कांहीं विशेष नाहीं. दगडाला फुलाचें मृदुत्व आणि कांट्याचा बोंचकपणा याची कुठं दाद असते? तापाची आग मला मुळींच दाहक वाटत नाहीं. पण ताई अगदी ऐकत नाहीं. तेव्हां घरीं येऊन माझी प्रकृति जरा पाहून गेलात तर आभारी होईन. कला."

यांतील 'दगडाला फुलाचें मृदुत्व आणि कांट्याचा बोंचकपणा सारखाच' हे वाक्य मात्र मला बोंचत होते. होतकरू चित्रकर्ती, एक प्रेमळ गोड स्वभावाची मुलगी, स्वतःला दगड म्हणवून घेते याच्या बुडाशी काय रहस्य असावे? तारुण्याच्या भरात असलेल्या या गोड पोरीला स्वतःचें फुलपाखरासारखं असणारं जीवन दगडाप्रमाणें अचेतन, बोजड, निर्जीव कां वाटावं? या मुलीच्या चारित्र्याभोंवतीं कसली तरी गुंफण आहे ती तिला जाचक होते, कीं सुखकारक होते हें मला तिच्याशी एक वर्षभर परिचय होऊनही समजलें नव्हतें.

कलेविषयीं मनांत विचार चालू असतांनाच मी तिच्या घरी येऊन दाखल झालों. कॉटवर पडल्या पडल्याच तिनें माझें हास्य मुद्रेनें स्वागत केलें. खिशांतून

नळी काढून तिच्या हाती देत मी स्टेथास्कोप कानाला लावला. तपासणी संपतांच ती ताईना म्हणाली " ताई, चहा आण ना डॉक्टरांना ! "

" वा, डॉक्टर असे रोग्यांचे घरी चहा पीत बसूं लागले तर तिकडे दवाखान्याला कुलूप लावायची पाळी येईल ! "

" दोन मिनिटे वेळ नाही लागत ह चहाला ! "

ताई आंत जातांच मी म्हणालो, 'तुम्हांला ताप कां आला माहीत आहे ?'

" का ? "

" बरेच दिवसांत आलां नाहींत दवाखान्यांत म्हणून ! डॉक्टरकडे नुसतें मधून मधून येत गेले तरी कोठलाही ताप माणसाच्या वाटेला जात नाहीं. "

" आलें होते एकदां दर्शनाला, पण देव्हारा रिकामा आढळला. आपले भक्तगण बसले होते आपली वाट पाहात ! पण मी कांहीं भाविक भक्त नाहीं, तेव्हां आलें झाले परत ! "

तिनें केलेली ही कोटी ऐकून मनापासून हंसूं आलें मला.

" माणसं दगड केव्हांपासून होऊं लागलीं ! "

" लोक दगडालाच देव समजूं लागले तेव्हांपासून ? "

ताईनें आणलेला चहा मी संपविला, आणि उठलों. " औषध पाठवून देतों मी. यांना फार बोलूं देऊं नका; विश्रांति मिळूं द्या " ताईना उद्देशून मी म्हणालों.

" अलिकडे दिवसभर ती स्वतःला चित्राच्या खोलींत कोंडून घेत होती. अन् शिवाय रात्री वाचत बसायची तासन् तास !"

" आतां ताप निघेपर्यंत तरी पडून राहिलंच पाहिजे तुम्हाला !" मी कलेकडे पाहिलें. " बर जातों मी उद्यां येईन परत. "

टांग्याल्याला जरा जलदीनं टांगा हाकायला फर्माविलें मी ! कारण शिशां-

तून घड्याळ काढून पाहिले, तेव्हां कलेकडे चांगलीं वीस मिनीटें मोडली होतीं माझीं असे दिसून आले.

दवाखान्यांतले सारे काम आटोपून घरीं यायला मला एक वाजला. पण रविवार असल्यामुळे त्या दिवशीं संध्याकाळी कांहीं काम नव्हते. त्यामुळे आरामशीरपणें दुपारी व्हरांड्यांत खुर्ची टाकून मी पडलों होतों. कुठल्याही रोग्याविषयीं मी कधीं वाजवीपेक्षां अधिक काळजी करीत नसे. किंवा विश्रांतीच्या वेळीं रोग्याविषयीं विचार करीत बसणे म्हणजे बहुमूल्य विश्रांतिसुखाचा अपमान करण्यासारखें वाटे मला! पण त्या दिवशीं कलेविषयींच्या विचारांनीं माझ्या मनांत—अकारण म्हणतां येईल कां? कलेला मी एक सामान्य रोगी समजत होतों कां? निकट परिचयाचा माझा एखादा मित्र आजारी पडला, तर जे मला वाटेल तेच मला तिच्याविषयीं वाटत होते. ती प्रथम ज्या दिवशीं माझ्याकडे आली, तो दिवस मी कधी विसरणार नाहीं. कांही एक ओळख नसतां अगदीं निर्भयपणें तिनें दवाखान्यांत प्रवेश केला. आणि पट्ट्याने बांधलेल्या आपल्या पावलाकडे अंगुलीनिर्देश करून ती म्हणाली, "पाहतां कां आपण जरा?"

"काय झाले आहे?"

"पडलें सायकलवरून, दगड लागला आहे. चार दिवस वाट पाहिली जखम भरेल म्हणून! पण आज तर जास्तच ठणकतो आहे" कांहीं कांहीं व्यक्तीच अशा असतात कीं, ज्यांचा दुसऱ्याच्या मनावर चटकन प्रभाव पडतो त्या व्यक्तीविषयी एक प्रकारचा गंभीर आदर अगदी लगेच वाटायला लागतो.

त्यापैकीच कला होती. चार दिवस ड्रेसिंग केल्यावर तिची जखम बरी होऊं लागली व ड्रेसिंगची जरूरी उरली नाहीं. "आतां नको ना यायला?" तिनें विचारलें आणि मी चटकन बोलून गेलों "याना आणखी दोन तीन दिवस?" मी असें काय म्हणालों माझे मलाच समजलें नाहीं. आणखी दोन तीन दिवस ड्रेसिंग केलें तेवढ्यापुरत्या मिळणाऱ्या तिच्या सहवासावरून तिचें स्वभाव परीक्षण नकळत

माझ्या मनानें केलें. तिचा मनमोकळा स्वभाव, संभाषणचातुर्य, चेहऱ्यावरचें प्रसन्न हास्य, याचा माझ्या मनावर दराच पगडा बसला. हंसता बोलतांना तिच्या चेहऱ्यावर होणाऱ्या सूक्ष्म हालचालीसुद्धां मी बारकाईनें पाहिल्या. बोलतांना तिची उजवी भुंवई अधिकच वक्र होई. आणि हसतांना ओंठाला जी मुरड पडे ती भारी मोहक भासे. सदाफुलीच्या फुलासारखे सदाच हंसणारे तिचे डोळे म्हणजे दुःखीश्रांत जीवाला ते दोन आनंदसागरच वाटावेत. या प्रसन्नवदनेवर क्षणभर नजर टाकली तरी मनुष्य आपले सारे सुखदुःख विसरून त्याचें भान हरपेल, यांत शंका नाही. निदान माझी तरी अशी अवस्था झाली.

साऱ्यांच्या चेहऱ्यावर मिस्कील हास्यरेषा उमटली. प्रत्येकाकडे रोंखून पहात डॉक्टर म्हणाले, "तुम्ही कां हसतां आहां हे मला ठाऊक आहे, व्यक्ति-व्यक्तींत जें आकर्षण उत्पन्न होतं, तें प्रथम गुणांमुळे होतं असं माझं मत आहे. दोन आकर्षित व्यक्ति स्त्रीपुरुष असतील तर निकट सहवासानें कदाचित तीं दोघ लैंगिक सहवासोत्सुक बनतील. पण त्याचप्रमाणें त्यांच्या भावना पवित्र राहून एकमेकांचे प्रेमळ मित्र बनून राहाणही काही अशक्य नाही.

कलेसारख्या अविवाहित मुलीविषयी तशी भावना माझ्या मनांत उद्भवणं शक्य नव्हतं. परतु ती पुन्हा दिसावी, तिच्याशी बोलावें असं मात्र मला वाटत होतं. त्याकरतां ती आजारी पडेल, पुन्हां सायकलवरून पडेल, तर बरं होईल असा स्वार्थी विचारही माझ्या मनांत चमकून गेला. तिच्याकडून मला एवढीच माहिती समजली होती. ती एक चित्रकर्ती होती. लँडस्केच काढण्याकरिता ती गांवाबाहेर गेली होती परत येताना गाई धावत येत होत्या व वेगांत असलेली सायकल एकदम थांबवतां न आल्यामुळें गाईच्या मधून वाट काढताना तोल जाऊन ती पडली होती. घरीं ती व तिची वडील विधवा वहीण अशा दोघीच रहात असत.

पण तिची माझी भेट व्हायला पुन्हा तिला आजारी पडायलाच नको होतें. दर रविवारीं संध्याकाळीं चित्रपट पहायला जाणें हा माझा अगदीं नित्य-

क्रम ठरून गेला होता. पण त्या रविवारी तिकीटें न मिळण्याइतकी थिएटरवर गर्दी उसळली. त्या भाऊगर्दीत घुसण्यापेक्षां जाऊं रात्रीं सावकाश असा विचार करून मी भटकत भटकत शहराबाहेर आलो. संध्याकाळीं फिरायला मिळणं डॉक्टरी जीवनात मोठी अपूर्वाईचीच गोष्ट ! शहराबाहेरून वाहणाऱ्या नदीच्या कांठीं मी आलो आणि कुठे बसावे म्हणून आसपास पाहिले मात्र ! एका मोठ्या आम्रवृक्षाखाली कला समोरच्या क्षितिजावरील संध्यादेवीचा भव्य रंगपट आपल्या चिमुकल्या कागदावर भराभर चितारून घेत होती.

मी जवळ गेलों. माझ्याकडे नजर जातांच विस्मयाचा भाव तिच्या चेहऱ्यावर उमटला. " सिनेमा थिएटर बंद आहे की काय आज ? "

" मोकळ्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेण्याचा हक्क काहीं चित्रकारांनाच बहाल केलेला नाही ! " यावर फक्त मधुर हास्य केलें तिने !

" तुमचीं चित्रं पहायला मिळतील मला ? "

" कां नाहीं मिळणार ? याल आमच्या घरी ? पण व्हिजीट फी नाहीं मिळायची हं ! "

" चित्र तर मिळेल एकाद ? "

" छे, चांगली नसतात कांही माझीं चित्रं ? उगीच आपला शोक आहे म्हणून काढलें झालं ! या कलेचा व्हावा तसा माझा अभ्यास झालेला नाहीं ? " यावेळीं मात्र मला तिचा चेहरा उदास वाटला. म्हणून मी म्हणालों. " पण मी रविवारीं सिनेमाला जातो हे कसं समजलं बुवा तुम्हाला ? "

" समजायला कशाला हवं ? प्रसिद्ध व्यक्तीच्या बारीकसारीक गोष्टी पण प्रसिद्ध असतात म्हटल ! " नेहमीची प्रसन्नता तिच्या डोळ्यांत पुन्हां खेळूं लागली. नकळत माझी स्तुति करून माझं मन तिनें आपल्याकडे ओढून घेतलें.

यानंतर मी तिच्या घरी चित्रें पहायला म्हणून गेलों. तिच्या खोलीत काढून पुरी झालेलीं, अर्धवट काढलेली बरींच चित्रे पडलीं होतीं. वडील असतांना

त्यांच्याबरोबर तिनें केलेल्या प्रवासांत काढलेले देखावे, कांहीं मॉडेल्स वगैरे होतीं. या कलेंत मला जरी विशेष कांहीं समजत नव्हतं तरी एक चित्र मात्र मला फार आवडलं.

एका स्त्रीचं साधं मॉडेल होतं तें! तोंडवळा कांहींसा कलेसारखा होता. पण चेहऱ्यावर कसल्या तरी गोष्टीविषयीं उत्कंठा, आतुरता जी चित्रीत केली होती त्यामुळें ते आकर्षक व मनोहर वाटत होते. तदनंतर ती माझ्या दवाखान्यांत पेशंट म्हणून नव्हे, तर उगीच वाचलेल्या पुस्तकावर, पाहिलेल्या चित्रपटावर चर्चा करण्याकरितां, कोणाशीं तरी मनमोकळे बोलण्याची जी भूक मानवी मनाला असते, ती तृप्त करण्याकरतां अनेकदां आली होती. आणि मलाही तिच्या सहवासांत निरागस आनंद लाभत असल्यामुळें एक प्रकारचा जिव्हाळा तिच्याविषयी उत्पन्न झाला होता.

एकदां सहज बोलतांना मी तिच्या विवाहाबद्दल सूचक प्रश्न विचारला "लग्नाचा विचार केव्हां करणार तुम्ही! डॉक्टरी शास्त्राप्रमाणें पाहिल तर पंचविशीच्या आंत स्त्रीचं लग्न व्हायला पाहिजे."

"छान, इतके दिवस धर्मशास्त्र हाकाटी करत होतं, आतां हें डॉक्टरी शास्त्र ओरड करणार वाटतं!"

"पण तुमचा कांहीं विशेष उद्देश आहे वाटतं अविवाहित राहाण्यांत? अं?

"असं कांहीं नाहीं. पण...पण, मनाला पटलं पाहिजे ना? छे, तुम्हाला नाहीं समजायचं तें! डॉक्टर म्हणजे शरीरशास्त्रज्ञ निव्वळ! मानसशास्त्राच्या भानगडींत पडूं नये त्यांनीं! अजून कोणालाच पुरतं न उलगडलेलं माणसाचं मन म्हणजे अजब कोडं आहे एक! त्याच्या भावना, विचार, विकार, संवेदना गुंतागुंतीचं जाळंच एक तें! त्यांत पडलं तर आणखीच गुरफाटायला व्हायचं!"

"प्रेमाची भानगड म्हणजे प्रेमभंग का कायसं म्हणतात तसा प्रकार आहे वाटतं कांहीं?"

"तुमची प्रश्नावळ वाढायला लागली हं!" असं म्हणून तिने जे मोकळें हास्य केलें त्यावरून या बाबतीत तिला अधिक स्पष्ट बोलायची इच्छा नाहीं हें मी ओळखलें.

अशा रीतीने पेशंट म्हणून आलेली पण योगायोगाने माझी एक जिव्हाळ्यांची मैत्रीण बनलेली कला आजारी पडून पुनरपि माझी पेशंट झाली होती. कलेचा ताप उतरण्याचें चिन्ह दिसेना. लक्षणावरून ताप विषमाचा आहे हें स्पष्ट दिसूं लागलें. आजपर्यंत कोठल्याही रोग्याची काळजी घेतली नसेल इतक्या काळजीपूर्वक मी तिला ट्रीटमेंट देत होतों. एक दिवस तपासतांना ती म्हणाली ' डॉक्टर मला भीती वाटूं लागली आहे. "

" छे, छे, भिऊं नका मुळीच! तसं भिण्यासारखं कांहीं नाहीच मुळीं ' कांहींशा घाईने मीं म्हणालों.

" तापाला नाहीं हो मी भीत ! वाढलेल्या तापाच्या मुदतीमुळे आपल्या बिलाचा आंकडा वाढत जाईल त्याची भीती वाटते मला ! "

भारी राग आला मला तिचा ! तिने माझ्याकडे इतक्या परकेपणानें पहावें. एक सामान्य रोगी या भावनेनं मी तिच्याकडे येत नव्हतों. एक जिव्हाळ्याचा मित्र किंवा घरचें कोणी माणूस आजारी पडले तर त्याच्याकरितां मी जें केलें असतें तेंच मी तिच्याकरता करीत होतो. माझ्या चेहऱ्यावरून तिने हें ओळखलें असावें.

" रागावलांत डॉक्टर? सहज म्हटलें मी ! " अगदी स्नेहार्द्रपणे माझा हात आपल्या निर्बल हातात ठेवून अशा कांही हास्यमिश्रित करुणाजनक नजरेनें तिने माझ्याकडे पाहिलें कीं मी चट सारे विसरून गेलों.

कलेच्या तापाचा एकविसावा दिवस उजाडला. मी सकाळींच प्रथम तिकडे गेलों. नाडी आणि हृदयाचे ठोके पुन्हां पुन्हां पाहिले. मला लक्षण ठीक दिसेना. मनांत अत्यंत घाबरून गेलों असतांनाही मला बाहेर तसें दाखवितां येईना.

तिची शुद्धी मात्र कायम होती निस्तेज डोळ्यानी जवळ बसलेल्या ताईला तिनें आंत जाण्याची खूण केली. सोज्या कष्टानें उशीखालचा एक बंद लिफाफा काढून माझ्या खिशांत टाकला. नंतर माझा हात हातात धरून निश्चल नजरेनें ती माझ्याकडे पाहात राहिली. माझा हात आपल्या हृदयाजवळ क्षणभर दाबून धरला आणि तिने डोळे मिटून घेतले. मी अगदी विचलित होऊन गेलों. मला कांहीच समजेना हा प्रकार! " कला, " मी तिच्या केसावरून हात फिरवीत सद्गदित कंठानें उद्गारलो. आणि त्या गोड मुलीच्या चेहऱ्यावर तशा स्थितींतही मधुर हास्यरेषा उमटली. रोगी अजूनही आपल्या हातांत येईल अशी मला आशा होती, पण खात्री नव्हती, संध्याकाळींही मी गेलों. माझ्या प्रयत्नाची आणि उपायांची शिकस्त करूनही मला यश आलें नाहीं, रात्रीं दहाच्या सुमारास मला बोलावणे आले, पण मी गेलो तेव्हा कलेचा आत्मा मानवी जीवनापलीकडे गेला होता. त्या मोहक बालिकेचे अचेतन कलेवर पाहून खळकन माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळले या धंद्यामुळे अशा प्रसंगाला सरावलेले माझें मन या भावनाप्रवण मुलीनें अगदी हळुवार बनवून टाकले होतें. अजूनही कलेची मूर्ति माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली म्हणजे माझ्या मनाला काय वाटत तें सांगता येणे कठीण आहे.'

असें म्हणून अत्यंत उदास मुद्रेने डॉक्टरानी रक्षापात्रावरून अर्धवट विझलेला चिरूट उचलला. कलेचा शेवट ऐकून आमची मनें करुण रसांत विरघळून गेली. तरी मी हळूच म्हटले, " पण डॉक्टर त्या पत्रांत काय होतें तें नाहीं सांगितलंत ! "

" हो, बाबू, माझ्याजवळ तें पत्र अजून आहे. मी ते उद्यां तुम्हाला वाचनच दाखवीन. "

बाहेर चक्क ऊन पडले होते. टेनिसकोर्ट खडखडीत सुकला होता; पण आतां खेळावें अशी माझी इच्छा नव्हती. डॉक्टरही हॅट उचलून निघून गेले होते.

दुसरे दिवशी डॉक्टरांना प्रथम मी पत्राची आठवण केली. आणि लगेच त्यांनीं खिशांतून तें पत्र काढून वाचण्यास सुरवात केली:—

डॉक्टर—

तुमच्याविषयी मला काय वाटतें हें मी शब्दांनी सांगूंच शकत नाहीं. ‘जगांत तुला अत्यंत आदरणीय असं काय वाटतं?’ असं जर मला कोणी विचारलं तर मी तुमच्याकडे बोट दाखवीन याचं कारण काय, हेंही मला सांगता येणार नाही. विशेष परिचय किंवा पूर्वमाहिती नसतांनासुद्धां एकाद्या व्यक्ती-विषयी आपल्याला अत्यंत आदर आणि जिव्हाळा वाटूं लागतो! मोठं गूढ आहे नाहीं मानवी आयुष्यांतलं हे एक? मला ठाऊक आहे माझ्याविषयींसुद्धां आपल्या मनांत आदर आणि जिव्हाळा वसत आहे. माझा पूर्व इतिहास जाण-ण्याची तुमची इच्छा आहे नाहीं का? मला तरी इतक्या प्रेमाने विचारणारे दुसरे कोण आहे?

आईचे सुख आम्हाला फारसें लाभलें नसलें तरी वडिलांच्या आत्यंतिक प्रेमामुळे आम्हां दोघी बहिणीचे बालपण अत्यंत सुखांत गेले. आमच्यावरील प्रेमामुळेच आमचे वडील स्वतःच्या दुसऱ्या लग्नाच्या भानगडीत पडले नाहीत. दोन हजार रुपये हुंडा देऊन त्यांनीं ताईला चांगल्या सुस्थळीं दिलें. मला खूप शिकवायचें असें त्यांच्या मनांत होतें. चित्रकलेकडे मूळपासूनच माझा ओढा होता. आम्हाला शाळेंत ड्राइंग शिकवायला जे मास्तर होते ते चांगले चित्रकार होते; पण केवळ आर्थिक अडचणीमुळेच त्यांना मास्तरची नोकरी करणे प्राप्त झाले होते. त्यांची शिकवणी मला ठेवण्यांत आली. त्यांच्या देखरेखीखालीं माझा चित्रकलेचा अभ्यास सुरळीत चालू झाला. आणि तारुण्यसुलभ जिवांचे जे व्हायचें तेंच झालें, म्हणजे आम्ही दोघही एकमेकांवर प्रेम करूं लागलों. आमच्या प्रेमाच्या साऱ्या गुजगोष्टी तुम्हाला सांगत बसलें तर कादंबरीच होईल ती एक! आमचें हें परिवर्तन माझ्या वडिलांच्या ध्यानांत आलें; पण मास्तर

विजातीय असूनही त्यांनी कोणत्याही प्रकारची आडकाठी केली नाही. वडिलांचा प्रेमळ आधार, मोकळें स्वातंत्र्य, अत्यंत रसिक कलावान् प्रियकर! ती दोन वर्षें स्वर्गीय सुखात गेली. तुम्हाला जें चित्र आवडले, ती त्याच्याच हातची एक कलाकृति आहे. लग्न करून घ्यावं असं मला मनापासून वाटे. पण त्यापूर्वी मॅट्रिकची परीक्षा मी नापास झाल्यामुळें वडील जरा रुष्टच झाले. त्यामुळे ही गोष्ट काढायला मला धीर होईना, व लाजही वाटे. तोंच कुठल्याशा संस्थानच्या प्रदर्शनांत मास्तरांच्या एका चित्राला बक्षिस मिळाले व लगेच मास्तराना खास दरबारी आमंत्रण आलें. तो वियोगाचा दिवस मला अजून आठवतो. आम्ही दोघही मोकळ्या मनाने रडलो. त्या रडण्यात सुख होतें आणि दुःखही होतें.

संस्थानांत जम बसतांच आपण विवाहबद्ध व्हायचं असं आमचं ठरलं होतं. पण सहा महिन्यांनीं मास्तर जे या गांवांत परत आले ते सपत्नीकच! आणि त्यावेळीं मला केवढा धक्का बसला असेल याची कोणाला कल्पनाही करतां येणार नाहीं. पुरुष जातीवरचा माझा विश्वास अजिबात उडाला. माझ्यांतील सारी चेतनाच जणूं नष्ट झाली. आकाशांतून निसटलेला तारा पृथ्वीवर पडतांच दगड होतो म्हणतात! मीही प्रीतीच्या हिंदोळ्यावर बसूच स्वप्नसृष्टींत भराऱ्या मारीत होतें; पण तेथून तोल जाऊन पडतांच अगदीं दगड बनले. मास्तर मला भेटायला आले. तेव्हां कठोर शब्दांनीं त्यांची मी खूप निर्भत्सना केली. सनातनी संस्थानाधिपतींच्या मेहेरबानीसाठीं त्यांनीं त्यांच्या पसंतीनें-म्हणजे वशिल्यानें, स्वजातीय अशिक्षित वधूचें लोढणें गळ्यांत अडकवून घेतलें होतें. पुरुषाला प्रीतीपेक्षां मान, पैसा आणि कीर्ती यांचाच हव्यास अधिक प्रिय वाटतो. झाला हा आघात कमीच म्हणून कीं काय माझे प्रेमळ वडील एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून इहलोक सोडून गेले. आणि जगांत मी पूर्ण एकाकी आणि निराधार बनले. आपला सारा पैसा वडिलांनीं माझ्या नांवावर ठेवल्यामुळें उपजीविकेची विवंचना मला नव्हती एवढेंच दुःखांत सुख!

मास्तर संस्थानांत स्थायिक झाले होते. ते मधून मधून मला भेटायला

येत त्यांचें खरोखरच माझ्यावर अत्यंत प्रेम होतें. इतक्या प्रकारांनीं त्यांना मी झिडकारल्यावरही त्यांची माझ्यावरील ती अशीन भक्ति पाहून मला जसं नवल वाटे, तसंच माझं मन त्यांच्याकडे खेचत जाई. त्यांनी माझं नांव अजिबात टाकून दिलं असतं तर कदाचित् कांहीं काळानं मी त्यांना विसरून दुसऱ्या योग्य पुरुषाशीं विवाहबद्ध झाले असतें. पण त्यांच्या प्रेमसिंचनानें माझ्या मनांतली त्यांच्याविषयीचीं प्रीतिवेल, तीन वर्षं होऊन गेलीं तरी मूळ धरून राहिली. त्यांच्याविषयींचा तिटकारा हळू हळू पार नाहींसा होऊं लागला. दगडांत सुद्धां पाझर उद्भवतातच ना? पण लग्न करून त्यांनी जी माझ्या मनाला जखम केली होती, ती भरून येणं शक्य नव्हतं. माझ्या मनाला ती गोष्ट वारवार बोंचत राही. वडील वारल्याला चार वर्षं झालीं आणि अकस्मात ताई विधवा होऊन घरीं आली. ताईच्या त्या दुःखापुढें आपले दुःख कांहींच नव्हे असें मला वाटूं लागले.

मास्तर जेव्हा येऊन मला भेटतात, तेव्हा प्रत्येक वेळी ते मला विनवतात 'माझ्याशी निष्ठुरतेनं वागू नकोस, माझ्या हातून तुझा घोर अपराध झाला आहे. त्याचें वाटेल ते प्रायश्चित भोगायला मी तयार आहे. तुझ्या पैशाचा मोह मला नाहीं, सारा पैसा ताईना देऊन टाक, माझ्या बरोबर चल, आपण दोघं कुठेहीं जाऊं, आणि आपल्या कलेची सेवा करूं. तू सुखी झाल्याशिवाय मला समाधान व्हायचं नाही.'

ते असं बोलू लागले कीं त्याच्या त्या असहाय करुण नजरेकडे पाहून मला वाटतं त्याचं मस्तक घट्ट हृदयाशी धरावं, आणि हळूवारपणे ते थोपटीत म्हणाव,—'माझ्या जिवाच्या राजा, मीच तुझ्या विसाव्याचं स्थान आहे, आणि तूच माझा एकमेव आधार आहेस.' पण असं होण्याच्या आंत कोणी तरी मला मागें खेंचीत म्हणते,—'वेडे पोरी, विवाहित पुरुष! मागें हो, समाज तुला हजारों तोंडानें दोष देईल. तुझं कृत्य निंद्य, दूषणीय ठरेल. एका स्त्रीच्या हक्काची पायमल्ली करणाऱ्या अन् कीर्तीला लालचावलेल्या एका पुरुषाच्या चुकीची भरपाई

स्वतःचं नांवलौकीक बुडवून करतेस! मागे फीर, मोहाचा प्रतिकार कर, चुकीचीं फळं ज्याची त्याला भोगूं देत.'

पुन्हां दुसर मन म्हणतं, 'कां उगीच त्याना दुःखी करून स्वतःही दुःखी होतेस! तुझं सुख तुझ्या हातांत आहे. माणसाच्या हातून एकादी चूक झाली तर त्याचं प्रायश्चित त्याला जन्मभर भोगायला लावायचं? तुझं प्रेम आहे ना त्यांच्यावर? मग इतकं क्षमाशील, उदार नाहीं कां ते?'

डॉक्टर, मी त्यांच्याशीं लग्न केलं तर सारा समाज मला निष्ठुर, दगड, स्वार्थी, मतलबी म्हणून दोष देईल. माझ्या मनाची खरी विकल अवस्था, ओढाताण, आणि तळमळ कोण जाणेल हो? तुम्ही भावनाशील आहांत! तसेच विचारी आहांत. काय करूं हो मी अशा परिस्थितींत? मला कांहीं तरी सल्ला द्या. सुचवा. अगदी चमत्कारिक प्रश्न आहे माझा. द्याल का मला योग्य सल्ला?

आपली

**कला.**

डॉक्टरांनीं पत्रवाचन संपविले, आणि ते म्हणाले, " गोष्टीचें तात्पर्य सांगायचं नसतं नाहीं का रे बाबू? कलेच्या प्रश्नाचं उत्तर आणि तिला सल्ला देण्याची आतां जरूरी नाहीं. पण मला अजूनही वाटतं, योग्य वेळी कलेच्या वडिलांनीं तिचें लग्न केलें असतें किंवा त्या चित्रकाराशीं प्रेमसंबन्ध जमतांच तिचा विवाह त्याच्याबरोबर उरकून घेतला असता तर कलेच्या जीवनाला कांहीं निराळेंच स्वरूप प्राप्त झालें असते तिच्या जीवनाची जी रस्सीखेच झाली आणि अपरिमित असें दुःख जें तीन जीवांना भोगावं लागलं ते लागलं नसतं. अशी आपली माझी समजूत आहे. "

# वादळांतली होडी : : ३

“ शेट पगार जरा लवकर हवाय मला या महिन्याला ! ” बाळूचे हे उद्गार कानावर पडल्यामुळें विचारतंद्रींतून मी जागा झालों. “ पगार ? हो मार्चची पहिली तारीख नाहीं का आज ? आणि बाळू, दुपारचं टपाल नाहीं कां आज ? ”

“ हाय ना ! ” असं म्हणून बाळूनें माझ्या हातांत दोन पत्रं आणि ‘ किर्लोस्कर ’ चा अंक दिला. अंकावरील चित्र न्याहाळीत मी बाळूचा पगार चुकता केला; आणि आरामशीरपणें बसून अंक चाळू लागलों. प्रथम लघुकथा कोणाच्या आहेत हें मी पाहू लागलों. खांडेकरांच्या ‘वादळांतल्या होड्या’ मी क्रमशः वाचीत होतों. पण आज मार्चचा अंक उघडून पहातों तों ‘वादळांतल्या होड्या’ या शीर्षकाखालीं खांडेकरांचे नांव नसून दुसरेंच आहे हें पाहून, गव्हर्नराकरितां खास ठेवलेल्या खुर्चीवर एखादा काळा आदमी येऊन बसला, तर ज्या भयचकित वृत्तीनें आपण पाहूं, त्याच वृत्तीनें मी तें नांव वाचलें; आणि मग समग्र गोष्टही वाचून काढली.

शांता आणि अजय यांनी आपल्या विवाहपूर्व प्रेमाचा इतिहास प्रकाशांत आणून स्वतःच्या वैवाहिक जीवनांतील सुखाच्या मार्गासंबंधीं प्रत्यक्ष खांडेकरांना सवाल टाकला आहे; आणि त्याच अंकांत खांडेकरांनीं ‘पहिलें प्रेम’ या गोष्टीरूपानें त्यांना उत्तर दिलें आहे. शांता आणि अजय यांचें या उत्तरानें समाधान झालें कीं नाहीं कोण जाणे ! परंतु खांडेकर हे केव्हां केव्हां दुसऱ्याच्या

हृदयाला हात घालतात; त्यांच्या गोष्टी वाचून चित्तांत खळबळ उडून जाते. त्यांच्या 'वादळांतल्या होड्या' मी अगदीं जिव्हाळ्याने वाचीत होतों. आणि आतां 'पहिले प्रेम' वाचून माझ्या आयुष्यांत आलेल्या तीन स्त्रिया माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागल्या. पण त्या किती निराळ्या प्रकारांनीं!

आज मंदा घरीं नव्हती. बाळूनें चौपाईवर आणून ठेवलेला चहाचा कप आतां अगदीं गार व्हायच्या बेतांत आला होता. कसाबसा बाळूच्या हातचा तो कडवट चहा संपवून पुन्हां मी आरामखुर्चीवर स्थानापन्न झालों. आपलाही जीवनवृत्तांत लिहून काढावा असं मला वाटूं लागलं; आणि माझ्या आयुष्याचा सारा चित्रपट माझ्या मिटलेल्या डोळ्यांपुढून झरझर सरकूं लागला. मध्येच दारावरची बेल वाजली. 'छे, कोण आलं हें भलत्या वेळीं!' अशा त्रासिक मुद्रेनें मी स्विच दाबून खोलींत प्रकाश पाडला व दरवाजा उघडला. आणि जी व्यक्ति मला दिसली, तिला पाहून हातांतला 'किर्लोस्कर' मी टेबलावर भिरकावून दिला. स्नेहा–माझी स्नेहा–माझी स्नेहा होती ती! "स्नेहा, यावेळीं कुठं तूं इकडे? अन् न कळवतांच!"

"कां ठरलेल्या वेळींच मी यावं एरवी यायला मला बंदी आहे कीं काय!" आपली भिरभिरती नजर चौफेर उधळीत स्नेहा म्हणाली?

"तुला आणि बंदी? मी तर म्हणतो, तूं इथं कायमचीच येऊन रहा म्हणून!"

"मंदा कुठं गेलीय् पण? मी आले आहे सिनेमाला जायला!"

"मंदा गेलीय् माहेरीं कालच! तीच कशाला हवी? आपण जाऊ कीं दोघं!",

"बाळोबानं तुमचा डबा आणून ठेवलेला दिसतोय. जेवा तर मग लवकर!" असें म्हणून तिनें टेबलावरचा 'किर्लोस्कर' घेतला.

"अय्या, 'वादळांतल्या होड्या'! आणि हा कोण नवा लेखक!" माझ्या-प्रमाणें तिलाही आश्चर्य वाटलं. जेवण व कपडे करून मी तयार झालों तोंपर्यंत

तिनेंही दोन गोष्टी वाचून काढल्या. बाहेर पडल्यावर स्नेहा म्हणाली, "किती मार्मिक उत्तर दिलंय नाहीं खांडेकरांनी. सुचलं तरी कसं बाई त्याना? अन् इतकं गोड भाषेंत! पुन्हा कल्पनारम्य तरी किती?

"पण स्नेहा, समाधान होतं का ग तें वाचून? हुषार डॉक्टर आपल्याला न कळत आपल्यावर शस्त्रक्रिया करतो; पण कातडीची झालेली चिरफाड नंतर आपल्याला जाणवतेच कीं नाही? प्रेमभावनेचें खांडेकरांनीं केलेलें हें ऑपरेशन यशस्वी आहे कीं नाही कोण जाणे! पण मानवी जीवनांतील एका उदात्त भावनेची ही चीरफाड, कांहीं म्हण तूं, जरा कशीशीच वाटते!"

"तुम्ही काय म्हणतां मला नाहीं समजत! पण अलीकडील पिढीला हा प्रेमरोग झालेला आहे, अन् साध्या मलमपट्टयांनीं तो बरा होण्यासारखा नाहीं, हें खांडेकरांनीं ओळखल्यामुळेंच त्यावर ऑपरेशनचा ईलाज त्यांनीं केला आहे. सध्याच्या संक्रमणावस्थेंत अयशस्वी प्रेमाचेच दाखले फार! आणि मग स्वतःचें जीवन दुखःमय, निराशापूर्ण झालें असें कल्पून उसासे टाकीत, अश्रु ढाळीत तें कंठण्यापेक्षां, प्रथम वाटणारी प्रेमभावना ही फसवी तात्कालिक असते; जीवनावर तिचा काडीमात्र परिणाम होत नाही; वादळांत सांपडलेल्या दोन होड्या कांहीं काळ एकत्र आल्या तरी वादळ शांत होतांच त्या आपआपल्या निवाऱ्याच्या जागीं निमूट जातात; हें खांडेकरांचें प्रतिपादन अगदीं योग्य नी बरोबर वाटतं मला!" एकदम गर्दीच्या रस्त्यावर आल्यामुळे आमचें बोलणें आपोआप थांबलें. स्नेहाच्या बोलण्यानें माझें मन अधिकच गोंधळून गेलें. चित्रपट पाहून झाल्यावर स्नेहाला पोहचवून मी घरी आलो; पण काही केल्या झोप येईना. आणि म्हणून माझ्या जीवनाचा चित्रपट मी पुन्हा पाहू लागलो.

बावीस-तेवीस वर्षाचा तेव्हां मी असेन! तारावर तेव्हां मी प्रेम करीत होतों. आमच्या या प्रेमाला दोन्हीकडल्या वडील मंडळीचा विरोध तर नव्हताच; उलट उत्तेजनच मिळत होतें. ती आमच्या दूरच्या नात्यांतलीच

होती. आणि तिच्या आईची इच्छा मला जावई करावें अशी पूर्वीपासूनच होती. मग त्यावेळी मी कोणत्या आनंदात, अन मनोराज्यात असेन बरें? जिच्यासाठी दर रविवारीं मी परळवरून सायकलला जोरजोरानें पाय मारीत माहीमला जाई, ती तारा—माझ्या भाग्याचा उगवता ताराच! ती खरोखरीच अप्रतिम सुंदर होती. केतकी वर्णाला खालीं पहायला लावील असा तिचा पिवळा गौरवर्ण, सरळ सुंदर नासिका, काळेभोर पाणीदार डोळे, हंसरी खेळकर वृत्ती नी प्रेमळ हृदय. माझ्यासाठीं तर नुसता जीव टाकी ती! दोन-तीन वर्षांत प्रेमाचे लपंडावी खेळ आम्ही कितीतरी खेळलों. ताराला घेऊन एकदां मला नाटकाला जायचें होतें. तिकिट काढून मी तिच्या घरीं गेलों. आणि आकस्मिक ती बाजूला बसलेली दिसली. किती लाजली ती मला पाहून!

'चल ना,' मी म्हणालों.

"कशी येणार?"

"काय हरकत आहे यायला?"

"आई नाहीं पाठवायची. तिला नाहीं चालायचं अशा स्थितींत घराबाहेर पडलेलं!"

"बर झालं! माझा किती हिरमोड झाला माहीत आहे?"

मी तिच्याशीं मग सात-आठ दिवस अबोला धरला. पण मला फार दिवस राहवले नाहीं बोलल्यावाचून! जोराच्या वाऱ्यानें ढगांची पळापळ होते. तिच्या आईच्या, "कां रे बोलत नाही तुम्ही आतांशीं? भांडता का आत्तांपासूनच!" या शब्दांच्या नुसत्या फुंकरीनेंच अबोल्याचे ढग कुठल्या कुठें पळाले, नी आम्ही दोघांनींही एकमेकाकडे चोरटे दृष्टिक्षेप टाकून मधुर स्मित केलें.

माझी विद्यार्थीदशा संपून लग्नाचे दिवस येतांच पहिला कार्यक्रम झाला तो आमच्या पत्रिका पहाण्याचा! आणि शांत हिरव्या वनश्रीनें नटलेल्या पर्वताचें एकदम ज्वालामुखाचा स्फोट होऊन तप्त भेसूर स्वरूपांत रूपांतर व्हावें, तसेंच अगदीं

झाले! माझ्या ताराला मंगळ असल्यामुळे आमचा विवाहयोग जुळेना आणि आम्ही चितारलेल्या आमच्या मनोहारी भवितव्यतेचे सहारा वाळवंट होणार असें मला वाटूं लागलें. ताराच्या आईचें मत पालटलें. माझे वडील माझी समजूत करूं लागले. अन् तारा?—ती मुळूमुळू रडत बसली. मी तिची भेट घेऊन तिला बंडखोर बनविण्याचा प्रयत्न केला. पण वडीलधाऱ्या मंडळींना दुखवून माझ्याबरोबर येऊन लग्न लावण्याचें तिला धैर्य झालें नाहीं. शिवाय 'आपल्याला मंगळ'–तेव्हां माझ्याबरोबर लग्न केल्यास आपल्या भवितव्यांत कांहींतरी भयंकर गोष्ट घडणार ही तिची श्रद्धा! ताराच तयार नसल्यामुळें मी हताश होऊन गेलो. तिच्या आईनें तिचें दुसऱ्या एका मंगळ्या तरुणाशीं लग्न जमविलें. वडिलांनी माझ्याही लग्नाची खटपट सुरू केली. तारा दुसऱ्याशीं लग्न करणार नाही अशी मला आशा होती. पण कुङ्कुम पत्रिका घरीं आलेली पाहून होती नव्हती ती आशाही नाहींशी झाली. प्रेमभंगाच्या त्या दुःखाचें वर्णन आतां कशाला पाहिजे! ताराच्या लग्नाला वर्ष होऊन गेल्यावर मुली पहाण्याचा तगादा वडिलांनीं माझ्यामागें लावला. आणि मी एक बरीशी मुलगी पाहून ती पसंत आहे म्हणून सांगितलें. आणि एके दिवशीं वाद्यांच्या सुस्वर गजरांत मी तिच्या गळ्यांत विवाहमाला टाकली.

भारीच गरीब पोरगी ती! प्रथम भेटींतच ती इतकी गांगरली–घाबरली कीं नवरा म्हणजे कोणीतरी राक्षसच असला पाहिजे, अशी तिची कल्पना झाली असावी! जगरहाटीप्रमाणें मी तिच्याशीं संसाराला सुरुवात केली; पण ताराच्या आठवणीनें मन वारंवार बेचैन होई–तळमळे. त्या मनाची शांति कांहीं केल्या होईना. तारावर मी प्रेम करीत होतों, आणि आमचें लग्न कां झालें नाहीं वगैरे इतिहास मंदाला उडत उडत समजला. आणि एके दिवशीं मीच तिला समग्र हकीकत सांगितली. "लग्नाला कां आली नाहीं पण ती तुमच्या? आणि तिचें लग्न झालें नसतें तर खरंच, अजूनही तुमच्या सुखाच्या आड आलें नसतें. पण आतां काय उपाय?

ताराइतकी रूपसंपदा मंदाजवळ नव्हती; पण सुंदर स्त्रियांतच तिची गणना झाली असती. तिच्या थोर आणि उदात्त मनाची मला तेव्हांच कल्पना आली. मंदाचें माझ्यावर अपरिमित प्रेम होतें. माझ्या सुखासाठीं ती काय वाटेल तें करायला तयार होती. माझी सेवा करणें आणि माझी आज्ञा पाळणें या दोन गोष्टीइतकी प्रिय गोष्ट जगांत तिला कोणतीच नव्हती. यामुळेंच मीही तिच्यावर प्रेम करीत होतों. तिच्या सुखासाठीं जपत होतों. तिच्या आजारीपणांत शुश्रुषा करीत होतों. तिला सुखी करून मी सुखी होत होतों. अशा थोर, उदात्त गुणांनीं जिचें मन कांठोकांठ भरलें आहे अशा स्त्रीच्या सहवासांत कोणता पुरुष सुखी होणार नाहीं? मला वरवर वाटे, 'सुखी आहे मी! मनासारखा भरपूर पगार, आरोग्यसंपन्न शरीर, सुंदर सुस्वभावी अत्यंत गुणी पत्नी! आणखी तें माणसाला काय हवें असतें?'

पण नाहीं. कशासाठी तरी उगीच माझं मन हुरहुरत होतं. कशाची अतृप्ति माझ्या मनाला जाणवत होती, हें माझं मलाच समजेना. हळूहळू मला तें समजून येऊं लागलं.

मंदाच्या सदा तृप्ततेच्या वागण्यानें माझें समाधान होत नव्हतें. मला जें हवेंहवेंसें वाटे तें मंदामध्यें नव्हतें. मंदा भांडखोर असती, मत्सरी असती, तरी चालली असती; पण आकंठ अतृप्तता तिच्यांत असायला पाहिजे होती. माझा सहवास तिला अपुरा वाटायला हवा होता.

बालपणापासूनच आई आणि बहीण यांच्या प्रेमाला मी मुकलों होतों. माझ्या सहवासांत पहिली स्त्री आली ती तारा!

प्रेमाची खरी उत्कटता, अतृप्तता, ताराच्या अल्प काळच्या मैत्रींतही मी पाहिली होती. तिच्याजवळ माझ्या साऱ्या भावनांना आवेगाचा पूर येई, आणि सारीं विकारांचीं आंदोलनें खळखळून आलेल्या भरतीसारखी भासत. तिचें लग्न होतांच कांहीं काल माझ्या साऱ्याच भावना मृत झाल्यासारख्या वाटल्या, तरी

त्यांना पुनरपि चेतना आणणं मंदाच्या स्वाधीनतेचं होतं; पण तिला तें शक्य नव्हतं.

मुद्दामच मी उशीर करून घरी जाई. मनाला वाटे, मंदाने रागाने म्हणावें, 'किती उशीर करायचा? मला कंटाळा येतो ना?' आणि मग लाडिकपणे मला बिलगून सांगावें, 'लवकर येत जा नं जरा!' आपणही खूप थट्टा करीत तिचा आस्वाद लुटावा; आणि तिनेही आपल्याला कितीतरी वेळ सोडूं नये. ताराच्या सहवासांत असले कांहीं क्षण मी अनुभवले होते.

पण मंदा स्वयंपाक करून नुसती बसून राही. कधीं कधीं तर मी आलों तरी शेजारच्याच बाईशीं बोलत बसे. या एकाच नाहीं, असल्या अनेक प्रसंगांनीं माझी वारंवार निराशा होई. नवराबायकोच्या साऱ्याच गुप्त गोष्टी उघड सांगता येत नाहींत.

रात्रीं पुष्कळ वेळां मी वाचीत बसे. मला वाटे, मंदानें माझ्या हातांतलें पुस्तक ओढून घ्यावे, किंवा पाठीमागून माझे डोळे झांकावे अन् माझ्या गालाजवळ तोंड आणून......पण इतकं सगळं दूरच राहिलं. दिव्याचा तिच्या डोळयांना त्रास होत असला तरी वाचन थांबविण्याविषयीं ती कधीं बोलायची नाहीं. मुकाट्यानें बाजूला तोंड करून झोंपून जायची!

मला वाटे, एकाद्या दिवशीं तिनें म्हणावें, 'मला कंटाळा आला आहे आज स्वयंपाक करण्याचा! आपण आज फिरायला जाऊं अन् हॉटेलमध्यें जेवूं!' पण छे, असला उत्साह, आणि खेळकरपणा—, नांवच नाहीं त्याचं! स्वतःला बरें वाटत नसले तरी ती माझ्यासाठी ताजे जिन्नस करून ठेवील, अन् कांहीं न बोलतां वाढील.

मित्रांच्या संगतीत कधीं अधिक-उणा खर्च करून मी आलों तरी एका अक्षरानें ती मला त्या बाबतींत विचारीत नसे.

"आज उगीचच मी इतका खर्च केला असं नाहीं का तुला वाटत मंदा!" असें मी म्हणालों तर ती उत्तर देई,—'पैसे मिळवणार तुम्ही, खर्च करणार तुम्ही. तुम्हाला योग्य वाटला म्हणूनच खर्च केलांत नं तुम्ही!'

तिच्यासाठी एकादा जिन्नस आणला तर तिला आनंद होई. पण एकादी वस्तु मला पाहिजे म्हणून हट्ट घेणं, त्याकरितां लाडिकपणें आर्जव–विनंति छे,— नांवच नाहीं त्याचं!

माझा स्वभाव नाहींतरी जरा रागीटच! क्षुल्लक कारणावरूनसुद्धां केव्हां केव्हां मंदावर रागावून मी तिला बोले. तिनेंही त्याची परतफेड तशीच करावी ही माझी अपेक्षा; पण उलट बोलणें, अबोला धरणें या गोष्टीच तिच्या गांवीं नव्हत्या. हवेंत सांचलेला केरकचरा वादळानें उडून जाऊन वातावरण स्वच्छ होतें, तसेंच नवरा-बायकोच्या प्रेमगंगेतला गढूळपणा भांडणानें धुवून जाऊन ती पुन्हां निर्मल होते ही माझी समजूत. पण मंदाच्या पतिपत्नीमधील प्रेमाच्या कल्पनाच मुळीं धनी आणि नोकर, गुरु आणि शिष्य अशा प्रकारच्या होत्या. प्रेमळ, बरोबरीची मैत्रीण,–सहचरी अशी मंदा मला हवी होती. तशी ती नव्हती, म्हणून मला आयुष्यांत एक प्रकारचा अपुरेपणा, अतृप्तता, अन् म्हणूनच निराशा वाटत होती. तारा,–तिच्या मैत्रींत घालविलेला काळ, आणि अनुभविलेले सुखाचे क्षण, मी विसरूं शकत नव्हतों.

आणि म्हणूनच, मला वाटतं, तारावर मी पहिले प्रेम केलेंच नसतें, ती माझ्या आयुष्यांत उगवलीच नसती, तर मंदा मला माझें सर्वस्व वाटली असती. तळ्याची विशालता न पाहिलेला मासा विहिरीच्या गुडघाभर पाण्यांत आनंदानें डुबकतोच की नाहीं? तेव्हां पहिल्या प्रेमाची जखम दुसऱ्या प्रेमाच्या मलमपट्टीनें केव्हां केव्हां सुकत असली तरी कांहीं कांहीं व्यक्तींच्या बाबतींतही अशी नकळत चिघळत जाते.

थोडथोडकीं नाहींत; वैवाहिक जीवनांतलीं सात वर्षें हीं अशींच निघून

गेलीं. आणि एके दिवशीं स्नेहानें माझ्या आयुष्यांत प्रवेश केला. भारी अवखळ हंसरी गोड मुलगी! मुलगी कसली! चांगली तरुण स्त्री! लग्न झालेलं नाहीं म्हणून मुलगी म्हणायचं इतकंच! रूपानें फारशी देखणी नसली तरी अतिशय हुषार, मोठी मोहक आणि आकर्षक! तिच्याशी नुसतं बोलत राहिलं तरी मन उत्साहानें भरून जायचं. उगीचच वादविवाद करायची तर तिला भारी हौस! मानी व रागीट तशीच! जें मंदामध्ये मला कधीच दिसलं नाही, तें स्नेहामध्ये मला सारं एकवटून आढळलं. स्नेहाच्या तेजानें मी दिपून गेलों. शांत नंदा-दीपापुढें का कुठे पतंगाला घिरट्या घालण्यांत मौज वाटते! झगझगीत गॅसबत्तीच तो शोधीत असतो.

स्नेहा प्रथम आमच्या शेजारींच रहात होती. स्नेहाशी गप्पा मारण्या-करितां, हंसण्याखेळण्याकरितां सायंकाळी धडपडीने मी घरीं लवकर येऊ लागलों. स्नेहा माझी वाटच पहात असायची, अन् मग वेळ कसा भरकन् जायचा! स्नेहाच्या सहवासांत मी अगदी आनंदित, उल्हासी असतो हें मंदा पाहात होती. पण तिला त्याबद्दल वैषम्य वाटलें नाहीं. आमच्या वाढत्या स्नेहाबद्दल थोडंसुद्धां किल्मिष तिच्या मनांत आलं नाहीं. शांतपणाला आणि सुस्वभावालासुद्धां मर्यादा असावी. आमच्या वैवाहिक जीवनावर स्नेहाच्या रूपानं आलेला धोका पाहून तिनें बिलकूल सावध न होतां झांपड बांधलेल्या घोड्याप्रमाणें सरळ चालावें, यांत तिचा दोष नाहीं का थोडासा!

स्नेहा आणि मी एकमेकांना कितीही आवडत असलों तरी आमची ही आवड शारिरीक सुखाकडे वळली नव्हती. माझ्या विवाहबंधनाची जाणीव तिला आणि मलाही होती. मला वाटत होतं आमची ही मैत्री शुद्ध स्वरूपाची राहील. दोन पुरुषांत नाहीं का गाढ मित्रप्रेम असू शकत? मग त्यांत एक स्त्री असली तर तें राहणार नाही असें थोडेच आहे! मर्यादेचें अतिक्रमण न करणें हें आपल्या हातात आहे. भोळ्या आणि अननुभवी मंदाला हे म्हणणे लगेच पटे.

पण मला मात्र पुढे समजून आले, की दोन स्त्रीपुरुषात प्रेम आणि एकमेकाबद्दल आवड उत्पन्न झाल्यावर दीर्घ सहवासांत राहून त्यांची मैत्री शुद्ध स्वरूपाची राहील अशी अपेक्षा करणं बरंचस असंभवनीय आहे. तशांत परिस्थितिवश होऊन दीर्घकाल अविवाहित राहिलेली स्नेहा,—माझ्यासारखा सहचर अगदी सहज लाभला तर कुठवर तिनं आपलं आत्मसंयमन करावं?

दोष माझ्याकडे अगदी बराचसा आहे हें मला पटतं; पण याला कारण माझं पहिल अयशस्वी प्रेम! ताराने जी जखम माझ्यावर केली, ती स्नेहाच्या सहवासात खरोखरच भरून आली. ताराची स्मृति अजिबात विसरून जाणं जरी शक्य नसलं तरी जीवनांतील उत्कट प्रेमाची तहान, अमूर्त आनंद मला स्नेहाच्या सहवासात लाभला. त्यामुळें ताराची स्मृति आतां मला क्लेशदायक वाटत नव्हती.

स्नेहा दूर रहावयास गेली. त्यामुळे मी तिच्या नित्याच्या सहवासाला बराचसा अंतरलों. अन् पुन्हां माझ्यांतला उत्साही खेळकरपणा लुप्त होऊन मी कांहींसा अतर्मुख विचारदृष्टीचा बनलो. मंदाच्या सौजन्यपूर्ण वागण्यानें आणि उदार अंतःकरणामुळे आमच्या मैत्रींत जसा खंड पडत नव्हता, तशीच स्नेहाच्या त्यागबुद्धीमुळें आणि औदार्यामुळें मंदाच्या वैवाहिक हक्कांवर गदा येत नव्हती. पण त्यामुळें जीवनाच्या पूर्णतेचें सुख मात्र मला कधींच लाभलें नाही.

तेव्हां खांडेकर म्हणतात त्याप्रमाणें पहिलें प्रेम हें एक वादळ असलें तरी त्या वादळांत ज्या दोन होड्या जवळ येतात त्यांत एकमेकींच्या संघर्षानेंच एकादी जायबंदी होण्याचा बराच संभव असतो. आणि मग रखडत कशीबशी किनाऱ्याला लागली तरी तिची पूर्वीची बळकटी आणि डौलदारपणा तिला पुन्हां प्राप्त होत नाहीं.

# रिकामी खुर्ची : : : ४

ज्या वेळी माझें हें पत्र आपल्या हातांत पडेल त्या वेळीं आपल्या-भोंवतीं रोग्यांची बरीच गर्दी जमलेली असेल आणि माझी खात्री आहे, कीं त्या वेळी आपण तें पत्र बाजूला सारून ठेवाल आणि साडेअकरानंतर नितान्तपणीं आपल्या त्रिकोनी खुर्चीत बसून जेव्हा वाचायला सुरवात कराल तेव्हां तिसऱ्या यत्तेवर व्याकरणाचा रुक्ष पाठ घसा खरवडून मी मुलींना पढ-वीत असेन. पण तरीसुद्धां डॉक्टर आपले पत्र या वेळी वाचीत असतील याची मधूनमधून आठवण झाल्यावांचून राहाणार नाहीं. ही प्रस्तावना पुरे करते आतां !

मुख्य मुद्दा असा, कीं परवा आपण म्हणालांत, 'प्रभातची नवी फिल्म लागली कीं आपण पहिल्याच आठवड्यांत जाऊं.' पण माझी आपल्याबरोबर यायची इच्छा नाहीं. कारण काय विचाराल तर तें असें, कीं माझ्याशेजारी बसा-यला आपल्याला आवडत नाही असे दिसते. माझ्यापासून आपल्याला जर कांही त्रास होत असेल तर एकत्र जाण्यांत तरी अर्थ काय? अगदी पहिल्याच वेळी आपल्याला संकोच वाटत असेल म्हणून मीच नाही का उठून जवळच्या सीटवर बसले? पण दुसऱ्या वेळीं मुद्दामच एक सीट सोडून बसण्याचा सभ्यपणा(?) (कीं शिष्टपणा?) दाखवलांत तेव्हा मला माझा किंचित अपमान झाल्यासारखेंच वाटलें! त्या दिवशी गर्दी नव्हती म्हणून ठीक; नाहींतर ती मधली सीट मोकळी का राहिली असती? तुमचा माझा परिचय होऊन वर्ष झालें. इतक्या निकट परिचयांतल्या मुलीच्या शेजारीं बसण्यांत काय मोठा नैतिक गुन्हा होतो कीं

काय, ते मला समजत नाही. तेव्हां प्रभातचा नवा चित्रपट लागला की आपण अगोदर पाहून या. मागाहून मी पाहीन. आणि मग आपण शेजारच्या नव्हे, तर समोरासमोरच्या खुर्च्यांवर बसून त्यावर बोलूं. समजलें कां?

आपली,

**शोभना.**

शोभनेनें वरील पत्रावरून पुन्हां एकदां झरकन् नजर फिरविली' लिफाफ्यांत घालून तो बंद केला. पण पर्समध्यें बराच वेळ धुंडूनहि तिला तिकिट सांपडलें नाहीं. तिनें आपल्या मनगटावरच्या घड्याळांत पाहिलें. साडेचार वाजून दहाच मिनिटें झालीं होतीं. पण शाळेतील साऱ्या मुली आणि शिक्षक मंडळी निघून गेल्यामुळे उन्हाळ्यांत सुकून गेलेल्या तळ्याप्रमाणें किंवा हिवाळ्यांत पर्णहीन झालेल्या वृक्षाप्रमाणें सारी इमारत तिला शुष्क, उजाड दिसत होती. गोविंदा शिपाई आवराआवर करण्यांत गुंतला होता. त्याचें काम संपायला अजून बराच अवकाश लागेल हें पाहून शोभनेनें झटकन् छत्री घेतली व झपाट्यानें पोस्ट ऑफिसचा रस्ता धरला. पोस्ट जवळच असल्यामुळें पांच मिनिटांत ती तिथे पोंचली. तिकिट लावून ती पेटीजवळ गेली आणि क्षणभरच पत्र टाकतांना तिचा हात थबकला. टाकावें का हें पत्र? बरें दिसतें का असें लिहिलेलें आपण? कीं टाकूंच नये? पण मनाचा निर्णय होण्याच्या आंत पत्र हातांतून पडले सुद्धां!

दुसरेच दिवशीं दहा वाजतां आपल्या टपालांत निळ्या रंगाचा, सुंदर हस्ताक्षराचा लिफाफा पहातांच डॉ. नवीनचंद्र प्रथम जरा चकित झाले! पण लगेच तो कुठून आला आहे तें त्यांनीं ओळखलें व 'डू युवर ड्यूटी' अशीं अक्षरे खोदलेला एक जाड पेपरवेट त्याच्यावर ठेवून ते आपल्या कामाला लागले. पण मग रोग्यांशी बोलतांना, त्यांना तपासतांना सुद्धां काय बरें त्या पत्रांत असावे, अशा कुतूहलाचा प्रश्न त्यांच्यापुढें सारखा उभा रहात

होता. साडेअकरापर्यंत त्यांची उत्सुकता चांगलीच ताणली गेली ! पण त्यांना पूर्णपणे एकान्त तोपर्यंत लाभला नाही त्याला ते तरी काय करणार ? साडे-अकरा वाजतां त्यांनी तो पेपरवेट उचलला व ते पत्र उघडून वाचण्यास सुरवात केली. सुरवातीला असलेले त्यांचे हास्यवदन पुढे गंभीर होत चालले आणि शेवटीं तर विषादाची अस्पष्ट छटा त्यांच्या चेहऱ्यावर उमटली. कसा आता हिचा गैरसमज दूर करायचा ? हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे पडला. हातांत पत्राची घडी धरून पांच मिनिटें ते त्याच विचारात स्वस्थ बसून राहिले. पण लगेच त्यांना एक कल्पना सुचली. शेजारच्या इराण्याच्या हॉटेलमध्यें जाऊन त्यांनी टेलिफोनचा रिसीव्हर हातीं घेतला. शोभनेच्या शाळेंत टेलिफोन नव्हता; पण तिच्या शाळेजवळच तिची मैत्रीण वत्सला काळे राहात होती, ती त्यांची पेशंटहि होती, त्यांनी तिचा नंबर फिरविला.

"हॅलो ! कोण ? वत्सला ? जरा एक काम कराल का ? अं ! शोभना-बाईंना कळवा मी संध्याकाळीं त्यांना बोलावलंय दवाखान्यांत केव्हाहि आठ वाजेपर्यंत म्हणून ! आत्तांच कळवा हं ! थँक्स !" रिसीव्हर ठेवून कांहींशा उल्हसित मुद्रेनें डॉक्टर घरीं निघून गेले.

संध्याकाळीं साडेपांच वाजल्यापासून डॉक्टरांकडे गर्दीच होती; काम करतां करतां त्यांची नजर वारंवार दरवाजाकडे वळे. शेवटीं अपेक्षित पदरव त्यांना ऐकूं आला. स्प्रिंगचा दरवाजा किंचित् किलकिला झाला व हवा असलेला मुखचंद्रमा दृष्टीस पडतांच हसऱ्या चेहऱ्यानें डॉक्टर म्हणाले,

"या ना आंत. बसतां जरा ? होतोंच आहे मी मोकळा तोंपर!"

शोभना एका खुर्चीवर बसली. जवळच्या दोनचार रोग्यांची योग्य ती विचारपूस करून व औषधपत्रिका त्यांच्या हातांत देऊन त्यांना जायला सांगितल्यावर डॉक्टरांनीं शोभनेकडे पाहिलें.

तुमचं पत्र मिळालं बरं का ! अगदींच गैरसमज झालाय् तुमचा !"

"असं! तो कसा काय?"

आणि डॉक्टर यावर कांहीं बोलणार तोंच एक गृहस्थ आंत आले. स्प्रिंगचा दरवाजा थोडा वेळ हवेंत हेलावला. आलेल्या रोग्याला आंतल्या खोलीत नेऊन तपासल्यानंतर औषधपत्रिका लिहून त्याच्या हातांत दिली तरी तो तिथेंच बसला. ओळखीचा पेशंट झाला म्हणून काय झालें! काम झाल्यावरहि निरर्थक गोष्टी करण्यांत डॉक्टरांचा वेळ घ्यायचा म्हणजे काय! मनांतल्या मनांत शोभना अगदीं चिडून गेली होती. तिनें डॉक्टरांकडे पाहिलें. त्यांचे लक्ष त्याच्या बोलण्याकडे नव्हतें; पण लक्ष आहे असें ते भासवीत होते. फारसें बोलण्याचा त्यांचा स्वभावच नसल्यामुळें बोलणाऱ्या व्यक्तीकडे नुसतें पाहात राहाण्याची त्यांना संवय होती. आतांहि ते नुसते त्याच्याकडे पाहातच बसले होते, तरी कधीं हा प्राणी उठतोय् असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला शोभनेला दिसत होता. आणि त्यामुळें त्या स्थितींतहि तिला हसूं येत होतें. शेवटीं तो गृहस्थ लवकर उठण्याचें कांहींच लक्षण दिसेना. तेव्हां शोभना उठली. तिला उठलेली पाहातांच करुण नजरेनें डॉक्टरांनीं तिच्याकडे पाहिलें.

" निघालांत? उशीर होतो आहे तुम्हांला? बरं तर!" असें म्हणून ते दोन पावलें पुढें आले. शोभना रस्त्यावर जाईपर्यंत त्यांनीं तिच्याकडे दृष्टिक्षेप टाकला आणि पुन्हां ते आपल्या जाग्यावर बसले. " कोण त्या?" अशी पृच्छा त्या गृहस्थानीं करतांच " आहेत माझ्या एक पेशंट " असें मोघम उत्तर त्यांनीं हिरवटपणें दिलें.

शोभना घरीं आली तेव्हां साडेसात वाजून गेले होते. उशीर होईल असा निरोप आगाऊच पाठविला होता तरी " कुठं गेली होतीस?" असा मावशीनें प्रश्न विचारला तर उत्तर काय द्यायचें हे ती मनाशीं ठरवीत होती. झपाझप दोन जिने चढून ती गॅलरींतून दारापर्यंत आली. दार उघडेंच असून टेबलापाशीं शरद पुस्तक वाचण्यांत गढून गेल्याचें तिनें पाहिलें. मधल्या

खोलीत जाऊन पातळ बदलतांना तिने स्वयंपाकाच्या खोलींत वाकून पाहिलें. मावशी पोळ्या करण्यांत अगदी गर्क झाली होती. " मावशी, झाला का ग स्वयंपाक ? " असें म्हणत ती नळावर गेली. तरी तिला तो प्रश्न ऐकावाच लागला–" शोभा, कां ग आज उशीर एवढा ? "

पण आपण जणू हा प्रश्न ऐकलाच नाहीं असें दाखवून शोभनेनें न्हाणी-घरांतला नळ जोराने सोडला आणि टॉवेलने तोंड पुशीत ती मावशीला म्हणाली " कोण भूक लागली आहे मला मावशी ! कधी बाई हा शरद् पुस्तकांतून डोकं काढणार आहे ? मला एकटीलाच वाढ नाहींतर ! "

" हं, शोभाताई, पुढे आम्ही एकटेच जेवणार आहोंत. आतांच कंटाळूं नका आम्हांला म्हटलं ! " असें म्हणत शरद् बुटानिशीच स्वयंपाकखोलींत शिरला.

" अहो बाईसाहेब, बाहेर व्हा अगोदर ! मावशी दोघांनाही वाढणार नाहीं अशानं. अन् आल्यापासून कपडे काढायचे नाहींत का रे ? "

" कपडे काढून शोभा करूं कीं काय माझी ! बदलून येतों हवे तर ! "

" बरं. पुरे कर वात्रटपणा ! पानं घेतें मी, तोंवर ये पाहूं लवकर ! "

जेवतांना शरद् मिस्किलपणानें तिला म्हणाला, " शोभाताई, देशपांडे वकील भेटले होते मला ! मी त्यांना म्हटलं, ' ताईला कां हो नाहीं भेटत तुम्हीं?

" शरद् , बघ हं ! दुसरं कांहीं बोलतांच येत नाहीं का तुला ? "

" पण ताई, त्यांना तूं कां नकार देते आहेस ग ! त्यांना टक्कल पडलेलं आहे आणि त्यांची चालण्याची ढब तुला पसंत नाही, एवढ्यामुळंच तूं त्यांना निराश करणार ? काळ फिरला बरं मावशी ! या मुली मिळवत्या झाल्या नी खुशाल एवढ्यातेवढ्या कारणावरून चांगलीं स्थळं नाकारूं लागल्या. ए ताई, बिचारे देशपांडे ! मला दया येते ग त्यांची ! "

" बरं बरं, पायजम्यावर आमटीचा थेंब पडलाय बघ ! त्या सफेद पायजम्याची दया कर अगोदर ! "

मागल्या भाताचे भराभर चार घास कोंबून आणि घटघटा—दोनतीन पेले पाणी पिऊन शरद् उठला. तो गेल्यावर मावशी जरा गंभीरतेनें म्हणाली, " शोभा, तुझ्या मनांत तरी काय आहे ? लग्न करायचच नाहीं का तुला ? इतके दिवस तें ठीक होतं. तुझी आई गेल्याला पांच वर्षं होऊन गेली. तुझ्या इच्छेप्रमाणं तूं आतां स्वतंत्रपणानं मिळवूं लागलीस. आतां तरी नको का लग्नाचा विचार करायला ? "

शोभना खरें म्हणजे आज अगदीं त्रासून गेली होती ! त्यांत मावशीनें नेमका नको तोच विषय काढला. ! पण आनंदी, सहनशील, शोभनेनें शांतपणें उत्तर दिले, " करूं ग मावशी त्याचा विचार सावकाश ! मला जेवूं देतेस कीं नाहीं आतां स्वस्थपणानं ? "

" नेहमीच असं कांहीं तरी बोलून विषय बदलतेस शोभा तूं ! मला बाई एक शंका येऊं लागलीय् त्यामुळं ! "

" कोणती ग ? "

" कुठं तरी जमलंय् कीं काय तुझं ? लव्ह कीं काय म्हणतात तें—एरवीं देशपांडे वकिलासारखं चांगलं स्थळ तूं का गमावलं असतंस ? "

" इश्श ! सुतावरून स्वर्गाला जाते आहेस तूं मावशी ! आणि तुटक्या सुताचा आधार आहे का धड ? " असें म्हणून ती उठली.

गॅलरींतल्या आरामखुर्चीत ती येऊन बसली तेव्हां तिच्या मनांत तेच विचार येत होते. देशपांडे वकिलांत नांव ठेवायला खरोखरच कुठें जागा नाहीं. पण काय असेल तें असो, मला कांहीं त्या व्यक्तीबद्दल तसें कांहीं आकर्षण किंवा आदर वाटत नाही. खुंटासारखें ताठ उभें राहून ते चालणें, डोळ्यांतील अहंमन्यतेची

ती छाया आणि अकालीं पोक्तपणा आणणारें तें डोक्यावरलें टक्कल ! छेः ! शिसारीच येते मला ! मालतीला कसें सांगायचें हें ? तिला वाटतें, पोरगी असलें सुस्थळ हातचें दवडते आहे, म्हणजे ती मूर्खपणा करीत आहे ! पण वयाबरोबर आम्हांला स्वतःच्या आवडीनिवडीचीं जी विशिष्ट मतें फुटतात, तीं कोणी विचारांतच घेत नाहीं ! आणि दुसरी जी शंका तिनें घेतली ती खरी आहे का पण ? हो, खरी नाही तर काय ? डॉ. नवीनचंद्र ! त्यांच्याविषयी काय वाटतें मला ?

हा विचार मनांत येतांच तिच्या गंभीर मुद्रेत एकदम बदल झाला ! मनाशींच गोड गोड हसली ती ! क्षणभर लाजून तिनें जमिनीकडे पाहिलें आणि आसपास अंधार होता तरी कोणी पाहात तर नाहीं ना आपल्याकडे, म्हणून बावरून तिनें इकडेतिकडे पाहिलें. कोणी नाहीं अशी खात्री झाल्यावर पुन्हां ती त्या स्वप्नसृष्टीत दंग झाली. कां वाटावें पण त्यांच्याविषयीं असें आपल्याला ? ते कधीं धड बोलायचे नाहींत ! बोलले तर तात्विक चर्चा नुसती ! कधी त्यांत विनोद असायचा नाहीं ! कधीं कांहीं आपण होऊन विचारायचे नाहींत ! आपण विचारलें तर तुटक अन् मोडकी उत्तरें मिळायची ! सदान् कदा आपल्या व्यवसायांत दंग ! आणि तरी...तरी त्यांचा सहवास मधुर कां भासतो आपल्याला ? एखाद वेळच त्यांची आपली नजरानजर झाली तरी त्यांच्या त्या टपोऱ्या पिंगट डोळ्यांत प्रीतीची चमक असावी असा भास कां होतो आपल्याला ? अन् हा एखादा क्षण सोडला तर एरवी रुक्ष, कोरडे कां वाटतात त्यांचे डोळे ? त्यांना वाटत असेल का माझ्याबद्दल कांहीं ? कीं साध्या मैत्रीच्याच दृष्टीनें पाहातात ते ? काय आहे त्यांच्या मनांत ? बोलत कां नाहींत ते ? माझ्याबद्दल त्यांच्या मनांत मुळींच प्रेमभावना नाही म्हणावें तर माझ्या भेटीकरितां ते आतुर कां होतात ? नाहीं म्हणावें तर असे दूरदूर कां राहातात ? चित्रपटगृहांत एक खुर्ची मध्यें सोडून बसवतें तरी कसें त्यांना ? माझ्या जिवाची कोण तळमळ होते आहे याची कल्पना तरी असेल का त्यांना ? मी

विचारूं का स्पष्टच एक दिवस ?

छे ! या बाबतीत पुरुषांनींच प्रथम बोललें पाहिजे नी विनवले पाहिजे. स्त्रीचा मान केव्हांहि मोठा आहे. ती कितीहि प्रेमविव्हल झाली तरी लाचार होणार नाही. अन् आपण विचारून त्यांच्या मनात कांहींच नसलें तर केवढी मानखंडणा होईल आपली ! छे ! स्वस्थ राहून वाट पाहावी कांहीं दिवस, दुसरा उपाय नाही ! माझ्या पत्राने कांही राग आलेला दिसत नाहीं. 'तुमचा गैरसमज झालाय्' म्हणे ! कसला गैरसमज ? पण एवढ्यावरून आशा करायला कांही सबळ जागा नाही. हं, पण असे केलें तर ? छान ! छान युक्ति सुचली ! नवीनचंद्रांचें खरें मनोगत बाहेर निघायला या देशपांडे वकिलांचा उपयोग करून घ्यावा. आपले हृदगत गुप्त ठेवूनहि आपल्याला डॉ. नवीनचंद्रांचें मन समजून घ्यायला हा मार्ग उत्तम ! देशपांडे वकिलांचे मनांतून मला आभारच मानले पाहिजेत.

शोभनेची ही विचारमालिका गुंफण्याचें काम आणखी कितीतरी वेळ चाललें असतें. पण शरदच्या हांका ऐकून तिला आंत जावें लागलें.

सातआठ दिवसात शोभना येऊन जाईल अशी डॉ. नवीनचंद्रांची अपेक्षा होती. परतु त्याची निराशा झाली. शोभनेच्या दर्शनानें त्यांना अत्यंत आनंद होई. तिचें विनोदप्रचुर बोलणे सारखे ऐकत राहावें असें त्यांना वाटे. तिच्याविषयी त्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न झालें होतें. शोभनेचा निरंतर सहवास आपल्याला लाभला तर आपण किती भाग्यवान होऊं, असा विचार त्यांच्या मनात अनेकदा येऊन जाई. डॉक्टरीची पदवी घेऊन स्वतंत्र दवाखाना घातल्याला त्याना दोन वर्षे झाली होती. आणि अनेक मुली सांगून येत असूनहि केवळ प्रेम आणि स्वभावसाधर्म्य जमल्याशिवाय विवाह करणें पसंत नसल्यामुळेंच ते अजून अविवाहित राहिले होते. परंतु शोभनेचे रूपगुण त्यांना आवडत असून, तिच्याविषयीं त्यांना प्रेम उत्पन्न झालें असूनहि, प्रत्यक्ष तिच्याजवळ तसे बोलणे किंवा अन्य मार्गानें आपले प्रेम व्यक्त करणें त्यांना

बिलकूल जमत नव्हते. कदाचित आपल्याकडून अतिरेक झाला, आपली वागणूक तिला लघळपणाची वाटली तर तिच्या मनांतून आपण उतरूं अशी त्यांना भीती वाटे ! नव्हे, तशी त्यांची समजूत झाली होती. प्रौढ, शिकलेल्या आणि त्यांतून मिळवत्या स्त्रिया पुरुषाशी मोकळेपणाने वागतात म्हणून आपण त्याचा अर्थ आपल्याला पाहिजे तसा घ्यायचा नसतो. बहुधा लग्नाची बेडी त्यांना नको असते. मित्रत्वाच्या नात्यानें ती आपल्याशी वागत असतांना आपण प्रेमाविषयी, म्हणजे पर्यायानें लग्नाविषयीं बोलायचें हे तिला मुळीच रुचणार नाही. तिच्या मनांत तशी कांही भावना असेल तर स्पष्टच ती त्या बाबतींत बोलेल. तितकी ती धीट आहे.

कितीहि शिकलेली आणि स्वतंत्र मताची हिंदु मुलगी आपली प्रेमभावना मोकळेपणाने व्यक्त करूं शकत नाही, हा स्त्रीस्वभाव डॉक्टरांना मुळीच अवगत नव्हता. त्यामुळें ते शोभनेशीं अत्यंत आदराने परतु परकेपणानें वागत.

पण शोभनेचें तें पत्र वाचून त्यांना प्रथम जरी विषाद वाटला तरी त्यांच्या अंतःकरणांत जोराची खळबळहि पण उडाली. तिचा गैरसमज झाला आणि आपणहि आपल्या मनाशीं भलतीच अटकळ बांधून बसलों होतों तर ! आपला सहवास आणि ओझरता स्पर्श तिला सुखद वाटतो, इतकेंच नव्हे, तर आपण एक खुर्ची मध्यें सोडून बसलों तर तिला तें अपमानास्पद वाटतें ! म्हणजे आपल्याविषयीं तिला खात्रीनें कांहीं तरी वाटत असलें पाहिजे. मग आपलें हृद्गत तिच्यापाशीं उघडें करायला काय हरकत आहे ? कोणत्या शब्दांत सांगावें ? लेखी कीं तोंडी ? त्यांनीं पुष्कळ विचार केला आणि शेवटीं ठरविलें, कीं ती मानी मुलगी इतक्यांत कांही यायची नाही. आपण पत्र पाठवून तिला भेटण्यास बोलवावें आणि आपलें मनोगत तिच्याकडे प्रकट करावें. ठरविलेला हा विचार त्यांनीं लागलीच अंमलांत आणला. रविवारीं संध्याकाळीं वरळी चौपाटीवर भेटण्याविषयीं त्यांनीं तिला लिहिलें.

आणि मग ते दोनतीन दिवस गणून रविवार कधी उजाडतोय असं त्यांना झालं! तिच्याजवळ कसं बोलायचं याची वारंवार उजळणी त्यांनीं आपल्या मनाशी केली. त्यामुळं त्यांना ती वाक्यं अगदी पाठ झाली. पण रविवारी संध्याकाळीं परीटघडीचा सूट पेहरताना मात्र त्यांचं हृदय धडधडतच होते. रोग्याच्या हृदयाचे ठोके मोजणाऱ्या डॉक्टरांनीं स्वतःच्या हृदयावर स्वतःच हात ठेवला! तरी निघतांना आरशात आपला चेहरा वारंवार न्याहाळून पाहायला मात्र ते विसरले नाहीत.

शोभना येईल का पण? पत्र पाठविण्याचें आपण धाडस केलें तें तिला रुचलें नसेल तर? ती रागावून कांही बोलली तर? आपल्या हृदयांत जपून ठेवलेलें प्रेमपुष्प आपण तिला वाहायला गेलों आणि तिने ते उपहासानें चुरगळून दूर फेकून दिले तर? अशा अनेक शंकाकुशंकांनी त्यांचें मन व्यथित झालें. त्यामुळें स्वच्छ धुतलेल्या आणि हलक्या हातानें लाविलेल्या स्नोमुळें आलेला चेहऱ्यावरचा तजेला पार मावळून गेला. विवक्षित स्थळीं शोभना बांकावर बसलेली पाहून त्यांच्या चेहऱ्यावर जशी आनंदाची एक ऊर्मि उसळली तसेच भीतीमुळे घर्मबिंदूहि उवरले. तिच्या शेजारी बसत प्रथम त्यांनी रुमालाने कपाळावरचा घाम पुसला.

"कां बोलावलंत?" शोभनेचा चेहरा अगदी उल्हासित दिसत होता. आणि नेहमीप्रमाणेच ती गालांतल्या गालांत हसत होती.

"नाही. सहज! तुम्ही कांही आला नाहीत सातआठ दिवसांत! आणि दवाखान्यांत निवान्त वेळहि नाही मिळत हल्ली! तेव्हां म्हटलं आज रविवार आहे..."

"काय बोलायचय एवढ निवान्तपणीं आपल्याला?

"तसं कांही नाही. पण त्या दिवशीं तुमचा अपमान झाल्यासारखं जें तुम्हाला वाटलं त्याबद्दल क्षमा मागायची आहे. माझा तसा मुळींच हेतु

नव्हता " बोलताना आपल्याला जे बोलायचे आहे ते हे नव्हे, हे त्यांना समजत होतें आणि जे बोलायला हवें ते शब्द बाहेर येत नाहींत याबद्दल त्यांना स्वतःचीच चीड येत होती. त्याचे असह्य प्रमाण त्यांच्या त्रासिक मुद्रेवरून व शरिराच्या हालचालींवरून सहज अजमावता येत होते.

शोभना हसूं लागलेली पाहून ते थांबले.

" डॉक्टर, मला मात्र निवान्त बोलायचय खरं तुमच्याशीं. "

" काय बोलायचंय् ? बोला ना ? " डॉक्टरांच्या कानांत त्यांचा सगळा जीव एकवटला.

" देशपांडे नांवाचे एक वकील—वय वर्षं तीस, प्रॅक्टिस असेल दोनशें-तीनशेंची—माझ्याशी लग्न करूं इच्छीत आहेत. मावशी आणि माझा मावसभाऊ शरद् दोघांनाहि ते अगदीं पसंत आहेत. पसंतीचा शिक्कामोर्तब मारायचं मीच तेवढं शिल्लक ठेवलं आहे. " बोलतांना तिचें सारें लक्ष डॉक्टरांच्या चेहऱ्यावर खिळलें होतें. त्यांच्या चेहऱ्यावर कसकसे पालट होतात ते ती लक्षपूर्वक पाहात होती. "

" तेव्हां मी होकार द्यावा किंवा कसं ? याबद्दल आपण मला सल्ला द्यावा.'

" पण त्या वकिलांबद्दल तुम्हाला काय वाटतं हा प्रश्न महत्वाचा आहे, नाही का ?

" अं ?...काय वाटतं म्हणजे ? मला कांहीं वाटत नाहीं. चालून आलेलं एक चांगलं स्थळ याच दृष्टीनं मी पाहातें त्याकडे.

" पण तुमच्यासारख्या सुशिक्षित कुमारिकेनं स्वभावसाधर्म्य आणि प्रेम-भावना यांचा विचार करायला नको काय ?

" अवश्य हवा. पण प्रीतिसाफल्याचा आनंद सर्वांच्याच वांट्याला कुठं असतो ? "

" कुणावर तरी तुम्हीं प्रेम केलं होतं का? शोभना, प्रेमसाफल्याचा आनंद तुम्हाला मिळाला नसला तरी मला मिळवून देतां का?"

" म्हणजे ?"

" म्हणजे शोभना, मी आणि देशपांडे यांची तुलना करा तुम्ही... आणि जर योग्य वाटल तर..."

" इश्श ! काय बोलतां तुम्हीं हें ? स्त्रीस्वभावाचा अगदीं मुळींच परिचय नाहीं ना ? माझं मन अजून ओळखलं नाहींत ना तुम्ही ?"

असें म्हणून शोभनेनें गोडसें लाजून डॉक्टरांकडे पाहिलें. तिच्या त्या नजरेंत जणूं आतांपर्यंत तिनें लपविलेलीं सारीं प्रीतिपुष्पें फुललीं होतीं. आनंदातिशयानें डॉक्टरांनीं तिचा हात घट्ट धरला. " मग कां असा लपंडाव ? शोभा !" त्यांच्या आवाजांत जो कंप होता त्यांतच तिच्याविषयींचा सारा जिव्हाळा ओसंडून भरला होता.

पुढल्याच रविवारीं मेट्रोमध्ये तीं दोघें चित्रपटाकरितां आलीं.

" इथं मधली खुर्ची रिकामी ठेवतां येणार नाहीं. तिकिटावरच्या नंबराप्रमाणं बसलं पाहिजे म्हणे !" मिस्किलपणें शोभना म्हणाली.

हसत हसत डॉक्टरांनीं तिला बसवलें आणि तिच्या शेजारीं बसत ते म्हणाले,

" दोघांच्या हृदयांत तरी आतां जागा रिकामी कुठं आहे ?"

" पण पहिल्यानं मधली खुर्ची रिकामी ठेवल्यामुळंच माझा गैरसमज झाला आणि म्हणून तर देशपांडे वकिलांची त्यावर मला स्थापना करावीशी वाटली !"

" वा, छान! दुसऱ्याचं मनोगत काढण्याची तुमची ही युक्ति और आहे! शोभा!"

इतक्यांत त्या भव्य, बादशाही चित्रपटगृहामधला प्रकाश हळूहळू कमी होऊं लागला. पण प्रेमपूर्तीची उजळलेली दिव्य ज्योति दोघांनाहि एकमेकांच्या डोळ्यांना स्पष्ट दिसत होती; आणि एकमेकांच्या हातांचा ऊबदार स्पर्श दोघांच्याहि शरीराला व मनाला सुखवीत होता.

# उफाळलेल्या भावना : : ५

"मालती, " आम्ही वेणुताईंच्या घरीं बारशाला जाऊन येतों. आता चार वाजतां दादा येईल त्याला तेवढा चहा करून दे हं!"

हातांतल्या पुस्तकांतून मालतीनें डोकें बाहेर काढलें. आई, वहिनी आणि धाकटी सुमती ठाकठीक पोशाख करून आणि चारदोन ठळक दागिने घालून बाहेर जायला निघाल्या आहेत हें तिनें पाहिलें. 'बरं' एवढाच उद्गार तिच्या तोंडून निघाला आणि पुन्हा तिनें पुस्तकांत डोकें घातलें. पण तिला काय वाटलें कोण जाणे! इतिहासाचें तें जाड पुस्तक तिनें बाजूला ठेवलें आणि गणिताची वही घेऊन ती भूमितींचीं उदाहरणें सोडवूं लागली. पण कांहीं केल्या त्यांतलें एकहि उदाहरण तिला सुटेना! आणि मग हतबल होऊन ती मनांतल्या मनांत म्हणाली, "छे! कशी मी पास होणार तरी! नको हा अभ्यास आणि नको ही परीक्षा!"

पण लगेच मनांतून विचारांची दुसरी एक लाट उसळी मारून पुढें आली—"नको कसं? तुझ्या पांढऱ्या कपाळाकडे बघ अगोदर! शिकलीस नाहीं तर पुढं कोण विचारणार तुला? तुझ्या फुटक्या कपाळाकडे बघून आईला आणि बाबांना किती वाईट वाटतंय्! तुझं पुढलं आयुष्य थोडं तरी सुखकर जावं म्हणून ना ते तुला शिकविण्याची एवढी धडपड करतात! हीं उदाहरणं आपण दादा-कडून नाहींतर त्या समोरच्या रमेशकडून समजावून घेतलीं पाहिजेत."

इतक्यांत तिला दादा आल्याची चाहूल लागली म्हणून ती खोलीबाहेर

आली. दादाची नजर कोणाला शोधीत आहे हें तिनें ताडले, “ सारींजणं वेणुताई कडे बारशाला गेलीं दादा.”

“ तूं नाहीं गेलीस मग ? ”

“ माझं रे काय काम तिथं ? आणि मला अभ्यास नाहीं का करायचा ? परीक्षा महिन्यावर आली कीं आतां ! ”

दादा न्हाणीघरांत गेल्यावर त्यानें आणलेला पानाचा पुडा तिनें सहज सोडला. आंत सुंदर मोगरीची वेणी होती. तिनें त्या टपोऱ्या कळ्यांवरून अलगद हात फिरविला आणि तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून क्षणभर पाणी तरारले. वेणीवर शिंपलेल्या पाण्याचा ओलावा तिच्या हाताला जाणवला. त्याचा तिनें वास घेतला. “ वहिनी किती भाग्यवान तरी ! या फुलांचा सहवास तिला तीं सुकून जाईपर्यंत मिळणार. तोंपर्यंत तिच्या केसांची शोभा किती पण खुलून दिसेल. ! अन् या फुलांच्या आगमनामागं असणारं दादाचं तिच्यावरील प्रेम ! अहाहा ! त्याची तुलना कशाबरोबर तरी करतां येईल का ? माझे केस या फुलांच्या सान्निध्याला कायमचे मुकले आतां ! कां ? काय मी पाप केलं असं ? किती निर्मल आणि पवित्र फुलं हीं ! अन् मी नाही का निर्मल आणि पवित्र ? ”

चहा पिऊन दादा बाहेर जाण्याच्या तयारीला लागला तरी आपल्याच विचारांत चूर झालेल्या मालतीला त्याला आपल्याला भूमितीचीं उदाहरणें विचारायचीं आहेत याची आठवण झाली नाहीं.

रात्रीं पुन्हां ती अभ्यासाला बसली तेव्हां तिला आठवण झाली. पण त्या वेळीं दादा न् वहिनी त्यांच्या खोलींत बोलत बसलीं होतीं म्हणून तिने त्याला विचारण्याचा बेत रहित केला. त्यांची खोली तिच्यासमोरच होती. तिथें चाललेला नर्मविनोद आणि उमटलेले हास्यतरंग तिच्या कानांवर अस्पष्टपणें आदळत होते. ती इतिहास वाचीत होती. समोरच्या खोलींतला प्रकाश मंदावला आणि दाराला कडी लागल्याचें तिला समजून आलें. ती इतिहासांतील

कर्तबगार माणसांची चरित्रें वाचीत होती. पण स्वतःचा केविलवाणा चरित्रपट तिच्या डोळ्यांपुढून क्षणभरसुद्धा हालत नव्हता.

लग्नानंतर एका वर्षातच पतिनिधन होणें—तेंसुद्धां तो सहज पोहायला म्हणून गेला असतां बुडून होणें—यांत तिचा कांहींच अपराध नव्हता. विधीनें सहजगत्या घडविलेली ती एक घटना. पण त्यामुळें मालतीच्या साऱ्या आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली. सर्वांनीं उपेक्षिलेली, अवमानित झालेली, दुःखानें व्याकुळलेली मालती आपलें भरलेले घर सोडून कायमची माहेरीं आली!

इंग्रजी पांचवीमध्यें सोडून दिलेल्या अभ्यासाचे घुटके डोळ्यांतल्या पाण्यांत घोटून तिला ते गिळावे लागले. दुःखाचे चटके अंतःकरणाला भाजीत असतांना पुस्तकांचा अर्क मेंदूंत ठेंचून भरण्याचा प्रयत्न तिला करावा लागला आणि कशीबशी मॅट्रिकच्या वर्गात येऊन ती दाखल झाली.

सुंदर मखरांत मोठ्या सन्मानानें नेऊन बसविलेली मूर्ति कोणीतरी उचलून फेकून द्यावी म्हणजे त्या मूर्तीची जी वाताहात होईल तशीच तिच्या जीवनाची वाताहात झाली होती. तिची आई, वडील आणि भाऊ तिच्या जिवाला विरंगुळा वाटावा म्हणून आपापल्यापरीं जपत होतीं.

पण संसारसुखाच्या सीमेवर तिनें पाऊल टाकलें न टाकलें तोंच विधीनें तिला तेथून खेचून काढल्यामुळें मालतीच्या झालेल्या कोंडमाऱ्याला आणि दुःखाला सीमाच नव्हती! शाळेच्या या रुक्ष गजबजाटांत आणि अभ्यासाच्या पुस्तकांनीं भरलेल्या त्या एकाकी खोलींतसुद्धां अनुभवलेली पतिप्रेमाची आणि वर्षभरांतच केलेल्या प्रणयचेष्टांचीं तरळ सुखस्वप्नें तिच्या मनांत चमकून जात. अशा वेळीं भारावलेल्या हृदयानें आणि जड शरिरानें डोळ्यावरचीं तीं स्वप्नपटलें दूर करण्याचा प्रयत्न करून सभोवारच्या रुक्ष परिस्थितीकडे आणि कडवट जगाकडे ती भांबावून घाबरून पाही.

तिला कठीण वाटणारीं भूमितीचीं उदाहरणें समोरच्या रमेशनें अगदीं

चुटकीसरशीं सोडवून दिलीं. पण तिला मोठें नवल वाटले तें दुसऱ्याच गोष्टीचें ! कांहींसा घमेंडखोर वृत्तीचा आणि आंतल्या गांठीचा हा रमेश आपल्याशीं इतक्या अजीजीनें बोलला कसा ? "स्वतःच्या बुद्धीचा त्याला जरा भारीच अभिमान आहे नाहीं तरी !" असं दादा अनेकवार बोलल्याचें तिनें ऐकलें होतें; आणि रमेशचीं तीं वाक्यें मालती पुनःपुन्हां मनांत घोळवीत राहिली.

"मालती, तुझ्या अडचणी विचारीत जा नेहमीं मला ! अन् झटून अभ्यास करून पास व्हायचं बरं का ! का उगीच उदासवाणी असतेस? एखादी दुःखदायक गोष्ट घडली तर ती साऱ्या आयुष्यभर मनांत बाळगीत बसूं नये. केवढं तरी मोठं कार्यक्षेत्र तुझ्यासमोर पसरलेलं आहे. आनंदानं पाहा जगाकडे म्हणजे तुझा हरवलेला आनंद तुला सांपडेल."

आणि हा संदेश देणारा रमेश घमेंडखोर म्हणून आजपर्यंत ती त्याच्याशीं बोलली नव्हती. माणसें दिसतात तशीं नसतात तर एकूण ! रमेशबद्दल तिचा झालेला ग्रह बराचसा बदलला. तो कुठेंहि दिसला कीं आतां ती त्याच्याकडे पाहून किंचित् हास्य करी. आणि साऱ्या जगाकडे अभिमानानें दृष्टिक्षेप टाकणारा ताठर वृत्तीचा रमेश तिच्या त्या हास्याला नम्र भावानें व मधुतर हास्यानेंच प्रत्युत्तर देई.

परिक्षेला आठ दिवस उरले आणि वहिनींच्या डोहाळजेवणाचा समारंभ करावयाचा असें आईनें ठरविलें. तिचें म्हणणें होतें, परीक्षा होऊन जाऊ दे; मग हा समारंभ करा ! पण मग वहिनीला माहेरीं जायची घाई होती. तिच्या बहिणीचें लग्न असल्यामुळें तिला तातडीनें बोलावणें आलें होतें.

डोहाळजेवणाच्या दिवशीं मालतीची स्थिति अगदीं शोचनीय झाली होती. दाबून टाकलेले विचार आणि भावना त्या दिवशीं अगदीं अनावर झाल्या. दादाचें आणि तिचें लग्न एकाच दिवशीं झालें होतें. वहिनीला आतां मूल होणार ! जगावेगळें त्यांत काय होतें ? पण वहिनीच्या आणि आपल्या स्थितीं-तलें अंतर मालतीच्या मनाला वेदना करीत होतें.

सर्वांचे मंगल आशीर्वाद घेऊन पतीसह ज्या दिवशीं ती या घरांतून बाहेर पडली त्याच दिवशीं तसेच मंगल आशीर्वाद घेऊन तिची वहिनी या घरांत आली होती. आज वहिनीच्या कोडकौतुकाला पूर आला होता. या वेळीं तिला स्थान कुठें होतें ? तर बोलावलेल्या आचाऱ्याच्या हाताखालीं मदतनीस म्हणून ! डोळ्यांत धूर जातो या निमित्तानें ती वारंवार डोळे पुसत होती. पण धुरानें आलेलें तें पाणी नव्हतें. पिळवटलेल्या हृदयांतले ते रक्ताचे थेंब होते.

"मी कां वंचित झालें या साऱ्या सुखांना ? प्रेमासाठीं आणि वात्सल्यासाठीं आसुसलेल्या माझ्या हृदयाची कुणा कुणालाहि कशी कल्पना येत नाहीं ? सारं आयुष्य हें असं एकटं एकटं घालवायचं ? बाई ग ! नको, नको हें असलं जीवन ! पहिल्यापहिल्यानं साऱ्यांना सहानुभूति अन् कळकळ वाटली माझ्या दु:खाची; पण आतां ? हळूहळू सारींच आपापल्या जीवनांत रमूं लागलीं. अन् आपण ? आपल्या दु:खाचे अजून येणारे ऊन ऊन कढ कधीं निवणार ? अन् कशानं निवणार ? "

बोलावलेल्या साऱ्या बायका जमल्यावर जेवणाच्या पंगती बसल्या अन त्या वेळीं तिला जी एक गोष्ट कळून आली त्यामुळें वादळानें नाजूक कळी जशी थरथरावी तशी ती थरथरली नी लगेच सुन्न अन् बधीर झाली. आईला, आपल्या आईलाहि तीन चार महिने गेलेत म्हणे ! प्रथम तिचा विश्वासच बसेना यावर ! पण मग वेणुताई तिच्या धाकट्या बहिणीला—सुमतीला—म्हणत होत्या, " सुमती, आठ वर्षांनीं कां होईना, आपली पाठ उजवलीस की ग ! मालतीला न् सुमतीला एक धाकटा भाऊ हवाच होता नाहीं तरी " या बोलण्यानें तिची खात्री झाली.

मग थट्टामस्करीचीं आणि हास्यविनोदाचीं तिथें कितीतरी बोलणीं चालली होतीं. पण मालतीचें त्यांत मुळींच लक्ष नव्हतें. तिच्या मनाचा नुसता गोंधळ उडाला होता. सुमतीच्या पाठीवर आठ वर्षांनीं तिच्या आईला दिवस

गेले होते ही गोष्ट आनंददायक नव्हती का? तिच्या आईच्या चेहऱ्यावरसुद्धा आनंद झळकत होता. चाळिशीच्या घरात आलेल्या तिच्या आईच्या चर्येवर आलेलें तेज ती डोळे फाडफाडून पाहात होती. ते तेज म्हणजे स्त्री-हृदयांतून अविरत वाहणाऱ्या वात्सल्याचें प्रतीक आहे हें तिला समजत होतें. पण आपल्या हृदयांतला हा झरा आपण मात्र शुष्क का करायचा हे तिला कळत नव्हतें!

तिचें मनस्वास्थ्य या गोष्टीमुळें पार बिघडून गेलें. तिला त्या रात्रीं झोप लागली नाहीं. अर्थात् पुढल्या आठ दिवसांत अभ्यासाची जशी तयारी तिच्या हातून व्हायला पाहिजे होती तशी झाली नाहीं.

परीक्षा आटोपल्यावर रमेश भेटताच प्रथम त्यानें विचारलें, "पेपर कसे काय गेलेत?" मग धडधडत्या मनानें पण अगदी खरें उत्तर दिलें तिनें—"इतिहास-भूगोल आणि जॉमेट्री हे पेपर्स काही समाधानकारक सुटले नाहींत."

'ही पण गोष्ट तूं अगदीं मनाला लावून घेतली आहेस मालती! नाहीं तर नाहीं! काय मोठंसं त्यांत? पुढल्या वर्षी! प्रयत्न केल्यावर काय साध्य होणार नाहीं?"

आनंद झाला तिला त्याच्या बोलण्यानें. मोठ्या आदरानें तिने त्याच्या विशाल भालप्रदेशावर एकवार नजर टाकली. सदाच वास्तव्य करणाऱ्या तेथल्या दोन बारीक आठ्यांचा मागमूसहि तिला तेथे आढळला नाही. "आपल्याशीं बोलतांना रमेश गोड हसतो; चेहऱ्यावरचा त्याचा ताठरपणा आणि कपाळावरच्या त्या आठ्या फक्त आपल्यापाशीं बोलतांनाच विरून जातात. कां असं?" तिला या प्रश्नाचें उत्तर सापडेना! पण कसली तरी गोड खळबळ तिच्या अंत:करणात झाल्यावांचून मात्र राहिली नाहीं.

उन्हाच्या तीव्र रखरखाटानें माणसाचे चेहरेच काय, पण झाडाचीं पानेंहि मलूल झालीं होतीं. वसंत ऋतूंत मोहरलेली सृष्टि ग्रीष्म ऋतूंत धुळींत

माखलेल्या मुलासारखी मलिन झाली होती. मालती दारांत लावलेल्या जाईच्या वेलाला पाणी घालीत होती तोंच रमेश तेथ आला. "जाईला कळ्या याव्यात म्हणून एवढी खटपट करतेस ना? सुमती सांगत होती मला, कीं स्वत: लावलेल्या जाईला कळ्या येत नाहींत म्हणून ताईला फार वाईट वाटतं. पण खरं सांगूं मालती, तुझ्या हृदयांतल्या कळ्या उमलल्याशिवाय तुझी जाई नाहीं फुलायची!"

मालतीनें घाबरून इकडे तिकडे पाहिले. आसपास कोणी नव्हतें. मग एक लाजरा कटाक्ष रमेशकडे टाकून तिनें सुचविलें, "काय हें भलतंच बोलतां!"

"खरंच मालती, त्या जाईऐवजीं मला पाणी दे ना म्हणजे फुलतील तुझ्या कळ्या. कोण तहान लागलीय्! नी काकी कुठं दाराला कुलूप लावून बाहेर गेलीय्?"

मालती धावतच घरात गेली आणि थंडगार पाण्याचा पेला घेऊन बाहेर आली. पाहाते तों रमेश तिथे नाही!

मग तिला दिसलें, की रमेश आपल्या खोलींत जाऊन बसला आहे नी आपली कसली तरी वही उघडून पाहात आहे. तिने तांब्या टेबलावर ठेवला. वही बंद करीत रमेश उद्गारला, "निबंध छान लिहितेस हं मालती! तुला कांहीं वाचायला पुस्तकं हवीं असलीं तर ये संध्याकाळी अन् घेऊन जा."

मालती भेदरलेल्या नजरेने दाराबाहेर पाहात होती. आई आणि सुमा झोपलीं होतीं. बाबा मागल्या परसांत होते आणि दुसरें कोणीही नव्हतें. तरी रमेशबरोबर आपण एकांतीं खोलींत बोलत बसलों आणि इतक्यांत बाबा आले तर त्यांना काय वाटेल? रमेशने बसावें, आपण त्याच्याशीं बोलावें असें वाटत असूनहि तिच्या जिवाचा थरकाप झाला. रमेशने तिची ही स्थिति ओळखली आणि तो लगेच उठला. तरी जातां जातां तो म्हणाला, "कां उगीचच्या उगीच इतकी भिनेस?"

मॅट्रिकचा रिझल्ट लागला, आणि त्या प्रचंड नामावळींत मालतीचें नाव आणि नंबर कुठेंच आढळला नाही! तिला अतिशय वाईट वाटलें. दोन दिवस तिने नापास झाल्याने होणाऱ्या एक वर्षाच्या नुकसानीपेक्षां रमेशला आपल्याबद्दल आता काय वाटेल, याचेंच तिला अधिक वाईट वाटलें. पण मग रमेशचे मागचे प्रोत्साहनाचे शब्द तिला आठवले. तिसरे दिवशीं सुमतीने त्याच्याकडून आणलेल्या मासिकांत एका चिठोऱ्यावर तिला उद्देशून सहानुभूतिपूर्वक आणि उत्साहवर्धक लिहिलेलीं चारसहा वाक्ये वाचून तर तिला नवचैतन्य प्राप्त झालं.

तीच शाळा, तोच अभ्यास, पुन्हा तेंच सारे रहाटगाडगें सुरू झालें. अभ्यंग स्नानानतर तरुण स्त्री जशी तेजदार आणि आल्हाददायक दिसते तसेंच सृष्टिदेवीला घडलेल्या वार्षिक अभ्यंग स्नानानें तिचेंहि स्वरूप मनोहर भासूं लागलें होतें. सभोवार सृष्टीला आलेल्या हिरव्या तजेल्याचें आणि टवटवीतपणाचें प्रतिबिंब मालतीच्या चेहऱ्यावरसुद्धां दृग्गोचर होत होतें. अलीकडे ती मोठ्या उत्साहाने अभ्यास करूं लागली होती त्याकरितां रमेशकडे मात्र ती वारंवार जाई आणि असा बुद्धिमान् अध्यापक फुकट मिळाल्यावर तिचे बाबा तरी नको कशाला म्हणताहेत? मालतीला दुसरा एक आनंद लाभला होता, तो म्हणजे वहिनीचें तीन महिन्याचें बालक रवींद्र. त्याला मांडीवर घेऊन खेळवण्यांत तिचा बराच वेळ जाई. सकाळच्या वेळीं ती त्याला अशी घेऊन बसली की आई म्हणे, "इश्श! मालती, एकसारखं काय त्याला अशी घेतेस? सवय होईल ना त्याला. नी तुला अभ्यास नाहीं का करायचा?"

खरे म्हणजे मालतीला अभ्यासापेक्षां रवींद्राच्या बालहास्यात, त्याच्या इवल्याशा रक्तवर्ण हातांपायात, त्या फुगीर गालात सारं सुख नी आनंद साठवला आहे असें वाटे. त्याच्या स्पर्शाने, त्याच्या त्या बालस्वरूपी हास्याने तिच्या सुप्त वृत्ति महिरून येत असल्या तरी अमूर्त संवेदनांची तृप्ति झाल्यासारखें वाटे.

आज मात्र ती रवींद्राला ध्यायला विसरली. विचारांचा कल्लोळ तिच्या मनांत साचला असल्यामुळें ती वारंवार अस्वस्थ होत होती. आणि मनांतला हा गोंधळ आपल्या चर्येवर दिसूं नये म्हणून ती सारखी जपत होती शाळेत जातांना टेबलाच्या खणातून ती चिठ्ठी काढून तिने पुन्हा एकदा वाचली. त्या चिठ्ठींत लिहिलें होतें—

"मालती, आता लपंडाव करण्यांत काय अर्थ आहे? मी ज्या दिवशीं तुला पाहिली त्या दिवसापासूनच तुझ्यावर प्रेम करीत आहें. पण मला आतां समजून आलं आहे की, तूंमुद्धा माझ्यावर...खरं ना? आज टेकडीवर भेट. संध्याकाळीं आपण बोलूं या बाबतींत.

तुझा

रमेश"

आणि या चिठ्ठीनेच मालतीची अशी अवस्था झाली होती. संध्याकाळीं ती धडधडत्या हृदयाने टेकडीवर गेली तेव्हा रमेश तिची वाटच पाहात होता. ती दृष्टीस पडतांच तो एकदम उल्हासला. त्याच्या अभिमानी डोळ्यात स्निग्धता आली. एका आडबाजूला जाऊन बसतांच रमेशनें एकदम तिचे दोन्ही हात धरले.

"रमेश, नको ना! हें काय?" भीतियुक्त अंतःकरणानें तिने हात सोडविण्याचा निष्फळ प्रयत्न केला.

"कां भितेस एवढी? मी उद्या तुझ्या बाबांजवळ मागणीच घालणार आहे मुलीं! तुझी परीक्षा होईपर्यंत थांबायचं असेल तर माझी हरकत नाहीं!"

"बाबांना कसं आवडेल हें रमेश? स्वतःच्या विधवा मुलीचं लग्न... अन् तोहि प्रीतिविवाह!"

"म्हणूनच तर सांगायचं. मालती, अगदीं भिऊं नकोस तूं! वेडी! भित्री मुलगी! असंच का सारं आयुष्य कुस्करून टाकलेल्या फुलासारखं

घालवणार तूं ? तुला शिकवून डॉक्टरीण करायचा विचार आहे तुझ्या बाबांचा ! तुला तें शक्य नाहीं मालती ! तुझ्या आयुष्याला तसलं वळण लावलं तर मांडवावर चढावयाची वेल मातींत पसरूं दिल्यासारखी तुझी अवस्था होईल. तुझ्या कुचंबलेल्या हृदयाची आणि उफाळणाऱ्या भावनांची ओळख तुझ्या जन्मदात्यांना नाहीं. जन्माच्या जोडीदारिणीच्या संगतींत तुझे बाबा न् दादा आपलं आयुष्य सुखांत, एकमेकांच्या प्रेमांत व्यतीत करीत आहेत आणि तुला मात्र एकाकी जीवन कंठायला भाग पाडीत आहेत.... "

मालतीने खालीं घातलेली मान रमेशनें तिची हनुवटी धरून वर उचलली. तिच्या तरळत्या ओलावलेल्या नजरेला आपली क्षणभरच अभिमान लुप्त झालेली आर्जवी भेदक नजर भिडवीत रमेशने अति मृदु गोड स्वरांत हाक मारली, " मालती " दुसऱ्याच क्षणीं मालतीने मान बाजूला वळविली.

' मालती ' ही हाक ती आज बावीस वर्षं अनेकांच्या तोंडून ऐकत होती. पण रमेशच्या तोंडून आज तीं तीन अक्षरे बाहेर पडलीं तेव्हां तिला वाटले, " हा बुद्धिमान, अभिमानी तरुण आपल्यापुढं इतका विनम्र झाला आहे हा केवळ आपल्या स्त्रीत्वाचा परिणाम. हें आपल्यातलं सुरम्य स्त्रीत्व अन् वात्सल्य. कां उगीच त्याचं निर्माल्य करायचं आपण ? "

रमेशनें धरलेल्या आपल्या हाताला त्याच्या ओठांचा स्पर्श झालेला तिला जाणवला. व चमकून तिने त्याच्याकडे पाहिलें. पाहातांक्षणीच आदर उत्पन्न करणाऱ्या त्याच्या त्या भव्य नीतळ कपाळाचें आपणहि असेंच...पण हा विचार कृतींत आणण्याचें धैर्य तिला झालें नाहीं.

दुसरेच दिवशीं मालतीचे बाबा आणि दादा सोप्यावर बोलत बसले असतांना रमेशनें येऊन मालतीवर आपलें प्रेम असल्याचें व तिच्याशीं विवाह करायची आपली इच्छा असल्याचें सांगितलें. अचानक घरावर बॉम्बगोळा पडल्यावर जी स्थिति होईल तशीच स्थिति तेथे निर्माण झाली.

बाबांनीं मालतीला बाहेर बोलाविले. चोरीचा आरोपी जसा कोर्टात येतो तशी मालती बाहेर आली. " मालती– " बाबांनीं कठोरतेने हाक मारली, " रमेश म्हणतो आहे ते खरं आहे का ? "

" हो बाबा, खरं आहे तें ! "

" म्हणजे ! तुम्ही दोघं अभ्यासाच्या नांवाखालीं प्रेमाचे खेळ खेळत होतां काय ? मालती, मालती, तुझ्या स्थितीची तुला कांहीं जाणीव ? जगांत तुझ्या सासऱ्याला आणि मलाहि तोंड दाखवायला जागा राहाणार नाहीं ! रमेश, एखाद्या बालविधवेला अशा प्रेमाच्या गप्पा सांगून समाजांतून उठवायचं ! बेवकूफ ! हीच तुमची बुद्धिमत्ता वाटतं ! "

" बाबासाहेब, आपण सरळ बोलूं शकतां. मालतीला समाजांतून मी उठवीत नाहीं, तुम्ही उठवीत आहांत, समजलांत ! मी तर तिला माझ्या पत्नीचं मानाचं स्थान देऊन समाजांत बसविणार आहें ! स्वतःच्या भावना—विकारांवरून तरी तरुण विधवा मुलीचं मन तुम्हांला कळायला पाहिजे. जगांतील जीं सौख्यं नी आनंद आपण भोगतों त्याला आपली लाडकी बहीण जन्माची वंचित राहावी याची दादासाहेब, तुमच्या मनाला तरी खंत वाटायला पाहिजे. "

रमेश ताडकन् खुर्चीवरून उठला आणि मालतीजवळ गेला. झंझावातांत नाजूक कळी जशी थरथरते तशी तिच्या ओठांची पाकळी थरथरत होती. कानांच्या पाळ्या लाललाल झाल्या होत्या. हृदयांत कालवाकालव आणि मेंदूंत कसलेतरी सणके बसल्यासारखें तिला वाटत होतें. हळू आवाजांत रमेश म्हणाला, " मुळींच भिऊं नकोस मालती ! असल्या फुसक्या गोळ्यांना भिण्याचं काय कारण ? "

झरझरा पावलें टाकीत रमेश तेथून निघून गेला. खालच्या मानेनेच शक्य तितका डोळा तिरपा करून मालती त्याच्या त्या धीरोदात्त मूर्तीकडे तो दिसेपर्यंत पाहात राहिली. पुढें पडणाऱ्या त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर तिच्यांतलें धैर्य नी

बळ जणू काय एकवटून येत होतें. "रमेश, आहा! अशा धीरोदात्त, खंबीर नी बळकट पुरुषावरून जीव ओवाळून टाकावा!" असा विचार तिच्या मनांत आला.

आणि तिनें आलेल्या हल्ल्याला मग निमूटपणें तोंड दिलें. तिचें हृदय विदीर्ण करणारे निरनिराळे वाक्प्रहार तिच्या कानांवर आदळत होते. जळजळीत, रागीट नजरा तिच्यावर मारा करीत होत्या.

"तरी मी म्हणत होतों कीं, हा रमेश कांहीं चांगला मुलगा नाहीं. पण तुम्हींच, बाबा परवानगी दिलीत तिला त्याच्याकडे शिकण्याची!" सुशिक्षित दादासाहेबांचे हे उद्‌गार!

"मला काय माहीत ही बरून गरीब, साळमूद दिसणारी पोरटी अशा रीतीनं माझ्या तोंडांत शेण घालील म्हणून!" सुधारक म्हणविणारे बाबासाहेब चीत्कारले.

"बेशरम कार्टे! उलथली कां नाहीस यारीत? यासाठीं का ग तुला शिकायला घातली? नवऱ्याला गिळलंस नी आता वर आमची बेअब्रू करायला निघालीस! निलाजरा तो रमेश आणि तूंहि चळलीस त्याच्याबरोबर! काय प्रताप गाजवलेस त्याच्याबरोबर! लग्नाशिवाय उपायच राहिलेला नाहीं दिसत! नऊ महिने जिने तिला पोटांत वागविलें होतें, अवीट संसारसुखाची गोडी सत्ताबीस वर्षें जी अनुभवीत होती त्या मातृदेवतेचे हे उदगार होते!

"इश्श! मालतीवन्सं, शिक्षण तरी पुरतं करायचं होतं! तोंपर्यंतहि नाहीं का धीर निघाला! डॉक्टरीण ना होणार होनांत तुम्ही! बरं झालं कीं एका अर्थी! आमचा पैसा वाचेल! मॅट्रिकच्याच वाऱ्या म्हटलं किती होतात कोण जाणे!" वहिनीनीं टोचून घेतलें.

पुढें या खोचक आणि बोचक बोलण्यांनींच काम भागलें नाहीं. मालतीला

शाळेंत जायची बंदी झाली. तिला घरांतून बाहेर पडतां येईना. तिच्यावर सक्त नजर ठेवण्यांत आली.

तिच्याकडे निर्मलतेने पाहून हास्य करणारा एकच जीव त्या घरांत होता. आपल्या चिमुकल्या हातापायांची चपळाईनें उडवाउडव करून हसणाऱ्या रवींद्राकडे पाहून तिचें हृदय भरून येई आणि ताईला सारींजण असें काय बोलताहेत हें न समजल्यामुळें भांबावून कावऱ्याबावऱ्या दृष्टीनें पाहाणारी सुमती आईच्या धाकास्तव तिच्याशीं बोलायला जरी भीत होती, तरी रमेशने दिलेल्या चिठ्ठीची अगदीं बारीक घडी करून कोणाला न दिसेल अशा युक्तीनें ती तिने ताईला दिली होती.

आणि त्यानंतर पांचसहा दिवसांनींच अभ्यासाच्या टेबलावर एक उघडें पत्र ठेवून मालती घरांतून नाहींशी झाली होती.

कपाळाला हात लावून बसलेल्या बाबाना आणि मधूनमधून अश्रुविमोचन करणाऱ्या आईला दादा तें पत्र वाचून दाखवीत होता.

"बाबा व आई यांस सा. नमस्कार वि. वि.

"उफाळून वाहाणाऱ्या पाण्याच्या लोटाला मातीचा फुसका बांध घालून चालत नाहीं. सामाजिक नीतिनियम, घराण्याची अब्रू या आंतून पोखरलेल्या किडक्या खांबांवर आधारलेल्या तुमच्या नजरकैदेचा बांध फोडून या मालतीच्या उफाळलेल्या भावना पलीकडे गेल्या. लग्न होतांच एक वर्षातच मला वैधव्य प्राप्त झालें यांत माझा कांहींच गुन्हा नाहीं. सारं जग ज्या सुखासाठीं धडपडतं आहे, ज्या सुखाचे रम्य मनोरम चित्रपट मी रात्रंदिवस माझ्या भोवतालीं पाहात आहे, त्या सुखापासून मला जन्मभर दूर ठेवण्याचा तुमचा प्रयत्न हास्यास्पद आहे. रमेशना दोष देऊं नका. त्यांना माझ्यापेक्षां सुंदर नी शिकलेल्या मुली सांगून आल्या होत्या हें तुम्हांला ठाऊक आहे. माझ्यासारख्या विधवा मुलीबरोबर ते लग्न करायला तयार झाले यांत त्यांच्या मनाचं औदार्यच दिसून येत नाहीं का?

तुम्हीं निष्कारण उठविलेल्या प्रचंड वादळाला आणि पिचलेल्या सामाजिक नीति-नियमांना बिलकूल न जुमानतां मला ते घेऊन जात आहेत यांत त्यांच्या अंगचें धैर्य, खंबीरपणा, साहस हे गुण दिसून येत आहेत. अशा पुरुषश्रेष्ठाला सुखवि-ण्यांत आणि त्याच्या हृदयांतून स्रवणाऱ्या निर्मल प्रेमझऱ्यांत जन्मभर डुंबत राहाण्यांतच ही मालती स्वतःला धन्य समजेल. स्त्रीत्वाच्या कोमल भावना आणि स्त्रीहृदयांतून अविरत वाहणारे वात्सल्य यांचा कोंडमारा करण्याचा तिच्या पाल-कांना काय अधिकार पोचतो? कोणत्याहि प्रकारचं गैरवर्तन मी करीत नाहीं.

" आम्हीं मुंबईला जात आहोंत. तिथं रमेशचा आणि माझा रजिस्टर विवाह होईल. आमचा पत्ता मी कळवीन. अजूनहि आपण क्षमा करीत असाल तर विवाह होतांच उभयतां आपल्या आशीर्वादाकरितां येऊं. कळावें.

तुमची निरपराधी

**मालती** "

# चमत्कारिक पेंचप्रसंग! : : ६

"मग काय विभा, उद्यां जायचं ना, पालकरांची मुलगी पहायला?" विभाकराच्या वडिलांच्या तोंडून हे उद्गार बाहेर पडतांच मी पसरलेल्या 'टाइम्स' मधून नजर काढून विभाकडे हळूच पाहिलें. तो खालच्या मानेनें गालांतल्या गालांत हंसला, आणि खुर्चीच्या हाताला आपल्या एका हातानें चोळीत समोरच्या रिकाम्या झालेल्या चहाच्या कपबशांकडेच पाहात राहिला.

"वरं कां दरमित्र प्रभाकर, नेहमींप्रमाणें वधूपरीक्षेकरितां आपल्याला! आमंत्रण आहे. उद्यां रविवारच आहे. चार वाजतां तूं इकडेच ये म्हणजे झालं."

"येईन तर अवश्य! पण काका, उद्या चांगला दिवस आहे कीं नाही? वधूपरीक्षेला मुहूर्त तरी पाहा आतां!"

"अरे हा बघ आजचा 'धनुर्धारी' मुद्दाम बघतोंय ना मी! कन्या राशीला या आठवड्यांत विवाहयोग जुळून येईल असं म्हटलंय म्हापणकरांनीं! ही मुलगी विभाला खात्रीनें पसंत पडणार!"

"खरंच तें. अगदीं शंभर टक्के पसंत होईल." आंतल्या खोलींतून दाराबाहेर येत विभाची आई म्हणाली, "अगदीं विभाला पाहिजे तशी मुलगी; उंच, गोरी, सडपातळ, आणि चांगली देखणी आहे हो. मी पाहिली आहे तिला एक वर्षामागें!"

" किती मुली पाहिल्यास आतांपर्यंत तें लिहून ठेवलं आहेस का रे? मुली आणि त्या नाकारण्याचीं कारणं!" मी मिस्कीलपणे म्हणालों.

" नाहीं तर काय प्रभाकर? ती पोतनीसांची कमला; खरंच चांगली मुलगी होती. रंग, रूप याला पसत पडलं, पण म्हणे ती ठेगणीच फार आहे! आतां काय म्हणावं याला!

" चित्रकार असतास विभाकर तूं तर बरं झालं असतं! मुलगी पाहिजे तरी कशी हें तुला प्रत्यक्ष दाखवतां आलं असतं. उगीच लोकांच्या मुली पाहायच्या आणि त्या नाकारायच्या चांगलं का हें? कोणत्याही गोष्टीला मर्यादा ही आहेच."

बोलतांना काकांच्या चेहऱ्यावर नापसंतीची एक बारीक छटा उमटली. आम्ही तिघेही असं उलट बोलूं लागल्यावर विभाकर चटकन् उठला. "प्रभा, आज तुला फिरायला यायचं आहे कीं नाहीं" असें म्हणत तो घराबाहेरही पडला. आणि मग अधिक कांहीं न बोलतां नित्याप्रमाणें आम्ही प्रभात-सहलीला निघालों.

विभाची न् माझी अगदीं लहानपणापासून गाढ मत्री होती. तसाच दोन्ही घरांत घरोबाही होता. सध्यां मी मुंबईत सडाच रहात असल्यामुळें पुष्कळदां सकाळीं चहाला मी विभाकरकडे येई. आणि मग आम्हीं दूरवर कोठें तरी फिरायला जात असूं. सध्या विभाच्या लग्नाचा प्रश्न अगदी निकडीवर आला होता. दोन वर्षे तो मुली पहात होता. आतांपर्यंत कांहीं नाहीं तरी बारा–पंधरा मुली पाहिल्या होत्या, आणि त्या सगळ्या नापसंत केल्या होत्या. त्याला कारणही तसेंच होते. सौंदर्याची वांटणी करतांना विभाकराच्या बाबतींत विधीनें फारच उधळमाप केली होती. एकाद्या शिल्पकारानें आपली सारी कला ओतून श्रमपूर्वक एकादा पुतळा तयार करावा, तसा अप्रतिम मानवी सौंद-र्याचा नमुना म्हणून तर विधीने विभाकराला घडवला नाहीं ना? अशी शंका

त्याच्याकडे पाहिल्यावर कोणालाही आली असती. सहा फूट उंचीचा बांधेसूद कमनीय देह, गुलाबी रंग, अत्यंत रेखीव नाक व जिव्हणी, उंच कपाळ, काळे भोर तेजस्वी डोळे, कुठे म्हणून नांव ठेवायला जागाच नव्हती. त्याची आई सुंदर होती. पण विभाचं सौंदर्य कांहीं अप्रतिमच! असलें अभिजात सौंदर्य प्राप्त झाल्याबद्दल कोणीही त्याचा हेवाच करावा. अर्थात् या सर्वाला जुळेल, जमेल अशी सौंदर्यशालिनी वधू विभाला पाहिजे होती आणि ती तर अजून-पर्यंत कुठे आढळत नव्हती.

प्रेम-विवाहाच्या मधुर कल्पना कोठल्या तरुणाच्या मनांत येणार नाहींत? विभाच्याही मनांत त्या आल्या होत्या. पण आपल्या समाजांत प्रीतिविवाहाला क्षेत्र अगदींच मर्यादित असतें. तशांत आमचा विभा म्हणजे सौंदर्याचा पुतळा खरा; पण प्रेम हस्तगत व्हायला नुसतें सौंदर्य असून काय उपयोग? धैर्य, विनोदीवृत्ती, वाचाळता यांचा त्याच्यांत पूर्ण अभाव! स्पोर्टस्मन स्पिरीट ज्याला म्हणतात तें त्याच्या अंगीं मुळींच नव्हतें. त्यामुळें चार वर्षे कॉलेजांत काढूनहि तळ्यांत राहून कोरडा राहिल्यासारखा तो होता. त्यावेळीं तो म्हणे, "अरे बाबा, जगांत ज्या काहीं दुर्लभ वस्तू आहेत त्यांत प्रीती अगदीं अग्र-स्थानीं बसेल." यावर मी म्हणे, "चार दोन मुलींचा घोळका पाहिला कीं, खालच्या मानेनें तेथून पसार होणाऱ्या नाजूक भित्र्या तरुणापासून प्रीती दूर पळणारच!"

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे गतवर्षी कॉलेजांत शिकणाऱ्या एका मुलीला विभाकर एकदां बघायला गेला. कधीं नव्हे ती मुलगी त्याला अगदीं पंधरा आणे पसंत पडली. एक आणा कमी एवढ्या करितां कीं ती त्याला जरा वाजवी चलाख न् फाजील धीट वाटली. पण एरवीं मुलगी गोड, आणि विभाच्या उंचीला न रूपाला शोभण्यासारखी. बहुतेक लग्न जमणार असं आम्हांला वाटलं. तोंच एक दिवस त्या मुलीनें विभाला भेटून सांगितलं,—
"आपण होकार देऊं नये आमच्या बाबांना! आपलं सौंदर्य मला बायकी

वाटतं, नाजूक गुलाबी ओठ, लालसर जिव्हणी व इतका नम्र, शाय् चेहरा ! छे, पुरुष फारसा सुंदर नसला तरी चालेल, पण त्याच्या अंगीं पौरुष पाहिजे. अन् शिवाय माझा जोडीदार मला स्वतःच निवडायचाय्. बाबांच्या समजुतीकरितां मी दाखवायच्या प्रकाराला कबूल झालें होतें. "

आमचे विभाकर बी. ए. (ऑनर्स) या तिच्या उद्गाराने आईस्क्रीम झाल्यास नवल काय? मला त्यांनीं हें सांगितले तेव्हां म्हटले, "बरं झालं ही तारका तुझ्या गळ्यांत पडली नाही. रूपरंगाची संगती जमवता जमवतां, तू आपल्या वैवाहिक जीवनाची बाकी विसंगती करून टाकशील. काय झालं रे कांकणभर ठेंगणीच किंवा जरा सावळी, पण तुझ्या साध्याभोळ्या स्वभावाला जमेल अशी मुलगी पत्करलीस तर?" यावर तो नुसता हंसला जोडपं अगदीं नमुनेदार दिसलं पाहिजे हें एक वेडच त्याच्या डोक्यांत भरलं होतं. बी. ए. पास झाल्यावर वडिलांच्या वशिल्यानें कस्टममध्ये नोकरी लागून आतां चार वर्षे झालीं होतीं. आणि यंदा विभाचें लग्न अगदीं ठेवावयाचें नाहीं असा त्याच्या आईचा अत्याग्रह होता.

*  *  *  *

ठरल्याप्रमाणें रविवारीं चार वाजतां आम्हीं त्रिवर्ग पालकरांची मुलगी पाहाण्याच्या मोहिमेवर निघालों. इष्ट स्थळीं पोहोंचतांच काकांनीं हलक्या हातानें दारावरची घंटी दाबली. क्षणार्धांत दार उघडून पालकरमहाशय आमचें स्वागत करते झाले. दिवाणखान्याचें स्वरूप देऊन सजविलेल्या एका खोलींत गुबगुबीत खुर्च्यांत आम्हीं स्थानापन्न झालों.

"तुमच्या या मुंबईत जागेची भारी टंचाई! काय भाडीं घेतात! चार खोल्यांच्या या ब्लॉकला चाळीस रुपये म्हणजे काय झालं? कोल्हापूरला आम्हीं एवढ्या भाड्यात सबंध बंगला वापरीत होतों ना?" मंडळींतलें बोलणे कायम ठेवण्याच्या कामांत पालकर मोठे प्रवीण दिसले. मधून मधून त्यांची नजर

विभाला बाकी निरखून पहात होती. "मुलीला आई नाही तेव्हां पोरकीच आहे पोर! काय समजलांत? एकदां उजवली म्हणजे मोठ्या विवंचनेंतून मोकळा झालों मी! आईविना पोरगी असली तरी गृहकृत्यांत मोठी दक्ष बरं का? घरांतली सारी व्यवस्था तीच पाहात असते. कोण पाहाणार दुसरं?"

पालकरांच्या या बडबडीपेक्षां आंतून आतां कोणती सौंदर्यलतिका बाहेर येणार इकडेच आमचें लक्ष लागलें होतें. त्याविषयींची आतुरता विभाकराच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्ट दिसत होती. एकदांचे पालकर आंत गेले. दोन मिनिटांत ते व त्यांच्या मागून हातांत ट्रे घेऊन एक नोकर आला. सफेद आच्छादन घातलेल्या मधल्या मेजावर ट्रे ठेवून तो आंत गेला. त्यांत केशरी शिऱ्यानें भरलेल्या पांच सुंदर बशा आणि लखलखीत पांच चमचे होते. लगेच दुसऱ्या एका ट्रेमध्यें बशांवर उपडे घातलेले कप व चहाची किटली घेऊन मिस् पालकर बाहेर आल्या. एका चौपाईवर तें साहित्य ठेवून त्या क्षणमात्र उभ्या राहिल्या. "बस ना सुमती. आणि मंडळी करा हं आतां सुरवात!" असें म्हणत पालकरांनीं एक बशी स्वतःकडे ओढली. किंचितही न लाजतां सुमति एका खुर्चीवर बसली, शिऱ्याची चव न कळण्याइतके आम्ही आश्चर्यमूढ होऊन गेलों. पालकर जरा सुधारकी वळणाचे आहेत एवढेंच आम्हांला माहित होतें. आणि घरच्या बाह्य देखाव्यावरून गृहस्थ बऱ्यापैकीं संपन्न स्थितींत असावा असें अनुमान काढायला हरकत नव्हती. पण दाखवायला उभ्या केलेल्या मुलीनें पुरुषांत बसून खाणें, आणि प्रत्यक्ष बापानें आधुनिक पद्धतीप्रमाणे आमची ओळख करून देणें, हा प्रकार आम्हाला मोठा नवलपूर्ण वाटला. ओळख करून देतांना काकांकडे व माझ्याकडे किंचित् हंसून आणि विभाकरकडे अर्थपूर्ण नजरेनें सुमतीने पाहिले. तेवढ्यावरून तिचे डोळे पाणीदार व भावपूर्ण आहेत हें दिसून आलें. मुलगी मोठी मोहक होती. नाक चाफेकळीसारखें रेखीव किंवा जिव्हणी अगदीं नाजूक नसली, तरी पिवळसर गोरेपणा, विपुल असलेल्या पिंगट केसांची फुगीर बांधणी, साडेपांच फुटाजवळ येईल इतकी उंची, सडपातळ बांधा आणि चटकन् डोळ्यांत भरेल

इतकी आकर्षकता असल्यामुळें ही मुलगी विभाला खात्रीने पसंत पडणार असें मला वाटले. मी विभाकडे त्या अर्थानें पाहिलें. तो चहाचे कप भरण्यांत गुंतलेल्या सुमतीकडेच पाहात होता.

"शिक्षण किती झालंय तुमचं?" चहा पितांना काकांनीं प्रत्यक्ष तिलाच प्रश्न केला.

"फारसं नाहीं. मॅट्रिकला बसले होतें एकदा; पण अपयश आलं." तिनें खालच्या मानेनें उत्तर दिलें.

"अहो पुन्हां बसण्याकरितां मी किती सांगत होतों तिला. पण ऐकलं नाहीं तिनं. एकदां नापास झाल्यामुळें हिरमोडच झाला तिचा!"

"विशेष कशाची आवड आहे आपल्याला?" तेथील मोकळेपणाच्या वातावरणामुळें धीट होऊन मी प्रश्न केला. माझ्याकडे एक भावपूर्ण कटाक्ष टाकून पुनरपि हातांतल्या कपाकडे पाहात ती म्हणाली, "ललितकलांची आवड वाटते मला. पण छंद असा दिलरुब्याचा आहे थोडासा!"

दोन तीन मिनिटें अगदीं गाढ स्तब्धतेंत गेलीं. मग काका म्हणाले "बरं घेऊं आतां आम्हीं रजा?" आणि उठतां उठतां कशी कोण जाणे विभानेही आपल्या तोंडाची मिठी सोडली.

"आमच्याविषयींचें आपलें मतही समजलें पाहिजे आम्हाला!"

पालकरांना उद्देशून तो जरी हें बोलला तरी हें सुमतीला अनुल्लेखानें विचारलें आहे, हें समजून पालकर हंसत हंसत उद्गारले,—"अवश्य, समजेल." आणि याच वेळीं फक्त ओझरती लज्जेची छटा तिच्या चेहऱ्यावर चमकून तो किंचित आरक्त झाला. तेवढ्यावरून तिच्या मनांत नापसंती नाहीं हें कळून आलें. मग लगेच आम्हीं पालकर कन्या आणि पिता यांचा निरोप घेऊन निघालों.

* * * *

धनुर्धारींतलें भविष्य, न् काकींचें भाकीत खरें ठरलें. विभाकराला मुलगी पसंत पडली. साखरपुड्याचा दिवस ठरला. आणि खास विभाकराच्या पसंतीनं खरीदलेले जार्जेटचें पातळ, आणि निळसर खडा बसवलेली एक छानदार आंगठी पालकरांकडे रवाना झाली.

विभाकराच्या घरीं जेव्हां जावें तेव्हां त्याच्या लग्नाच्या गोष्टी ! जो, तो उत्साहानं बोलत असतांना दिसे. काकींची तर गडबड विचारायलाच नको. "नव्या पद्धतीनें लग्न केलं तरी वाजंत्री, मिरवणूक, जेवणावळी व्हाव्या" असं त्यांचं म्हणणं होतं. त्यावर काका म्हणत, "कशाला उगीच मिरवणूक? दृष्ट लागेल ना तुझ्या मुलाला न सुनेला ! आतां तुलाच मिरवायची हौस असेल तर आपलीच काढूं एक मिरवणूक !" यावर "इश्श भलतंच काय? मला नाहीं हो एवढी हौस ! पण लग्नाला ब्यांड तरी पाहिजेत निदान !" असा त्यांचा कलह चालू असे.

आजही असा कांहीं तरी विभाकराच्या लग्नविषयक कलह ऐकायला मिळेल, तो थोडा वेळ ऐकून विभाकरकडून एक सिनेमा उकळण्याच्या हेतूनें मी त्याच्या घरीं आलों. दरवाजा बंद होता. मी घंटा दाबणार तोंच आंत कोणा-तरी परकी गृहस्थाचा आवाज ऐकूं आला. खिडकी उघडी होती. मी आंत डोकावून पाहाणार. इतक्यांत—

"काय म्हणतां काय तुम्हीं? असें असेल तर लग्न मोडलें पाहिजे !" हे काकांचे तारस्वरांतले उद्गार ऐकून मी जागच्या जागीं थिजून गेलों. वज्राघात झाल्यासारखें वाटलें मला ! त्या गृहस्थाची हलक्या आवाजांत चाललेली कुजबुज मला ऐकूं येईना; आंत जाण्याचेंही धैर्य होईना. कांहीं तरी वाईट गोष्ट कळणार ! किती प्रयासानें विभाचें लग्न जमलें आणि ही काय भानगड मध्यें उपस्थित झाली आणखी ! मी मागल्या पावलीं परत फिरलों. मोठ्या आनंदानें घातलेला परीट घडीचा कोट खसकन् ओढून काढून कॉटवर पडलों. परंतु मनाला चैन पडेना. काय असावें बरें? दुसऱ्याच्या सुखांत विष कालवण्याच्या दुष्ट बुद्धीनें कोणी

तरी काकांच्या मनांत त्या मुलीविषयीं विष भरीत नाहीं ना? असेच परत जाऊन खरा प्रकार काय तें समजावून घ्यावें काय? वाईट बातमी ऐकण्याचें लांबणीवर टाकलें; पण त्यामुळें मनाची तळमळ वाढली मात्र! पण माणसाचें एक मन देऊन आलें तरी दुसरें मन शरीराकडून दररोजचे व्यवहारधर्म नीटपणे बजावून घेतें. मी उठलों. पुन्हा कोट चढवला. अगदीं नेहमींप्रमाणे टेबलावरच्या आरशांत नजर टाकली. पायांत चप्पल सरकवल्या. दाराला कुलूप घालून किल्ली खिशांत टाकली. खानावळींत जाऊन नेहमीच्या जाग्यावर जेवायला बसलों. अनेक लोक तेथें आले होते. प्रत्येकाच्या मनांत त्यावेळीं काय विचार चालले असतील हें कळणें किती कठीण आहे? चार दोन ओळखीच्या इसमांबरोबर मी हंसत हंसत नेहमींप्रमाणें कांहींतरी बोललों. पण अंतर्मनांत विचार चालले होते. विभा, त्याचे लग्न आणि ती मुलगी.

परत येतांना माझ्या अपेक्षेप्रमाणे विभाकर गॅलरीत माझी वाट पहात असलेला दिसला. कुलूप काढून मी प्रथम दिव्याचें बटन दाबलें. माझ्या मागोमाग विभा आत आला होता. अगदी उतरून गेला होता त्याचा चेहरा! "काय झालं रे, कांहीं विशेष?" अनिष्ट बातमीची मला आगाऊ कल्पना असूनही मी बाहेर तसें दाखविलें नाहीं. आपल्या स्वभावाला साजेल अशा थंडपणानें तो म्हणाला, "काका ठरलेलं लग्न मोडू पहाताहेत."

"कां?"

'अरे त्या मुलीचं शील चांगलं नाही. अशी खात्रीलायक बातमी कळलीय त्यांना!'

पण शील चांगलं नाहीं म्हणजे काय, जरा स्पष्ट सांग ना.'

'कोल्हापूरला ही मंडळी असतांना म्हणे कोणाबरोबर तिचं प्रेम जमलं होतं आणि त्या प्रेमाचं दृश्य फलही जगांत अवतरलं होतं.'

'काय?' एवढाच उद्गार माझ्या तोंडून निघाला. छे, ती गोड सालस मुलगी; विभाची भावी पत्नी म्हणून जिच्याकडे पाहिलं...

" झूट बात आहे कांहींतरी " मी कडवटपणानें बोललों.

" हें पहा प्रभाकर, त्याविषयीं आपण नंतर खात्री करून घेऊं. पण ऐकलेली बातमी खरी आहे असं सध्या धरून चालूं. तरीसुद्धां लग्न मोडायचं नाहीं मला, आणि या बाबतींत काकचं मन तूं वळवलं पाहिजे. "

" म्हणजे, म्हणणं तरी काय तुझं ? असल्या कलंकित मुलीबरोबर–" पण पुढचे रागीट शब्द मला मनांतच गिळावे लागले.

" कलंकित ? कलंकित ? अर्थ काय या शब्दांचा ? " एकदम उसळून विभा म्हणाला. " कुमारिका तरूण मुलीनं प्रेम करणं म्हणजे कलंक वाटतो तुला प्रभाकर ? तेवीस वर्षांच्या मुलीकडून नैसर्गिक होणारी गोष्ट आहे ती ! निसर्ग आहे हा प्रभा ! मोहाचे प्रसंग ज्यांच्या आयुष्यांत आलेच नाहींत असे तुझ्यामाझ्यासारखे तरूण शुद्ध नीतीचे राहिले तर मोठसं नवल नाहीं त्यांत ! लग्नाची वयोमर्यादा भरमसाट वाढवायची आणि नीतिनियम बाकी पाळण्यांत लग्न होत होतीं तेव्हांचेच रूढ ठेवायचे ! मला संताप येतो आहे तो तिचा नाहीं. स्वतःची जबाबदारी न ओळखतां तिला मातापदापर्यंत आणून जगाच्या वावटळींत एकाकी सोडून देणाऱ्या त्या भित्र्या बेजबाबदार नरपुंगवाचा ! आणि म्हणून तर लग्न मोडून तिला आणखी देशोधडीला लावणें म्हणजे पुरुषजातीनें तिच्या बाबतींत केलेल्या गुन्ह्यांत आणखी दुप्पट भर घालणें होय. "

विस्मयचकीत होतसाता मी विभाचें व्याख्यान ऐकत होतों. इतक्या वर्षांची गाढ मैत्री असूनहि विभाकर इतका प्रगमनशील उदारमतवादी असेल अशी माझी कल्पना नव्हती. प्रसंगाशिवाय माणसाचा खरा स्वभाव प्रकट होत नाहीं हेंच खरें !

बराच वेळ आम्हीं चर्चा करीत बसलों. आणि शेवटीं त्या मुलीची एकांतीं भेट घेऊन प्रत्यक्ष तिलाच विचारायचें असें ठरलें. वास्तविक तिला भेटण्याचें काम विभानें एकट्यानें करावें असें माझें म्हणणें होतें. पण विभा कबूल होईना. त्याला माझी सोबत हवी होती.

दुसऱ्याच दिवशीं तिच्या घरच्या नोकराला गांठून मी एक चिठ्ठी त्याच्या-जवळ दिली. दिभाकरनेंच ती लिहिली होती. त्यानें लिहिलें होतें,–' आपल्याशीं कांहीं महत्वाचें बोलायचें असल्यामुळें भेट व्हावी अशी इच्छा आहे. शक्य असल्यास संध्याकाळी चौपाटीवर भेटावें.'

संध्याकाळीं आम्ही केव्हांपासून तिची वाट पहात चौपाटीवर हिंडत होतों ती येते कीं नाहीं हेंच आम्हांला समजत नव्हतें. थोड्याच वेळांत ती येत असल्याचें दिसलें. आम्हीं एक दूरचा कोपरा गांठला आणि ती खालीं बसल्यावर थोड्या अंतरावर आम्ही दोघे बसलों. बोलायला सुरवात कशी करावी तेंच समजेना. किती मलूल दिसत होता तिचा चेहरा! बहुधा तिला कल्पना असावी आमच्या प्रश्नाची! तिनेंच एकदम सुरवात केली—" आपल्याला काय बोलायचें आहे तें माहित आहे मला! आपल्या घरीं जें वादळ उद्भवलें तें आमच्याहि घरावरून गेलें थोडेसें! आपण जें ऐकले आहे तें खरें आहे. ठरलेलें लग्न मोडलें तर मला वाईटच वाटेल; पण तरीसुद्धां आपली दिशाभूल करण्याची माझी इच्छा नाहीं. ज्याच्यावर मी प्रेम करीत होतें त्याला काही अज्ञात कारणामुळें माझ्याशी लग्न करतां येत नव्हतें. पण म्हणून प्रीतिसरितेला आम्हांला बांध घालतां आला नाही. मोहवश होऊन प्रेमौघांत आम्हीं दोघे बुडालों. निसर्गनियमाप्रमाण परिणाम मला भोगावा लागला."

" पण त्या तरुणानें तुम्हांला असें फसवलें कां? आपल्यावरची जबाबदारी टाळली कां? तुम्हांला त्याची चीड आली नाहीं का? तुम्हाला आतां त्याबद्दल पश्चात्ताप होत असेल अशी माझी समजूत आहे" दिभाकर म्हणाला "नाहीं." चुकीची आहे आपली समजूत. मला चीड आली नाहीं. त्याला माझ्यापासून दूर व्हावं लागलं त्याला तसंच कारण आहे. हेतूपूर्वक त्यानं तें केलं हें सांगितलेंच मी! दोन तरूण जीवांचं एकमेकांवर अत्यंत प्रेम असलं कीं तिथं, राग, चीड, पश्चात्ताप हे शब्द नसतात. प्रीती साऱ्या जगांत भरून उरलीय असं दिसतं त्यांना"! तिचे भावपूर्ण डोळे किंचित् ओलसर झाले असावे. चेहऱ्यावर उदासीनतेची

छाया पसरली होती. आणि विभाकर! त्याच्याकडे पाहून मला कांहींच अर्थबोध होईना. नाकासमोर सरळ पाहाणाऱ्या साध्याभोळ्या विभाकरासमोर कसला चमत्कारिक पेचप्रसंग पडला हा! कल्पनेलाही गुंग करून सोडणारे प्रसंग मानवी आयुष्यांत येतात हें आजवर मी वाचीत होतों नुसता!

ओहटी असल्यामुळें लाटांचा खळखळाट कानावर येत नव्हता. पण बारीक लाटांचा जो एक घों, घों, असा गंभीर निनाद निघतो तो कर्णपथावर आदळत होता. समोर सूर्यानें केव्हांच पाण्यांत बुडी मारली होती. त्याची लाल, गुलाबी रंगाची छाया अजून आसमंतात् रेंगाळत होती. विभाच्या सौंदर्यपूर्ण चेहऱ्याचा गुलाबी रंग धुवून गेल्यासारखा दिसत होता.

# तुटलेला पतंग! : : : ७

सुरंगाबाद
ता. १५-३-४१

प्रिय ताई,

मी लग्न करावं म्हणून तूं सारखी माझ्या मागं लागली आहेस. तूं पत्रांतून जें जें लिहितेस ते ते सारं मला पटतंय; पण गोष्ट मात्र पटत नाहीं. वयाला चाळीस वर्षं पूर्ण झालेला, तीन मुलांचा बाप मी! संसाराच्या खेळांत अर्धा डाव होतो न होतो तों माझी जोडीदारीण मला सोडून गेली. खेळ पूर्ण होण्याकरितां तिथं दुसरी जोडीदारीण आणली पाहिजे हें मला एकदम कबूल! पण अर्धा डाव होऊन गेलेल्या अशा खेळांत एखादी वीसबावीस वर्षांची नवखी, अननुभवी मुलगी आणून काय ग उपयोग? घाबरत, बिचकत बिचकत ती येणार; रंगांत आलेल्या पण मध्येंच हुकुमी पान नाहीसं झाल्यामुळं विस्कळलेल्या माझ्या संसारांत ती नव्यानं प्रवेश करणार! तिला कसं काय जमेल? आईविरहित झालेलीं माझीं तिन्ही मुलं...कोणत्या दृष्टीनं पाहील ती त्यांच्याकडे!

किशोरी अकरा वर्षांची झालीय् आतां. इतकी कांही सुंदर आणि गोड पोरगी दिसते आहे सांगू! निव्वळ आपल्या आईची प्रतिमा. मी लग्न केलं तर...ताई, तूंच सांग, तिला आता सारं समजायला लागलं; घरांत तिलाच

अधिक त्रास होईल, नाही का ? आणि किशोरी तर माझा अगदी जीव की प्राण ! तू म्हणतेस तशी एखादी गरीब, समंजस मुलगी पाहून मी लग्न केलं तरी सावत्र आईचा हक्क प्राप्त झाल्यावर तिच्या समजसपणाविषयीं कोण खात्री देईल बुवा !

आठ वर्षाचा सुनील आणि चार वर्षाचा अनिल—आई गेल्याचं दुःख त्यांना जाणवत नसेल का ? आणि दुसरी आई आणली तर त्यांच्या कोवळ्या मनावर, त्यांच्या दुःखावर डागण्या दिल्यासारखं होईल कदाचित् ! माझ्या प्रेमाचा ओलावा सिंचून हीं तीन फुलं मी प्रफुल्लित ठेवण्याचा प्रयत्न करतों. पण बापाचं प्रेम म्हणजे बीजाकुरावर उन्हाळ्यांत झारीनं केलेला पाण्याचा शिडकाव ! आकाशांतून सरसरून येणाऱ्या जलधारांनींच आईच्या प्रेमाची बरोबरी करावी. जीवन, वाढ, विकास त्यात असतं सारं कांहीं ! सावत्र आई आणून मी त्यांच्याभोंवतीं कांटे पसरल्यासारखं तर होणार नाही ना ?

बाकी ताई, सणासुदीच्या दिवशीं मात्र घर कसं खायला येतं बघ तिन्ही मुलांचीं दीनवाणीं तोंडं पाहून अगदी भडभडून येतं. आचाऱ्यानं केलेल्या गोड पक्वान्नाला मायेच्या हाताचा उबारा नसतो नी घास घशाखालीं उतरत नाहीं. सुनील-अनिलला नोकराच्या राकट हातांनी आंघोळ घडते अन् मग स्वाऱ्या त्याच्याशीच गोडगोड बोलत बाहेर फिरायला जातात. तेव्हां वाटतं, स्त्रीच्या गोड आवाजांत, साध्या हालचालींत, इकडेतिकडे वावरण्यांतसुद्धां ज्या भावना ओतलेल्या असतात, जी माधुरी साठलेली असते, त्या भावना व माधुरीविरहित जें घर—घर कसलं तें, एखादी मठी नाहींतर आश्रम म्हणावं त्याला !

तेव्हां आहे हें सारं असं आहे. दोन्ही बाजूंना मनाचा तोल सारखाच झुकतो; म्हणूनच काय करावं तें समजत नाहीं. मुलांचं अनहित न होतां मला सुख लाभेल अशी एखादी तोड सुचवतेस का ताई ? आठपंधरा दिवस तूं तरी येना इकडे राहायला. बाकी मी तुला असं सांगून उपयोग काय म्हणा ! एकदम

एवढ्या लांब यायला तुला वेळ कसा होणार नी शिवाय आठपंधरा दिवस आलीस तरी नेहमीच माझं हे असंच चालणार ना?

तुझा

**प्रभादादा**

•••

सुरंगाबाद

ता. २८-३-४१

प्रिय ताई,

तूं सुचविलेली तोड विचार करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. मध्यम वयाच्या मुलं नसलेल्या एखाद्या सुशिक्षित पण समंजस विधवेशीं मी लग्न करावं हे तुझं म्हणणं मला खरोखर विचारणीय वाटतं. तूं म्हणतेस तसं एखाद्या विधवाविवाह मंडळांत मी अजून नाव नोंदविलं नाहीं; पण त्याविषयी विचार मात्र करतोय. 'मुलं नसलेल्या' असं तूं अगदीं आपल्या पत्रांत अवतरणचिन्हात लिहिलंस, म्हणून माझं लक्ष तिकडे जास्तच वेधलं. मुलं नसलेली विधवा पाहायची मग तिनंहि मुलं नसलेला विधुरच पाहायचा असं ठरवलं तर? ताई, विचार करण्यासारखी ही गोष्ट आहेसं नाहीं वाटत तुला? समानतेचं युग आहे हे!

मूल नसलेली विधवा आणि प्रौढ कुमारिका यांत फरक काय? एखाद्या अल्लड, अननुभवी कुमारिकेला माझ्या मुलांचं अस्तित्व सहन व्हायचं नाहीं. विधवा परिस्थितिवश व एकदां ठेचाळलेली असते म्हणून समंजसपणानं अगर मन मारून वरवर सहनशीलपणा दाखवील, इतकंच की नाही! पण ती स्वतः माता झालेली नसल्यामुळं आईविरहित मुलांच्या स्थितीशीं समरस होऊं शकणार नाहीं. मातृत्व प्राप्त झालेली स्त्रीच पूर्णत्वाला पोंचते. आईच्या प्रेमाचा अनुभव जिला आहे तीच स्त्री मातृविहीन मुलांकडे मातेच्या प्रेमानं पाहील.

शिवाय दोघांहि समान स्थितींत असल्यावरच घरांत शांतता आणि सौख्य नांदेल अशी माझी कल्पना आहे.

माझीं मुलं आहेत तशीच तिचीहि असलीं म्हणजे कोणीच कोणाचा हेवा-दावा करायला नको. सुदैवानं आणखी तीनचार माणसांचं पालनपोषण करूं शकण्याइतकी माझी सांपत्तिक स्थिति अनुकूल आहे. माझे हे सगळे विचार तुला कसे काय वाटतात?

तुझा

**प्रभाकरदा**

•○○

आनंदपूर

ता. ४-४-४१

प्रिय प्रेमा,

पत्राचं उत्तर पाठविण्यास उशीर होत आहे म्हणून रागावूं नकोस बाई! तुझं पत्र वाचून मोठ्या विचारांत पडलें मी! इकडे पुरुषांच्या क्लब-मधें जाऊन मी टेनिस खेळतें, पोहायला जातें, प्रतापला बोर्डिंगांत टाकलाय त्याच्याकडे दुर्लक्ष करतें—थोडक्यांत म्हणजे मी बेफामपणे वागतें—वगैरे बातम्या तुला त्या कुंदा शितोळेनं दिल्या ना? मला वाटलंच होतं तसं होणार म्हणून. कांहीं आरोप कबूल आहेत मला. पण त्याची कारणमीमांसा केलीय का या कुंदेनं तुझ्याजवळ? शक्यच नाहीं तें!

रजनीकांत वारल्यावर दोनतीन वर्षं मी दुःखांत पिचत बसण्यांत काढलीं पण दुःख तरी किती करायचं? काळ आपोआप पांघरूण घालतो त्याच्यावर. नर्सची नोकरी करायला लागून आर्थिक दृष्ट्या स्वातंत्र्य येतांच माझी पूर्वीची खेळकर वृत्ति, उत्साह जागा झाला. जीवनांत उल्हास उत्पन्न करण्याची इच्छा कोणाला नसते? प्रताप पांच वर्षांचा होतांच त्याला येथल्याच विजय विद्यामं-

दराच्या बोर्डिंगात ठेवलंय. तसं नको करूं तर काय करूं! नर्सची आठ तासांची कष्टाची नोकरी करताना प्रतापकडे लक्ष कसं पुरवूं मी? रात्रपाळीला सुद्धां जावं लागतं मला! नोकरावर विसंबून आणि वेळीअवेळी प्रतापला एकलकोंडा ठेवणं चांगलं कीं बरोबरीच्या मुलांत शिस्तवार शिक्षणक्रमांत त्याला रुळलेलं ठेवणं चांगलं? दर रविवारीं तो घरीं येतो नी मग तो दिवस आम्हीं अगदीं एकत्र मजेत घालवितों. नर्सची नोकरी म्हणजे निर्मळ बालकांच्या मेळाव्यांत खुर्चीवर बसून त्यांना बोधामृताचे घुटके पाजणं नव्हे. इथं कडूकडू औषधांचे डोस व्याधिग्रस्त जीवांच्या घशांत जुलुमानं ओतावे लागतात. शेकडों तऱ्हेचीं माणसं इथं येतात. तेंच तेंच काम त्या दुःखी वेदनापीडित जीवांभोंवतीं करतांना मन केव्हां केव्हां कष्टी, विषण्ण होतं, जीव कंटाळून जातो आणि मग थोडंसं तरी चैतन्य, उत्साह वाटावा, मन ताजतवानं व्हावं म्हणून टेनिस खेळणं अगर फिरायला जाणं आवश्यक नाहीं का?

पुरुषांत मी वावरते म्हणून ना भारी भीति वाटते आहे तुला? एक मुलगा असलेली विधवा तरुण स्त्री आहे मी? जगाच्या मायावी बाजारांत फसविली जाइन, कदाचित् मोहाच्या प्रवाहात मी वाहून जाईन असं तुला वाटतंय् ना प्रेमा?

दोरी तुटलेला पतंग किंवा शीड नसलेली होडी आणि नवरा नसलेली स्त्री सारख्याच असतात, प्रेमा! जगांतल्या वावटळींत वाताहात व्हायची त्यांची! तुटक्या पतंगाचे हवेंतले हेलकावे, बिनशिडाच्या होडीचा बेफाम लाटांवर होणारा नाच—जग मौजेनंच पाहात नाहीं का असल्या गोष्टींकडे! झालं तर मग! माझं कसं होईल याची काळजी तुझ्यासारख्या एका भावड्या मैत्रिणीनं करून काय ग उपयोग? असो.

प्रताप अगदी मजेंत असतो. शिकण्यांत मोठा हुशार आहे पोरगा! पहिलीचं पुस्तक चांगलं वाचूं लागला आहे. मोठा झाल्यावर अगदीं प्रति-रजनीकान्त

दिसेल हं ! अन् लबाड प्रेमा-मावशीपेक्षां तिच्या छोट्या कुसुमची भारी आठवण काढतो. संभाळ ग बाई ! नाहीतर जावई म्हणून पडेल गळ्यांत !

तुझी

**रजनी**

**ता. क.**-गेल्या वर्षी दोन दिवस मी तुझ्याकडे येऊन गेलें. आता तूं येना एकदम आमचं आनंदपूर पाहायला. **रजनी**

•••

आनंदपूर

ता. २५-४-४१

प्रिय प्रेमा,

किती ग गोड, प्रेमळ आहेस तूं ! इतक्या कळकळीनं माझ्या जीविताचा तूं कां विचार करतेस ? वेडी आहेस झालं ! लग्न करून पुन्हां संसारांत पडावं असं तुला वाटतंय. माझ्या मनांत काय हा विचार येऊनच गेला नसेल असं तुला वाटतं ? पण शक्यतेचा विचार नको का करायला ? पहिली गोष्ट म्हणजे मी रूपानं फारशी सुंदर नाहीं. वयाची तिशी उलटलेली विधवा, एक मुलगा असलेली आणि नर्सची नोकरी करणारी—कोणता गृहस्थ असली ब्याद आपण होऊन गळ्यांत घेईल ? त्यांतून एखादा तयार झालाच तर माझ्या प्रतापशीं कसा वागेल तो कोण जाणे ! बायका मत्सरी असतात असं पुरुषांनीं कितीहि म्हटलं तरी पुरुषच या बाबतींत अधिक मत्सरी असतात असं मला वाटतं. लग्नासाठीं सुंदर तरुण विधवा त्यांना चालते; पण तिची पहिलीं मुलं मात्र असतां कामा नयेत ! मग ह्यांना पहिल्या संबंधाचं मुलांचं लेंढार असलं तरी चालतं ? हा काय न्याय झाला ? मग सांग पाहूं...असला विचार मी करणं प्रतापच्या हिताच्या दृष्टीनं योग्य होईल का ? असो.

प्रतापला उन्हाळ्याची दीड महिना रजा आहे. मीदेखील महिन्याची रजा

घेतलो आहे. आणि परवा आम्ही सुरंगाबादच्या माझी आत्या आहे तिच्याकडे जाण्यास निघू. आत्याचे यजमान तेथले बडे वकील आहेत. तेव्हा पुढील पत्र C/o रा. ल. फडणीस, वकीलसाहेब, सुरंगाबाद, या पत्यावर पाठव हं! अग, तुझ्या भावाची बदलीहि सुरंगाबादला झालीय असं एकदां म्हणाली होतीस. अजून तिथंच आहेत का तुझे बंधु? असल्यास तूहि ये तिकडे. मग खूपच मजा येईल.

तुझी
**रजनी**

•••

सुरंगाबाद
ता. ४-५-४१

प्रिय ताई,

आमच्या टेनिसकोर्टवर एक नवीन लेडी मेंबर येऊं लागली आहे या महिन्यापासून. येथील प्रसिद्ध फडणीस वकील आहेत ना, त्यांची भाची. अल्लड कॉलेजकुमारी नाहीं हं! चांगली भारदस्त प्रौढ विधवा आहे. सर्वांशीं मोकळया मनानं बोलते आणि वागणूक किती गोड, विनम्र! मध्यम वयांतहि स्त्रीच्या अंगीं इतकी खिलाडू वृत्ति आणि उत्साह असल्याचं उदाहरण मी आत्तांच पाहातों आहें.

माझ्या अंगीं बोलकेपणा कमीच नाहीं तरी! तिच्याशीं पुष्कळ बोलावं, तिचं जीवन जवळून पाहावं, असं वाटतंय मला! पण माझ्या अबोल स्वभावाला हें जमणार कसं? या वेळीं तूं इकडे असतीस तर किती छान झालं असतं!

तुझा
**प्रभादादा**

•••

सुरंगाबाद
ता. १२-५-४१

प्रिय, ताई,

शेवटीं लग्नाला आली नाहींस तूं म्हणून किती वाईट वाटलं आम्हां दोघांना! मुलगा असलेल्या विधवा रजनीशीं मी पुनर्विवाह केला ही गोष्ट तुझे सासूसासरे आदि मंडळींना आवडली नाहीं म्हणून तुला त्यांनीं पाठविल नाहीं. पण नवऱ्याची परवानगी घेऊन तूं कां आली नाहींस? वसंत-रावांनीं आडकाठी घेतली नसती खास.

घर कसं नंदनवनासारखं वाटतय् हल्लीं मला! रजनी म्हणते, "रजनीच्या आयुष्यांत प्रभाकराचा उदय झाल्यामुळं रजनीचं अस्तित्व संपलंच आहे!" रजनीची उषा झालीय् आतां. ही चारहि मुलं माझींच आहेत, तुमचं कांहीं नाहीं असं ती चक्क म्हणते. नोकरचाकरांशीं सुद्धां किती प्रेमानं वागते ती! मग मुलांना अगदीं जीव कीं प्राण करते यांत काय शंका!

आनंदपूरच्या हॉस्पिटलच्या नोकरीचा तिनं केव्हांच राजीनामा दिला.

तुझ्याकडे प्रत्यक्ष जावून तुला घेऊन यावं म्हणून तिनं सारखा तगादा लावलाय. त्याप्रमाणं आणखी तीनचार दिवसात मी तिकडे येत आहें. मग तरी येशील कीं नाही?

आतां मी हे पत्र लिहीत आहें ना, या वेळीं जेवणखोलींत रजनीभोंवतीं मुलांचा किलबिलाट चालला आहे. मधूनमधून रजनीचे गोड समजुतीचे शब्द ऐकू येत आहेत. इथं माझ्या टेबलावर तिच्या केसांतील जुईची वेणी पडली आहे. तिचा वास घेत घेतच मी हे लिहितों आहें. आणखी थोड्याच वेळांत रजनी आंत येईल अन् माझ्या खुर्चीच्या पाठीला धरून म्हणेल, 'जेवायला उठायचं ना आतां? बहिणीशीं पत्रांतून किती हितगुज करायचं तें सारखं! ती इकडे आल्यावर आमच्या वांट्याला येणार कीं नाहीं स्वारी!' ती आंत येऊन असं मिस्किलपणानं म्हणायच्या पूर्वीच मी हें पत्र संपवितों.

तुझा
**प्रभादादा.**

——:०:——

# सौभाग्य : : : : ८

" दुःख ! अजदींच कसं पण कांहीं नाहीं तिला वाटत ? "

" माणूस आहे कीं कोण आहे कोण जाणे ! अहो तिसरा दिवस आज उजाडला नाहीं तोंच ही बाई आपली लफ्फेदार लुगडं नेसून, कशी हक्कानं बाहेर गेली आपली ! "

" थोडासा म्हातारा झाला तरी नवराच होता ना तो तिचा ! नी चांगलं दोन वर्ष जोपासलंन् हिला ! त्याचं तरी कांहीं वाटायचं थोडं मनाला ! "

उन्हांतून आल्यामुळें धापा टाकीत मी जिना चढत होतें. गॅलरीच्या कोपऱ्यांत बायकांचें चाललेलें बोलणें मला स्पष्ट ऐकूं येत होतें. खोलीचें कुलूप काढून मी आंत आलें. त्यांचें बोलणें चाललेंच होतें—

" आमच्या डोळ्यांना पाणी आलं त्याला बाहेर काढतांना ! पण ही निलाजरी ! अहो, कुंकू नी मंगळसूत्र वाढवतांना सुद्धां हिच्या डोळ्यांना थेंब नाहीं. दगडी पुतळा नुसता ! हृदयच नाहीं मेलीला ! नव्हता बाई असा मुलुख, वेगळा प्रकार पाहिला या जन्मांत ! " एक काकू गरजल्या.

" आणि तिसरे दिवशींच बाहेर पडून आपलं अमंगळ दर्शन कीं हो केलं या सटवीनं आम्हांला ! एक सौभाग्यवती किंचाळल्या.

खोलींत आरामखुर्चीवर बसून मीहि मनाशीं याच गोष्टीचा विचार करीत

होतें. मोठी नवलाची नी कुतूहलाची गोष्ट वाटत होती चाळीत ती सर्वांना! चाळींतल्या बायकांचे जे उद्‌गार मी ऐकत होतें त्यांत खरोखर तीळभरहि अतिशयोक्ति नव्हती.

दोन वर्षांपूर्वींच आमच्या चाळींत कोपऱ्यावरच्या ब्लॉकमध्यें तें बिऱ्हाड आलें. दोनच माणसें—नवरा नी बायको. हिरव्या बांगड्या आणि हिरवी साडी यावरून नवी नवरीच असावी ती असा आम्हीं तर्क केला. पण ती विशीच्या आंत बाहेर असलेली तरुणी, आणि तो चांगला पंचेचाळीसच्या पुढें गेलेला पोक्त गृहस्थ! अर्थात् तो बिजवर होता हें न सांगतां समजण्यासारखें होतें. पण चांगला मोठा पगार असावा त्याला असें एकंदर सामानसुमान, राहाणी यांवरून वाटत होतें. गृहस्थ मात्र सालस व गरीब स्वभावाचा. मोठा आवाज सुद्धां त्याचा कधीं ऐकूं आला नाहीं. आणि ती? गव्हासारखा तेजदार वर्ण, काळेभोर दाट केस, आणि किंचित् घारेच बारीक डोळे. एकंदरींत दिसायला तरतरीत. स्वभाव मात्र कांहींसा घुम्माच! फारसें हसणें-बोलणें नाहीं, बायकांत मिसळणें नाहीं; पण गर्व म्हणावा तर मुळींच नाहीं. कोणी आल्याचा आदर आणि सन्मान इतका ठेवी ती, कीं खवचटपणानें गेलेल्या बायका तिच्या खोलींतून गारीगार होऊनच परत येत. पण नवविवाहित तरुणींतला उल्हास, आनंद, औत्सुक्य कशाचाच मागमूस तिच्या ठिकाणीं लागत नव्हता, थोड्या वेळानें उमलणारी कळी कोणीतरी दाबावी, आवळावी म्हणजे ती जशी निष्प्रभ फिकट दिसेल तशी ती दिसे. नवरा वयानें जरा मोठा एवढी एकच गोष्ट वगळली तर तिच्या आयुष्यांत कशाची कमतरता असेल असें वाटत नव्हतें.

आणि गेल्या आठ दिवसांतच ती अत्यंत खेदजनक गोष्ट घडून आली. चार सहा दिवसांचा ताप येण्याचें निमित्त होऊन त्या ब्लॉकचे मालक परवा एकाएकी वारले. पतिनिधन म्हणजे स्त्रीवर दुःखाचा डोंगर कोसळणें हा संकेत ठरलेला! पण साऱ्यांना विस्मयचकित करणारी गोष्ट घडली ती ही, कीं त्यांची पत्नी इंदिराबाई हिला त्याचें कांहीं दुःख झालेलें दिसलें नाहीं. त्यांची आप्तेष्ट

मंडळी फारशी नव्हतीच. जी चारदोन मंडळी जमली ती व चाळींतील कांहीं मंडळी यांनीं पुढील विधि पार पाडला आणि आज तिसरे दिवशीं इंदिराबाई भर-दुपारीं कुठेशी बाहेर गेली. तिच्या या वागणुकीमुळें चाळींत सर्वांना विलक्षण नवल तर वाटलेंच, पण तिच्याविषयीं तिरस्कारसुद्धां उत्पन्न झाला.

अशा स्थितींतच पंधरावीस दिवस निघून गेले. इंदिराबाईचे वडील वगैरे नात्याची मंडळी येऊन गेली. पण ती त्यांच्याबरोबर माहेरीं गेली नाहीं. त्य ब्लॉकमध्यें ती एकटीच राही. कोणीच तिच्यापाशीं बोलत नव्हतें. तिलाहि त्याची पर्वा वाटत नव्हती. दिवाळीचा दिवस उद्यांवर येऊन ठेपला. मी दारांत बसून रांगोळी घालीत होतें. एक नीटनेटका तरुण हातांत एक पिशवी घेऊन आला आणि इंदिराबाईच्या दारांत थबकला. दाराला कुलूप होतें. मी उठून उभी राहिलें. त्या तरुणाला तिच्या घरीं आलेला मीं दोनतीनदां पाहिलें होतें. त्यावरून झालेली चाळींतल्या बायकांची कुत्सित टीकाहि माझ्या कानांवरून गेली होती. "बाहेर गेल्यात त्या. काम होतं?" त्याला घुटमळत उभा राहिलेला पाहून मी विचारलें.

"हें इतकं त्यांना द्याल? श्रीनिवास भाईनं दिलंय् असं सांगा. कराल इतकं काम?"

"हो, न करायला काय झालें! द्या इकडे." मी उत्तर दिलें.

"थँक्स!" असं म्हणून तो निघून गेला. पिशवींत एक पितळी डबा होता. मीं तर्क केला, बहुधा डब्यांत फराळाचे जिन्नस असावे. इंदिराबाई दुःखी उद्यां दिवाळीचा दिवस, म्हणून तिच्या नात्याच्या माणसांनीं तिला ही भेट पाठविली असावी.

रात्रीं मी सिनेमाला गेल्यामुळें डबा पोचता करायचें काम तसेंच राहिलें. सकाळीं अभ्यंग स्नान उरकून मी तो डबा व घरीं केलेलें थोडेसें फराळाचें घेऊन इंदिराबाईच्या खोलींत प्रवेश केला. ती नुकतीच न्हाऊन केस मोकळे टाकून बसली होती.

"या, या आंत." मारें तिनें स्वागत केलें. चमकलेंच मी तिला पाहून! तिनें आपल्या कपाळावर आजच पुन्हां कुंकुमतिलक रेखला होता. दारच्या तुळसी वृंदावनासारखी शांत रम्यता तिच्या चेहऱ्यावर विलसत होती. माझी बावरलेली मुद्रा पाहून ती किंचित् हसली. कसाबसा डबा पुढें ठेवून तो कोणी आणलाय् तें सांगून मी जाऊं लागलें.

"हें काय, जरा बसा ना निर्मलाताई." तिनें माझा हात धरून मला एका खुर्चीवर बसविलें. तरी माझें बुजलेले मन आणि गोंधळलेली चर्या यांत मुळींच फरक झाला नाहीं. दोनतीन मिनिटे अगदीं स्तब्धतेंत गेलीं. फटाक्यांचा कडकडाट दूरवर अजूनहि मधूनमधून ऐकूं येत होता. नुकत्याच वर येत असलेल्या सूर्यबिंबाचा लालसर कवडसा खिडकींतून इंदिराबाईच्या मुखावर पडला होता. तिनें नुकत्या रेखलेल्या कुंकुमतिलकाशीं तो जणूं स्पर्धा करीत होता. देवापाशी सुंदर रांगोळी घातलेली होती. उदबत्त्यांचा आणि ताज्या शेवंतीच्या फुलांचा संमिश्र सुवास खोलीभर दरवळत होता. अगदीं शांत आणि रम्य वाटलें मला तें वातावरण.

"भारीच आश्चर्य वाटतंय् नाहीं तुम्हां सर्वांना? स्त्रीच्या जीवनांतील अत्यंत दुःखपूर्ण घटना घडली असतांनाही मी इतकी शांत व निश्चल कशी? पतिनिधनाचं दुःख मला कांहींच कसं नाहीं? कसाहि नवरा असला तरी सौभाग्य हरपतांच बायकांना अतिशय दुःख होतं. पण खरं सांगूं निर्मलाताई? माझं सौभाग्य हरपलं नाही—तर तें मला आतां उलट प्राप्त झालं आहे." एका दमांत ती आजच इतकें बोलली. पण शेवटचें वाक्य किती विलक्षण अन् भयंकर!

"काय?" असा एक अस्पष्ट आश्चर्योद्गार माझ्या तोंडून निघाला असावा, पण ती आणखीच हसली. खोल, विकट हास्य होतें तें तिचें!

"निर्मलाताई, तुम्हालाच काय, पण कुणालाच कल्पना नाहीं व्हायची माझ्या आयुष्याची!"

"मला केव्हांपासून कुतूहल वाटत आहे तुमच्याविषयी मोठं! समजेल का मला तुमची हकीकत?"

"हो, सांगतेंच मी तुम्हाला सारं कांहीं. इतक्या आपुलकीनं विचारणारं नी ऐकणार तरी कोण भेटलंय् आजपर्यंत! एक श्रीनिवास आणि आज तुम्ही. ऐका आज दिपवाळीच्या मुहूर्तावर माझी कहाणी!" किंचित हसत इंदिराबाईनें स्नेहार्द्रतेनें माझ्याकडे पाहिलें आणि गंभीरपणे सांगायला सुरवात केली.

"कोंकणांतल्या गरीब आईबापांची मी मुलगी! मराठी पाच इयत्तेपर्यंत माझं शिक्षण झालं. चांगल्या बुद्धीची होते मी. पण पुढं शिक्षण मिळणं मला शक्य नव्हतें. वाचनाचा नाद मला फार होता. त्या खेडेगांवांत मिळतील तितकीं पुस्तकं व वर्तमानपत्रं गोळा करून मी वाचीत असे सारखी. त्यामुळं इतर मुलीपेक्षां त्या वयांत बऱ्याच भल्याबुऱ्या गोष्टी मला ज्ञात झाल्या होत्या. लग्नाचं वय वाढूं लागतांच बाबानीं स्थळ पाहायला सुरवात केली. बुद्धीपेक्षां सौंदर्य आणि बापाचा पैसा यालाच मागणी जास्त! त्यामुळं माझं लग्न लांबणीवर पडूं लागलं. संसाराविषयीच्या किती रम्य कल्पना मी माझ्या मनाशीं केल्या होत्या! कथाकादंबऱ्या वाचून प्रणयाचीं आणि पतिप्रेमाचीं कितीतरी उज्वल कल्पनाचित्रें मी मनांतल्या मनांत रेखाटीत असे.

"एक दिवस या माधवरावांचा फोटो आमच्याकडे आणला. स्थळ बिजवरच! फोटो मला पसंत पडला. असेल गृहस्थ फार तर पस्तीस वर्षांचा! मीं विचार केला, गरीब आणि साधारण रूपाच्या मुलीनं उत्तम प्रथम वर मिळण्याची आशा करूं नये. भरपूर पगार आहे यांना म्हणतात. चांगले रसिकहि ते असतील. असेनात बिजवर असले तर! 'फोटो अगदीं अलिकडला आहे ना बाबा?' मीं बाबांना विचारलं. 'हो तर! दुर्गे, तुझं नशीब अगदीं फळफळलं बघ! बिजवर असला तरी मुलं नसलेला अन् चांगला श्रीमंत नवरा तुला मिळाला!'

"आनंदभरानं दिलेल्या या बाबांच्या उत्तरानं मीहि खूपच आनंदून गेलें

आणि लग्नाचा दिवस उजाडेपर्यंत सारा दिवसरात्र मी मनांतल्या मनांत त्या फोटोंतल्या मूर्तीशीं खेळत राहिलें. लग्नाच्या आदल्या दिवशी ते आमच्या गावीं आले. पण अंतरपाट दूर झाल्याशिवाय मी त्यांना प्रत्यक्ष पाहाणं शक्यच नव्हतं! आणि .. आणि दुसरे दिवशीं मोठ्या धूमधडाक्यांत अंतरपाट दूर होतांच मीं काय पाहिलं निर्मलाताई ? सांगू ? फोटो माणसाची किती फसवणूक करतो! प्रत्यक्ष माधवराव पन्नाशीच्या घरांत आलेले चांगले पोक्त गृहस्थ होते! विलक्षण धक्का बसला मला! लाजाहोमाच्या वेळीं लाह्यांच्या ऐवजीं घळघळा अश्रू ओघळत होते माझ्या डोळ्यांतून! लाजाहोम नव्हता तो निर्मलाताई! अन्यायी रूढिप्रियतेमुळं माझ्यासारख्या असहाय्य गरीब हिंदु कुमारिकेचं बलिदान करण्याचं यज्ञकुंड पेटलं होतं तें! धुरानं माझ्या डोळ्यांत पाणी येतं असं वाटून भटजी तें होमकुंड प्रज्वलित करीत होते. अग्नि-ब्राह्मणांसमक्ष होत असलेले माझे पति माझ्याकडे पाहात होते. त्या पाहाण्यांत स्नेहाचा, प्रेमाचा ओलावा तरी! औत्सुक्य, उल्हास–नांव नाही! इतकं मन विटलेलं अन् आंबलेलं असतांना लग्न करावं तरी कशाला? तो रुक्ष, किंचित सुरकुतलेला चेहरा पाहून मला अधिकच हुंदका आला. मोठ्या प्रयासानं तो दाबून मी यंत्राप्रमाणं पुढील क्रिया करूं लागलें.

"पुढं? पुढचा प्रकार अधिकच भीषण आहे निर्मलाताई. गाय जशी कसायाबरोबर निमूटपणानं जाते तशीच मी असाहाय्यतेनं माधवरावांबरोबर मुंबईत आलें."

इंदिरा जरा थबकली, किंचित् हसली आणि पुढे ती म्हणाली, "कुंकू सिनेमाची तुम्हांला आठवण होत असेल निर्मलाताई, नाही? म्हणाल, कुंकूचं कथानक आणि यांत काय फरक आहे? आहे. निर्मलाताई, फरक पुष्कळ आहे. कुंकूंतली नीरा तडफदारपणानं अन्यायाचा प्रतिकार सक्रिय करूं लागली नी ही दुबळी दुर्गा आल्या प्रसंगाला निमुटपणानं मान वाकवू लागली. सिनेमांतल्या नीरेला तडफदार वागणुक कौतुकास्पद आणि अभिनंदनीय वाटत असली तरी

प्रत्यक्ष व्यवहारी जगांत तिला तसल्या वागणुकीचं काय बक्षिस मिळालं असतं हें सांगायला नकोच !

" मीं विचार केला, झाल्या गोष्टी कांही परत येत नाहीत. बांधलेली लग्न-गाठ सुटत नाही. पति मनासारखा नसला तर सुदैवानं त्याचं घर तरी चांगलं संपन्न आहे. आपल्या संसारांत जितका आनंद आणि उल्हास उत्पन्न करतां येईल तितका आपण करूं आणि होतां होईल तितकं सुखी होऊन इतरांना सुखी करूं. इथं आल्याबरोबर उत्साहानं मीगृहिणीचीं कर्तव्यं मनापासून करूं लागलें. पण माधव-राव—ते माझ्याशीं पति या नात्यानं वागत होते का? औपचारिक वागणं ! अगदी आपण पाहुण्यांशीं वागतों ना, तसं. लग्नाला पंधरा दिवस झाले, तरी माझ्याशी हसणं—बोलणं तर नाहीच, पण माझ्या सहवासाचीसुद्धा उत्सुकता दाखविली नाही त्यांनी ! या पलंगावर मी तळमळत अश्रुविमोचन करीत पडलेली असायची आणि ते पुष्कळ वेळां रात्रीं बाराएकच्या पुढं केव्हातरी येऊन त्या पुढल्या खोलीतल्या कॉटवर झोपायचे ! ते जात दहाअकराच्या सुमाराला ! जातांना बाहेरून दाराला लहानसं कुलूप लावून जात. या वेळीं चाळींत बहुतेक सामसूम होत असल्यामुळं आणि एरवीं त्यांची वागणूक प्रतिष्ठित व सोज्वलपणाची असल्यामुळं त्यांचं हें बाहेर जाणं कोणाच्या लक्षांत येत नसे.

" एक दिवस रात्रीं ते घरीच असतांना केला मनाचा हिय्या आणि आलें पुढल्या खोलींत. जणूं मी आलेंच नाही असं दुर्लक्ष त्यांनी केलं. ' तुमच्या या वागणुकीचा अर्थ तरी काय ? माझ्याशी लग्न तरी कशाला केलंत मग ? '

" चमत्कारिकपणानं हसले ते. ' लग्न केलं प्रतिष्ठितपणाकरिता, समाजांत विशिष्ट दर्जा राहावा म्हणून ! खरं म्हणजे लग्न करण्याची जरुरी नव्हती मला ! लग्नाशिवाय मी पूर्णपणानं सुखी होतो. '

" ' मग एका स्त्रीची धोंड गळ्यांत अडकवून घेऊन आता तिला कां लाथा-डतां ! ' मीं चिडून विचारलं.

"'तुम्हाला काय कमी आहे इथं? नेसायला छानदार पातळं नी झोपायला पलंग त्या कोकणांत होता का?' हेटाळणीच्या स्वरांत ते हसले. 'आणि हल्ली तुम्ही केवढ्या सुधारलांत मुंबईत आल्यापासून! खरं म्हणजे तुमच्या फोटोंतलं तें बावळट ध्यान पाहून मीं मुद्दामच तुम्हाला पसंत केलं! वाटलं, बरी आहे, राहील आपली निमुटपणानं. इतक्या हुषार असाल कल्पना नव्हती मला!'

"'आणि तरुणपणाचा फोटो पाठवून आपणहि माझी चांगलीच फसगत केलीत की!' संतापानं माझ्या डोळ्यांत अश्रू दाटले होते.

"'हं! करावं लागतं असं केव्हाकेव्हा! चांगलं बावीस वर्षांचं तुमचं वय असून 'अठरावं वर्ष लागलंय् दुर्गेला' असं तुमचे वडील नव्हते सांगत लग्नाआधी? म्हटलं सातशे रुपये रोख मोजून घेतलेत तुमच्या वडिलांनी माझ्याकडून! फुकट नाही आणलं तुम्हाला!'

"वज्राघात झाला माझ्या डोक्यावर! बाबांनी पैसे घेतले माझे? मी तिथं उभीच राहिलें. नाही मग! टवटवलेली केळ वादळानं एकदम उन्मळून पडावी तशी मी लटपटत पलंगापर्यंत येऊन धाडकन् अंग टाकून दिलं. माझ्यांतील सारी जीवनशक्तीच नाहीशी झाली. बाबा—प्रत्यक्ष जन्मदात्या पित्यानंच मला गुलामाप्रमाणं विकलं होतं! आता दुसऱ्यांना बोल लावण्यांत काय अर्थ होता? निर्मलाताई, जोंपर्यंत लग्नांत मुलगे आणि मुली विकत देण्याघेण्याची चाल आपल्यामध्ये, आहे तोंपर्यंत गुलामांची चाल बंद झाली असं मी मुळीच म्हणणार नाही. कैद्याला केव्हातरी सुटण्याची आशा असते, ह्या आशेवर तो तें आपलें खडतर जीवन संपवीत असतो; पण विवाहित हिंदु स्त्रिया! त्यांची सुटका ऐक मृत्यूच करूं शकतो!

"पुढं मला कांही कागदपत्रांवरून समजलं, की हिरा नांवाच्या एका स्त्रीच्या नादीं माधवराव कित्येक वर्ष होते. माझ्या भावनाप्रवण मनाचा मृत्यु

केव्हाच झाला होता. त्यामुळं या गोष्टीचं मला विशेष कांही वाटलं नाही. आयुष्यांतला आला दिवस कसाबसा ढकलायचा एवढंच माझं इतिकर्तव्य होऊन बसलं. एका खोलीचे दोन भागीदार राहातात ना, तशींच आम्ही नवराबायको भावनाशून्य मनानं या ब्लॉकमध्ये राहात होतों. आणि आसपासच्या साऱ्या जगाची आपली कल्पना काय ?–तर मोठं शांत नी सुखी आहे जोडपं !

" दोन वर्षं हीं अशींच निघून गेली. पुढला प्रकार ठाऊकच आहे तुम्हाला. त्यांनी आपली जीवनयात्रा लवकरच संपविली. त्यामुळं माझा मार्ग मोकळा झाला एकंदरीनं ! सुखी झाले मी ! कां मीं दुःख करावं ? कां वाईट वाटून घ्यावं मीं ? शिल्लक राहिलेल्या त्यांच्या साऱ्या पैशाअडक्याची हक्कानं मी मालकीण झालें आता ! सौभाग्य याचा अर्थ चांगलं भाग्य असाच करायचा असतो ना ? मग अगोदरच्या त्या मळमळीत नांवाच्या सौभाग्यापेक्षा आताच्या ढळढळीत वैधव्यांत मी अधिक सुखी, स्वतंत्र आणि सौभाग्यवान् नाही का ?

" निर्मलाताई, माझ्या बाबांनी मला वयस्कर माधवरावाना दिली म्हणून मला इतकं वाईट नाही वाटलं. वाढलेल्या मुलीचा आणि गरिबीनं नडलेला बाप दुसर करील तरी काय ? पण त्यांनी माधवरावांकडून पैसे घेतले, मला विकत दिली–याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. कुंकू चित्रपटांत पैशाला लोभावलेला त्या मुलीचा मामा दाखवलाय्; पण सत्यसृष्टींत जन्मदाता पिता स्वार्थांध बनून आपल्या पोटच्या गोळ्याला दुःखाच्या खाईत लोटतो ! माझंच नाही; प्रत्यहीं घडतात असलीं उदाहरणं आपल्या समाजांत !

" मध्यंतरीं जेव्हा बाबा आले आणि मानभावीपणानं समजुतीच्या गोष्टी सांगूं लागले तेव्हा दुखावलेल्या नागिणीसारखी मी त्यांच्या अंगावर फूत्कारलें खूप खूप बोललो मी त्यांना ! आणि स्वच्छ सांगितलं, ' आलांत तसे परत जा, ज्या दिवशीं मला तुम्हीं विकून टाकलंत त्या दिवशींच तुमचा माझा संबंध तुटला. तुमच्या मदतीची तर मला अपेक्षां नाहीच, पण इथल्या एका तनसडीलाहि तुम्हाला हात लावतां यायचा नाही. ' "

इदिरा विसावा घेण्याच्या हेतूने क्षणभर थांबली. पुन्हा तिच्या चेहऱ्यावर थोडंसे हास्य खेळलें अन् ती म्हणाली, " निर्मलाताई, तुम्ही अजून लग्न केलं नाहीत. स्वावलंबी आहांत तुम्ही ! पण माझ्या अनुभवावरून एक गोष्ट सांगतें तुम्हाला. स्त्री अविवाहित, विवाहित अगर विधवा कोणत्याहि स्थितीत असली तरी तिला मोकळं, स्वतंत्र स्थान आपल्या समाजांत अजूनहि मिळत नाही. काय, खरं ना हे ?

" श्रीनिवासभाई हा माझा मावसभाऊ ! इथं कुठंसा ऐंजिनियर आहे तो ! भारी प्रेमळ स्वभावाचा ! माझी समग्र हकीकत जेव्हा त्यानं ऐकली तेव्हा त्याला बाबांचा व माधवरावांचाहि मनस्वी संताप आला. परवा तोच मला म्हणाला, ' दुर्गाताई, तुझं सौभाग्य हरपलं नाही–तुला तें मिळालं असं समज अन् कुंकू लावायला लाग पुन्हा ! ' मला इंग्लिश येत नसल्यामुळं त्यांच्या कागदपत्रांची, देण्याघेण्याची पुढील सारी व्यवस्था लावण्याकरिता, विम्याचे अन् फंडाचे पैसे हातीं येण्याकरिता वारंवार त्याची मदत मला घ्यावी लागते. साऱ्या पैशाअडक्याची नीट व्यवस्था लागली की ही जागा सोडून देऊन मी हिंगण्याला शिकायला जाणार आहे. "

तन्मयतेने मी इंदिरेची कथा ऐकत होतें. " दुर्गाताई–" पाठीमागून हाक ऐकूं आली. चमकून मीं मागं वळून पाहिलं. श्रीनिवासच दारांत उभा होता. माझ्याकडे पाहून त्याने मंद हास्य केलें आणि मग इंदिरा थांबायला सांगत होती तरी मी तेथून सटकलेंच !

इंदिरेचें प्रत्यक्ष जीवन आणि भोवतालच्या जीवनाविषयी प्रचलित असलेलें मत यांतील फरक मात्र माझ्या मनाला सारखा जाणवत होता.

——:०:——

# रत्न पारखी ! : : : १

'शोकेस' मधून ठेवलेल्या सुंदर सुंदर दागिन्यांच्या खुलावटीकरितां विद्युद्दीपांचा प्रकाश त्यावर पाडला होता. जणूं हिरे, मोतीं यांचें तेज आणि विद्युद्दीप यांची स्पर्धाच लावली होती. जाणारा यणारांचे डोळे सहजच अगदीं तिकडे वळत; आणि क्षणकाल थांबून त्या दागिन्यांच्या बनावटीचें कौशल्य आणि सौंदर्य न्याहाळीत. शोकेसमध्यें कांहीं वेळ न्याहाळल्यावर मी सहज आंतील गिऱ्हाइकांकडे नजर टाकली. आणि अपटुडेड पोशाखांत, मोत्याचा एक कंठा पारखीत उभा असलेला केशव मला दिसला. हळूच पाठीमागून जाऊन मी त्याच्या पाठीवर थाप दिली. लगेच प्रेमळपणें माझ्या खांद्यावर हात ठेवून तो म्हणाला, "वा, छान ! वेळेवर भेटलास अगदीं ! बघ रे हा कंठा जरा, स्वत:ला रत्नपारखी म्हणवितोस ना ? हे मोती कसे काय वाटतात तुला ?"

"काय किंमत आहे याची ?" मी हातानें त्याचें वजन अजमावून पाहिलें.

"हा बघ कीं आंकडा, चारशें रुपये लावलाय् !"

"तुला आवडलेला दिसतो हा कंठा !"

"हो ! हें मधलं लॉकेट किती सुंदर बसवलंय् नी त्यांतल्या हिऱ्यांचं तेजही अगदीं अस्सल दिसतंय् !"

मी कंठा निरखून पहात म्हटले, "आहेतच मूल्यवान हिरे; आणि मोतीही उत्तमपैकीं आहेत. घ्यायला हरकत नाहीं या किंमतीला."

केशवनें लगेच चारशेंचा चेक फाडला आणि कंठ्याची सुबक मखमली पेटी आंतल्या खिशांत कोंबून, आनंदभरानें त्यानें माझी आणि आपली सिगारेट पेटविली. हवेंत धूर सोडीत तो म्हणाला, "अगदीं उबगून गेलोंय् बघ मी सबंध दिवसाच्या दगदगीनं. जरा निवांत एकाद्या हॉटेलांत बसूं या!'

माझा हात धरूनच त्यानें मला आपल्या छोट्या कारमध्यें बसविलें. आणि एंपायर हॅाटेलधल्या एका रूममध्यें जेव्हां आम्ही बसलों तेव्हां डोक्यावरली हॅट काढून स्वस्थपणें खुर्चींत बसत तो म्हणाला, "हें बघ रघुनाथ, काय वाटेल ती 'ऑर्डर' दे तूं आतां!'

मी दोन ऑमलेट सांगितल्यावर अगदीं गंभीरतेनें केशवचा हात धरून म्हटलें, "केशव–" माझ्या आवाजांतीं कंप त्याला जाणवला.

"काय रे रघू?" तोही गंभीर झाला.

"केशव, रागावूं नकोस, पण साऱ्या तुझ्या गुणांना नी कर्तबगारीला कसं गालबोट लावल्यासारखं वाटतं रे मला!

"हं!...हेंच पुराण सांगणारा कां मला तूं? पुष्कळ वेळां ऐकलंय् मी तें!"

"केशव, माझ्याशिवाय तुला दुसरं कोणी सांगणार नाहीं आणि माझ्यावर तूं रागावणार नाहींस अशी खात्री असल्यामुळंच मी बोलतों. अगदीं सुंदरांतली सुंदर हुषारांतली हुषार मुलगी पाहून देतों मी तुला, पण तूं लग्न कर,–संसारी हो. घराशिवाय नी गृहिणीशिवाय तुझ्या संपत्तीचं, कर्तबगारीचं चीज नाहीं केशव!"

माझ्या कळवळ्याच्या बोलण्यानें केशव कांहींसा वरमला; परंतु कठो-

रतने तो म्हणाला, " नाही. रघू, तेवढी गोष्ट तू मला सागूं नकोस. मंगलेवर माझं एवढं प्रेम आहे कीं, तिच्यावाचून मला करमणं अगदीं शक्य नाहीं. लग्न करून एकाद्या मुलीचं जीवित उगीच दु:खी मी केव्हांही करणार नाहीं. रघू, नकोच ती संसाराची जबाबदारी ? मी अगदी सुखी आहे. तुझ्यासारखा निरपेक्ष प्रेम करणारा मित्र, मंगलेसारखी गोड सुंदर सहचरी, कापसाच्या व्यापारांत होतं असलेली माझी चलती, किती भाग्यवान् आहे मी ! तूं उगीच माझ्यासाठीं वाईट वाटून घेतोस ! लग्न केलं, चार मुलं झालीं, म्हणजेच का रे आयुष्याचं सार्थक झालं ? "

यावर मी त्याला लग्नाच्या आवश्यकतेवर एक व्याख्यान सहज ऐकवूं शकलों असतों. पण त्याचा कांहीं उपयोग नाही हें जाणूनच पुढें आलेल्या आमलेटचा समाचार घेतां घेतां मी त्याला म्हणालो: " अरे, चार दिवस लोणावळ्याला येतोस का ? मी जातों आहें, परवांपासून रजाच घेतली आहे मी महिन्याची ! "

" तुम्हां ऑफिसर लोकांचं ठीक रे, रजा घेतलीत की अगदीं स्वतंत्र नोकरी म्हणतां तुम्ही, पण तुमच्यापेक्षां आम्ही व्यापारीच खरे गुलाम ! अगदीं तनमनधन वहावं लागतं तिथं. सध्यां अशी परिस्थिती आहे की मुंबई-हून मला एक दिवस हालतां येत नाहीं पण आठ एक दिवसांनीं कदाचित चैन म्हणून एकादा दिवस येईन मी ! आणि पत्र तर एक दिवसाआड पाठ-वीन, मग तर झालं. त्याचें तें बालिश बोलणे ऐकून मी हंसलों, आणि लगेच आम्ही दोघेही उठलों.

बालपणापासूनच आम्ही एकमेकांचे जिवलग मित्र होतों. परिस्थितीनें आमच्या जीवनक्रमांत जरी बरेच अंतर पडले होतें तरी आमच्या-तला अकृत्रिम स्नेह नाहीसा झाला नव्हता. कॉलेजांतून बाहेर पडल्यावर मी एका ऑफिसांत नोकरीला लागून हळू हळू हेडक्लार्क झालों होतों. माझें लग्न

होऊन मला दोन मुलेंही झालीं होतीं. केशव आपल्या काकांच्या संगतीनें कापसाचा व्यापारी बनला. त्यांत त्याला बराच पैसा मिळाला. पण मंगला नावाच्या एका वेश्येवर त्याचें अत्यंत प्रेम बसलें. आणि तिच्यावरील प्रेमानें वेडावून तो लग्न करीना. तिच्यासाठीं तो आपल्या पैशांची वाटेल तशी उधळपट्टी करी. हें पाहून माझा जीव तिळतिळ तुटे. त्यानें लग्न करावें यासाठीं त्याचें मन शक्य तो वळविण्याचा मी प्रयत्न करी.

मंगलेचा त्याला लागलेला नाद ही एक गोष्ट वगळली तर त्याच्यासारखा प्रेमळ, दिलदार, बुद्धिमान् आणि सरळ स्वभावी माणूस मी पाहिला नव्हता. कोणालाही हवासा वाटेल असाच तो होता. त्याच्याशी मैत्री करण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला; पण त्याचे प्रेम, विश्वास माझ्याशिवाय कोणीही संपादला नाहीं. त्याचा स्वभावच असा. एकाद्यावर प्रेम केलें, विश्वास टाकला, म्हणजे मग तो त्याच्याकरितां काय वाटेल ते करील. यामुळें मंगलेसारख्या एका वेश्येवरून तो आपला जीव कुर्बान करून टाकीत होता.

लोणावळायला आल्यावर चार दिवसांनीं त्याचें मला पत्र आलें. त्यानें लिहिलें होतें,—

मुंबई, १७–११–४०

**प्रिय रघू,**

लोणावळ्याला अगदीं चैनीत आरामांत असशील तूं ! अन् मी काय इथं दुःखांत नाहीं म्हणा. पण तुझ्या संगतींत एक दिवस तरी घालवायला येत्या सोमवारीं मी येणार आहें. तुझ्या पसंतीनें घेतलेला कंठा मंगलेला फार आवडला. मंगलेकरितां मी माझ्या पैशांचा अपव्यय करीत आहें असं तुला वाटते पण मंगला मला जें सुख देत आहे त्याची बरोबरी त्या पैशांबरोबर नी दागिन्यांबरोबर कधीं करतां येईल का ? परवां माझं डोकं विलक्षण दुखत होतं. असं वाटलं, मी अगदी सडकून आजारी पडणार आतां ! पण मंगलेच्या शीतळ हाताच्या स्पर्शानं आणि तिनें प्रेमळतेनें केलेल्या शुश्रुषेनं

तावडतोब बरा झालो मी ! रघू, तुला वाटतं संगला बोलून चालून वेश्या. तिचं प्रेम माझ्यावर नाही, माझ्या पैशावर आहे. अगदीं कबूल करतो मी हे. माझ्या पैशावर का होईना तिचं प्रेम आहे ना ? तेवढ्यावरच मी समाधान मानीन. "किती हा केशव वेडा !' असा विचार तुझ्या मनात या वेळी आला असेल, नाहीं ? हा विचार जरा बाजूला ठेव आणि मुंबईहून काय काय आणूं तें आतांच लिहून कळव.

तुझा,

—केशव

सोमवारीं मी केशवची मोठ्या आतुरतेनं वाट पहात होतों; पण संध्याकाळपर्यंत तो आला नाहीं. मोटार नादुरुस्त झाली असल्यास कदाचित् आगगाडीनें येईल म्हणून संध्याकाळच्या मेलवरही मी जाऊन आलो. त्या दिवशी तर नाहींच, पुढल्या आठ दिवसातही केशव आला नाहीं. शेवटीं एकदा त्याचे पत्र आले. उघडून पहातो तो अवध्या दोन ओळी. आणि त्याही किती भयंकर !

'कापसाच्या सट्ट्यात आणि नुकत्याच घातलेल्या कापडाच्या दुकानात जबरदस्त नुकसानी आली. आणि मनीत हवे तसे पसे उधळणारा केशव एका क्षणांत गरीब झाला आहे सविस्तर पुढे कळवीन.'

मी अगदी बेचैन होऊन गेलो. केशववर असले संकट कोसळेल याची मला कांहीं कल्पनाही नव्हती. व्यापार म्हणजे दोरीवरचा सरकता नाच आहे. जरा तोल गेला कीं संपलेच सगळें ! मुंबईला जाऊन केशवची परिस्थिती प्रत्यक्ष पहावी आणि त्याला काहीं मदत करतां आल्यास करावी म्हणून मी तावडतोब निघालो. बोरीबंदरवर उतरल्यावरोबर टॅक्सीनें तसाच मी केशवच्या बंगल्यावर गेलों. आणि बंगल्याला लागलेले भलें थोरलें कुलूप पाहून मी हतबुद्धच होऊन गेलों. माझ्या मनांत नाही नाहीं त्या शंका येऊं लागल्या. हळुवार मनाचा केशव मंगलेकडे पैशाच्या मदतीसंबंधी याचना

करायला गेला असेल. आणि ती बोलून चालून वेश्या ! केशव गरीब झालेला पाहून तिनें त्याला धुडकावून लावला असेल. मनस्ताप सहन न होऊन केशव कुठें परांगदा झाला कोण जाणे ? आणखी दोन तीन ठिकाणी केशवचा मी तपास केला. आणि शेवटीं निराश होऊन परत आलो. लोणावळ्याला परत आल्यावर केशवच्या सविस्तर पत्राची वाट पहाण्याखेरीज मी कांहीच करूं शकत नव्हतो. आठ दिवस अशी वाट पाहिल्यावर एकदाचें केशवचें पत्र आलें. मी त्यावर एकदम झडपच घातली आणि आश्चर्यानें वेड लागायची पाळी आली मला. केशवची लग्नपत्रिका होती ती ! माझ्या डोळ्यावर माझा विश्वासच बसेना. केशवचें लग्न ! आणि तो विपन्नावस्थेत सापडलेला असतांना ! वधूचें नांव मी पाहूं लागलो.—मंगला ! ही कोण मंगला ? ती वेश्याच तर त्याच्याबरोबर लग्न करीत नसेल ! छे, तसें कुठलें व्हायला ! मंगला नावाची कोणी दुसरी मुलगी असेल. किंवा मंगला हें नाव फार आवडतें झाल्यामुळें लग्नापूर्वीच केशवनें वधूचें नाव मंगला ठेवलें असलें पाहिजे. लग्न वैदिक पद्धतीनें व्हायचें होतें. लग्नपत्रिका मला उशिरां मिळाल्यामुळें मी जेमतेम लग्न वेळेवर जाऊन पोहोंचलो. विधीला सुरुवात झाली होती. आमंत्रित मंडळी थोडीच होती मी वधूकडे निरखून पाहिलें. केतकीच्या पानासारखी गोरीपान आणि अत्यंत रूपसंपन्न सुमारें तेवीस चोवीस वयाची ती होती. केशवची जी मंगला ती हीच ! ही माझी शंका बलवत्तर होत होती. मंगलेच्या रूपाचें केशवनें अनेकदां केलेलें वर्णन हिला लागू पडत होतें. मी अहेर कांहीच आणला नव्हता.

विधि संपतांच मी केशवजवळ गेलों. आणि प्रेमभरानें त्याचा हात हातांत घेतला. "केशव" इतकाच उद्गार माझ्या तोंडून निघाला. त्या उद्गारातच कितीतरी प्रश्न साठविले होते. त्यानें ते तात्काळ ओळखलें. "उद्यां सकाळी घरीं ये." त्यानें हळूच सांगितलें. अत्तर गुलाब आणि छोटीशीं पार्टी आल्यावर आमंत्रित मंडळीबरोबर मीही निघून गेलो. रात्रभर मला कांही

झोंप आली नाहीं. केशवकडून केव्हां एकदां सविस्तर हकीकत कळते याची अनिवार उत्सुकता मला लागली होती.

सकाळी नऊ वाजण्यापूर्वींच मी केशवकडे गेलों, तोही माझीच वाट पहात होता. मला कोचावर बसवोन तोही अगदीं जवळच बसला आणि नेहमीच्या सहजतेनें हसत हंसत म्हणाला, "या घराशिवाय आणि मंगले-शिवाय आतां कांही नाहीं माझ्याजवळ ?" मी त्याला डोळ्यांनींच प्रश्न केला 'सांग ना सारं नीट काय तें !'

माझ्यापुढें सिगरेट करीत त्यानें काडी ओढली आणि धुराचे फवारे सोडीत स्वस्थपणें तो सांगूं लागला,—

"कापडाचं माझं दुकान जेमतेम चाललं होतं हे तुला ठाऊकच आहे. पण भागीदाराच्या गफलतीमुळं त्यांत मला बरंच नुकसान पोंहोचलं. त्याचं कांहीं विशेष नाहीं. परंतु कापूसविक्रीचा पंचवीस हजाराचा बिझिनेस एकदम माझ्या आंगावर आला. आणि क्षणांत रावाचा रंक बनलो मी ! जवळचं होतं नव्हतं तें बाहेर काढून आणि ठाकठीक करून मी पत राखली. या प्रसंगाचं कांहीं मला विशेष दुःख वाटलं नाहीं. व्यापारांत असले प्रसंग यायचेच ! मला अतिशय वाईट वाटलं आतां मंगलेच्या सहवासाला मी मुकणार याचं !

भुकेकंगाल अवस्थेत मी तिच्या भेटीला जाणं कांहीं शक्य नव्हतं. आणि तिला तें इष्टही वाटणार नाहीं. म्हणून मी तिची शेवटली भेट घ्यायला गेलों. आणि माझ्या बोटांतली एकच एक असलेली आंगठी तिच्या बोटांत सरकवीत तिला सारी परिस्थिती निवेदन केली. आणि दुःखद अंतःकरणानं तिचा निरोप मागितला. आणि रघू, पुढचं कसं सांगूं तुला ? मला नीट वर्णन करून सांगतां येणं शक्य नाहीं." बोलतां, बोलतां त्याचा कंठ सद्गदित झाला. किंचित् काल थांबून तो पुढें म्हणाला,—

"तिनें आपले हात माझ्या खांद्यावर ठेवले आणि आत्यंतिक तेजस्वी

पण निर्मल नजरेनें ती माझ्याकडे पहात राहिली. नंतर शांतपणें म्हणाली: 'मी स्त्री आहे. वेश्या असले तरी केशवराव, मी स्त्री आहे. पोटाकरितां आमच्या वंशाला लागलेला हीन धंदा मी केला आहे. तुमचं निरतिशय प्रेम आणि केवळ वासनापूर्तीकरितां प्रेमाचा आभास आणणारं प्रेम यांतला फरक मी ओळखूं शकतें तुमच्या आत्यंतिक प्रेमाची साक्ष जेव्हांपासून मला पटली तेव्हांपासून ही मंगला शरीरानं आणि मनानं केवळ तुमचीच आहे. तुमचा यावर कदाचित् विश्वास बसणार नाही. न बसूं दे. पण आजपर्यंत जें तुम्ही मला दिलं आहे तें सारं घेऊन चला. माझ्या नांवानं असलेले बँकेतले पैसे काढा, आणि तुमच्यावरील अरिष्ट प्रथम दूर करा. या मंगलेला मात्र जन्मांत विसरू नका,–अंतर देऊं नका. तुमचं पत्नीपद मला मिळण्याची शक्यता नाही; पण–"

"का ? का शक्यता नाहीं ? मंगल, झाडावरल्या उमलत्या फुलाइतकी तूं मंगल आणि पवित्र वाटतेस मला ! तूं माझी आहेस आणि जन्मभर माझीच राहशील. चल माझ्याबरोबर मी गरीब झालों आहे तरी तुझं नी माझं पोट खास भरूं शकेन !"

असं मी म्हणतांच तिचे डोळे अश्रूंनी भरून आले. आणि माझे पाय तिनें घट्ट धरले. तिला उचलून हृदयाशीं धरतांच ती माझ्या कानांत गुणगुणली 'इतकी मी भाग्यवान् आहे कां ? खरंच आपलं पत्नीपद मला लाभेल ?"

आणि काल आमचं लग्न लागलेलं तूं पाहिलंसच ! सारंच मुळी एका-एकी ठरलं तुला कळवायला वेळच मिळाला नाहीं. एकाद्या कादंबरींत चमत्कृतिपूर्ण घटना एकामागून एक घडाव्या ना ? तसेच हे विस्मयाकुल करणारे आकस्मिक प्रसंग माझ्या आयुष्यांत घडून आले. आतां झालं ना तुझ्या मनासारखं ! बसलो ना मी संसारांत ? बघ, मंगला आंत स्वयंपाक करते आहे. आणि तिला काय हवं नको तें पहायला मला आतां उठलं पाहिजे.'

चहाचा ट्रे घेऊन मंगला इतक्यांतच आंत आली तिच्या मुखावरील ती नवपरिणित वधूची सलज्जता, कर्तव्य दक्षता, केशववरील तिचें सात्त्विक प्रेम आणि तिची ती अप्रतिम रूपसंपदा पाहून ती तेथून निघून जातांच मी म्हटलें:—

" खरंच केशव, खरा रत्नपारखी आहेस तूं ! चिखलांत असलं तरी कमळाचं सौंदर्य आणि कोळशाच्या खाणीत असला तरी त्या हिऱ्याचं तेज कोणी नाकबूल करील का ? समाजगंगेच्या तळाशीं बुडी मारून शेवटीं सुंदर खरं रत्न मिळवलंस तूं ! तुमचा संसार सुखाचा होवो ! "